


रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २ जुलै २०२३


# मोदींच्या भाषणांचे वादळ ?

**आधुनिक केसरी**

**पंतप्रधान मोदी यांचे केवळ भारतात नव्हे विदेशातही लाखो श्रोते त्यांचे भाषण ऐकण्यास उत्सुक असतात. त्यांनी केलेल्या भाषणाची प्रतिध्वनी बरेच दिवस ऐकावयाला मिळते. मोदींच्या मध्यप्रदेशातील भाषणाची आजही चर्चा चालू आहे. त्यांनी पाटण्यातील विरोधी पक्षाच्या एकजूटीचा चांगलाच समाचार घेतला. भ्रष्टाचारावरुन विरोधी पक्षाच्या चारित्र्यावर घाव घातला. विरोधी पक्ष घायाळ झाला म्हणा ! ते मोदींना शिव्यांची लाखोळी वाहत आहेत. तसेच त्यांनी घटनेपासून धूळखात पडलेल्या समान नागरी कायद्याचा विषय छेडला. यावरून भाजपा सरकार कायदा आणणार याचे संकेत मिळाले.त्यांच्या भाषणावरुन देशात वादळ उठले आहे. काँग्रेससह इतर पक्षांनी व मुस्लिम नेते, संघटनांनी या कायद्याला विरोध करविण्याचे ठरविले आहे.**

लोकसभेच्या २०२४ निवडणुकीत भाजपा व मोदी सरकारला सत्तेतून घालविण्यासाठी परिवारवादी पक्षांच्या नेत्यांनी कुटंबासह २३ जुनला पाटणाची हवाई सफर केली. या नेत्यांच्या विमानाचा खर्च बिहारचे नेते नीतीशकुमार यांनी केल्याची माहिती आहे. या नेत्यांचे हवाई सफरचे 'व्हिडीओ' समाजमाध्यमावर झळकत आहेत! अश्या बैठकीसाठी पैसा कोठून आला ? तो किती खर्च झाला ? तो कोणी केला ? हा प्रश्न कोणी विचारणार नाही. या बैठकीत भाजपाच्या विरोधाचा 'अजेंडा'ठरलेला नव्हता. पण या बैठकीचे सूत्रे बिहारचे मुख्यमंत्री नीतीशकुमार यांचेकडे होती, पुढे तेच आघाडीचे नेतृत्व करतील, याची शक्यता आहे. दुसरीकडे आम आदमीचे नेते केजरीवालांना तर लोकसभेच्या निवडणुकीपेक्षा दिल्लीबाबत केंद्र सरकारने काढलेल्या वटहुकूमाची अधिक चिंताआहे. त्यासाठी त्यांना काँग्रेसची साथ हवी आहे. त्यासाठी त्यांची धडपड चालू आहे. दिल्ली बदलीबाबतचे केंद्राचे विधेयक संसदेत पास झाले, तर त्यांचे नाक कापले जाईल,याची भीती त्यांना वाटते आहे. काँग्रेस पक्षाने तर विषयावर सद्या तरी मौन पाळले आहे. त्यामुळे केजरीवाल नाराज झाले. ते विरोधी पक्षाच्या एकजुटीच्या बैठकीतून निघून गेले. विरोधी पक्षाच्या बैठकीत एकजुटीला मात्र तडा गेला. लोकसभा निवडणुकीपर्यंत विरोधी पक्षातील अनेक मोहरे बाहेर पडतील. कारण यातील अनेक नेत्यांचे विळ्या-भोपळ्याचे नाते आहे. त्यामुळे ते एकत्रित कधीच येवू शकत नाहीत. या आघाडीचे पी.डी. ए. नावाचे बारसे उरकून टाकले गेले. केवळ सत्तेसाठी आपसात भांडणारे बोके मात्र आजूबाजूला बसलेले होते. मोदींना तानाशाह म्हंटले गेले. मग पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पक्षात त्यांची व भाचा यांची एकाधिकारशाही आहे, याचा त्यांना विसर पडलाय! विरोधी पक्षाच्या बैठकीला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खडगे यांनी राहुलबाबांना सोबत नेले.गांधी हे पक्षाचे नेते अथवा खासदार नाहीत. राष्ट्रीय जनता दलाचे भ्रष्ट्राचारी नेते लालुप्रसाद व त्याचे पूत्र व शिवसेनेचे उध्दवजीसोबत पूत्र आदित्य ठाकरे, भंपक नेते संजय राऊत यांचे तेथे काय काम होते ? राष्ट्रवादी काँग्रेसच्या पवारांनी प्रफुल पटेल ऐवजी आपल्या मुलीला सुप्रिया सुळेंना पाठविले. या सर्व परिवारवादी पक्षांनी देशावर कब्जा केलेला आहे. खरच ! या पक्षात लोकशाही आहे काय ? या पक्षात परिवाराचा आदेश चालतो. या पक्षाच्या नेत्यांनी मोदींना तानाशाह म्हणावे, हेच हस्यास्पद आहे. मोदी घेरण्याच्या नादात विरोधी पक्षाचे नेत्यांनी देशाच्या विकासावर, भ्रष्टाचारावर तोंड उघडलेले नाही. प्रत्येक नेता सावध भूमिका घेत आहे. विरोधी पक्षांची ने एकजुट बैठक म्हणजे, 'खाया पिया कुच्छ नाही, ग्लास फुटा आठ आणे', असे





कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


भारतातील विरोधी पक्ष विरोधात मग्न होता, तर पंतप्रधान मोदी हे अमेरिकेत देशाची प्रतिमा उंचावत होते. पण लोकसभा निवडणुकीपूर्वी २०२३ म्हणजे, याच वर्षात मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणा या राज्यात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. कर्नाकट निवडणुकीत काँग्रेसला यश मिळाल्याने नेत्यात आत्मविश्वास वाढलेला आहे. यामुळे त्यांना इतर राज्यातील निवडणुकीत व लोकसभा निवडणूक जिंकता, येवू शकते, असा त्यांना विश्वास आहे. त्यासाठी काँग्रेस पक्ष मुस्लिम 'व्हॉट बँक' अधिक सवंग घोषणांचा डाव खेळत आहेत. काँग्रेस नेत्या प्रियंका वाड्रा केजरीवालांच्यॉ 'फ्री फार्मूल्याचा' निवडणुकीत वापर करत आहेत. त्यांनी मध्यप्रदेशातही तशी घोषणा केली. वाड्रांनी पक्षाच्या निर्णयाआधी घोषणा करून टाकली. त्यामुळे गांधी परिवाराचा दिलेला शब्द पक्षाला वंदनीय आहेच, तो पाळावा लागेल. दुसरीकडे भाजपाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह (मामा ) तर अनेक सवंग योजनांचा पाऊस पाडत आहेत. त्यांच्या 'रेवडी' संस्कृतीबद्दल मात्र भाजपा गप्प आहे. मोदींनी निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन भोपाळ येथून 'वंदे मातरम्' रेल्वेची सुरूवात केली. तसेच त्यांनी भाजपा बुथ कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला. यामुळे भाजपा कार्यकर्त्यात उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. मोदींनी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना विरोधी पक्षावर चांगलेच कडाडले! विरोधी पक्षांची एकजूट ही २० लाख कोटी रुपायांच्या भ्रष्टाचारावर पांघरण घालण्यासाठी आहे. तर मोदींनी पुन्हा भ्रष्टाचाराच्या विरोधी पक्षाच्या नेत्यावर कारवाई करण्याची जनतेला हमी दिली आहे. ज्यांनी गरिबांना लुटले, देशांना लुटले त्यांना जेल जाण्याची भीती वाटते आहे, असा टोला मारत त्यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, द्रमुक या पक्षांनी केलेल्या भ्रष्टाचाराची यादी वाचली. या परिवारवादी पक्षाला मत दिले तर त्यांच्याच मुलां- मुलींचे भले होईल. भाजपाला मत दिले तर सामान्य माणसाच्या मुलाचे व नातवाचे भले होईल. मोदींचे हे म्हणणे, सामान्य मतदारांला पटणारे आहे.तसेच मोदी हे भ्रष्टाचाराच्या विषयावर दडपणाखाली येणारे नेते नाहीत, हे विरोधी पक्षाला समजले असेलच. त्यामुळे विरोधी पक्षाचे नेते घबराट पसरली आहे. भ्रष्टाचाराचा हा भस्मासूर विरोधी पक्ष नेत्यांना भस्म करू शकतो. भाजपाने भ्रष्टाचार, तुष्टीकरण, तीन तलाक उल्लेख केला. मोदींना समान नागरी कायद्याचे जाळे टाकले,यावरुन यात विरोधी पक्ष फसला यावरुन त्यांच्यात फूट होऊ शकते.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने केवळ मतासाठी घटनेच्या आधारावर कायदे करण्याऐवजी धर्माच्या आधारावर मुस्लिम व हिंदू व्देषाचे बीज पेरले. तुष्टीकरणाच्या राजकारणातून देशात दोन घटना, दोन कायदे केले गेले, ही वस्तुस्थिती आहे.घटनेत कलम ४४ मध्ये देशात समान नागरी कायद्याचा उल्लेख आहे. विधि विभागाने याबाबत मते मागविली आहेत. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल बोर्डाला भारतात शरियतप्रमाणे कायदे हवे आहेत. या कायद्याचा मसुदा येण्यापूर्वी काँग्रेसने कोल्हेकुई सुरु केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २४ नोव्हेबर. १९४८ रोजी घटना समितीच्या भाषणात 'धर्मनिरपेक्ष देशात विवाह, वारसा हक्क, आदी व्यक्तीगत कायदे धर्मावर अधिष्ठीत असू शकत नाहीत. 'देशाच्या एक संघतेसाठी आणि ऐक्यासाठी सामान नागरी कायदा आवश्यक आहे' असे म्हटले. काँग्रेस पक्षाचे नेते बाबासाहेबांचे मत नाकारत आहे. समान नागरी कायद्याच्या मंजूरीसाठी लोकसभा व राज्यसभेत सरकारच्या बाजूने २/३ मतांची आवश्यकता आहे. लोकसभेचे एकूण सदस्य संख्या ५४३ असून या कायद्याच्या मंजुरीसाठी ३६२ मतांची गरज आहे. भाजपा व मित्र पक्षांचे संख्याबळ ३३० आहे. राज्यसभेचे एकूण सदस्य २५० संख्या आहे तर मंजुरीसाठी १६७ मतांची गरज आहे. भाजपा व मित्र पक्षांची संख्याबळ ११०इतके आहे. तेंव्हा दोन्ही सभागृहात भाजपा सरकारने बहुमत नाही.तेंव्हा हा कायदा संमत करण्यासाठी भाजपा सरकारला कसरत करावी लागणार आहे. निवडणुक तोंडावर असल्याने मुस्लिम व्होट बँक नाराज होतील, म्हणून या कायद्यावर संमती होणार नाही असे दिसतेय. काँग्रेसने तुष्टीकरणाचे राजकारण करुन मुस्लिम व दलित समाजाचा व्होटबँक म्हणून वापर केला. आजही काँग्रेस मतासाठी मुस्लिमांच्या धर्मावर तर दलित समाजाच्या घटनेवरुन भावना भडकवित आहे. कर्नाटक निवडणुकीत तोच उद्योग केला गेला, म्हणून तेथे काँग्रेसला यश मिळाले. त्यामुळे काँग्रेस नेत्यांची हिंमत वाढत चालली आहे, यासाठी वातावरण तयार निर्मिती केली जात आहे. खर तर ! मुस्लिम व दलित समाजाने काँग्रेस विचारसरणीचा विचार केला पाहिजे. अल्पसंख्याकांत केवळ मुस्लिम येत नाही, यात बौध्द, जैन, शीख पारशी, ख्रिश्चन येतात. या अल्पसंख्याक समाजाचा विरोध नाही. मुस्लिम नेत्याचा का आहे ?तसेच अल्पसंख्याकांची ठेकेदारी मुस्लिम नेत्यांकडे आहे काय ? देशात भाजपा हे सुध्दा राजकीय पक्ष आहे. या पक्षाला मुस्लिम मतदारांनी धर्माचा सुध्दा धार्मिक चष्म्यातून मत न देणे, हे चुकीचे आहे.अमेरिकेत पत्रकार सबरिना सिद्दीकीने 'भारतातील अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी तुमच्या सरकारने काय पावले उचलेली आहेत ? असा प्रश्न विचारलाहोता. भारतात अल्पसंख्यावर अन्याय होत आहे, असा अप्रचार काँग्रेस नेते आंतरराष्ट्रीय पातळीवर करत आहेत. त्याचीच 'री' तीने ओढली आहे. यामागे भारताची प्रतिमा मलीन करणे, हाच महिला पत्रकारांचा प्रश्न विचारण्यामागाचा हेतू होता. ज्या महाराष्ट्रात नासिकची घटनेची बातमी होते, पण नांदेडच्या घटनेची बातमी म्हणून देत नाहीत, त्यावरुन यांचा हेतू लक्षात येतो. भारतातील चाटूगाराला' विदेशी पत्रकाराची ट्रोल केल्याची कीव का यावी ? इस्लामी राष्ट्रात अल्पसंख्याकावर धार्मिक अत्याचार होत असतानाहीत्र यावर मात्र त्यांची दातखिळी बसते. पाकिस्तानमध्ये अहमदिया मुस्लिम समाजाला कुर्बानी देण्यावर प्रतिबंध आहे.या कायद्याचा भंग केल्यास तीन वर्षाची शिक्षा दिली जाते. मुंबईत एका सोसायटीत केवळ बकरा नेण्यावरुन वाद झाला. देशातील राष्ट्रीय वृत्त वाहिन्यांनी याचे भांडवल केले. या घटनेला राष्ट्रीय वृत्त म्हणून दिले. वृत्त वाहिन्यावर चर्चा झाली. भारतात संवेदशनशील विषयावरचे वृत्त देणे, चर्चा करणार्‍यावर बंदी घातली पाहिजे. देशात वृत्त वाहिन्यावर रोज हिंदू व मुस्लिम याच विषयावर चर्चा झडत असतात. यातून समाजात व्देष भावना वाढवत आहे. देशातील कांही' चाटुगार' पत्रकार, विचारवंत, कलावंत काँग्रेसचा अजेंडा'चालवत आहेत. भाजपाने तुष्टीकरणाचे राजकारण करणार नाही. संतुष्टीकरणाचे राजकारण करेल हे स्पष्ट केले. तेंव्हा काँग्रेसची विचारधारा राष्ट्रहिताची मुळीच नाही. तसेच समाजात दरी निर्माण करणारी आहे. अमेरिकेतील अति धनाड्य माणूस जार्ज सोरोस हा भारतातील लोकशाहीचे सरकार उलथून टाकण्याचे मनसुबे रचत असतो. त्याला राहुल गांधी विदेशात कश्यासाठी भेटतात ? बैठका घेतात का ? मोदी-अदाणीवरुन काँग्रेसने थयथयाट केला होता. मग यावर गप्प का ? स्वातंत्र्यानंतर प्रथम काँग्रेस पक्षाचा खरा चेहरा- समोर येत आहे. देशाचा अमृत महोत्सव वर्ष साजरा करत असताना मात्र आगामी विधानसभा आणि २०२४ च्या लोकसभेची निवडणूक दुर्देवाने विकास प्रश्नाच्याऐवजी व्देष, जात धर्मावर होईल, असे चिन्हे दिसत आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

सकाळचे प्रसन्न वातावरण दृष्टीला पडते. स्वयंपाकघरातून डोकावणारी सूर्यकिरणे दिसतात. चुलीतला धूर दृष्टीस पडतो. आवली भाकऱ्या करते आणि भंडाऱ्याच्या डोंगरावर असणाऱ्या आपल्या पतीला म्हणजेच तुकाराम बुवांना त्या नेऊन देत असते. तुकारामबुवांना हाक मारताना ' आवो आवो...' अशा तिच्या आर्त हाका हृदयाला स्पर्शून जातात. डोंगर उतरताना आवलीच्या पायात बाभळीचा काटा घुसतो आणि ती खाली कोसळते. पुढचं तिला आठवत नाही. आवलीला शुद्ध येते तेव्हा ती आपल्या स्वयंपाकघरात पडलेली असते. चुलीजवळ कोणीतरी स्त्री भाकऱ्या करताना तिला दिसते. आपल्या घरात ही कोण नवीन बाई ? तुकारामबुवांनी काही नवीन तर.. ? अशी शंका तिच्या मनात येते. ती त्या स्त्रीला विचारते, ' कोण ग तू ? आणि माझ्या घरात कशी आलीस ? ' तेव्हा ती सांगते, ' माझं नाव लखुबाई. मला तुमची काळजी घ्यायलाच पाठवलं आहे. ' ही लखुबाई म्हणजेच रुख्मिणी. प्रत्यक्ष विठ्ठलाच्या सांगण्यावरून ती इथं आली आहे. तशी आवली कजाग बाई. विठ्ठलाला चक्क शिव्या घालत असते. पण त्याचं कारणही तसंच असतं. तिचा पती म्हणजेच तुकाराम महाराज विठ्ठलाच्या नादी लागलेले असतात. आपल्या पत्नीकडे, घराकडे, संसाराकडे त्यांचे काडीमात्रही लक्ष नाही. त्यामुळे ती विठ्ठलाला शिव्या देते. आपल्या पतीला हे ' पंढरीचे भूत ' लागले आहे आणि त्याने आपल्या सगळ्या संसाराचे वाटोळे केले आहे अशी तिची भावना असते. आवली विठ्ठलाला ' चिघळलेली जखम ' म्हणते. देवाच्या नादी लागण्याचा, नामस्मरणाचा काय उपयोग आहे असे म्हणते. पण आता घरात आलेल्या रुख्मिणीला मात्र तिचे हे विठ्ठलाला म्हणजे आपल्या पतीला शिव्या देणे आवडत नाही. अशी ही कजाग आवली असली तरी वरून काटेरी फणसासारखी दिसणारी आहे. अंतर्यामी मात्र फणसाचे गोड गरे आहेत. अजून एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती ही की आवली विठ्ठलाला शिव्या देत असली तरी त्यानिमित्ताने का होईना पण ती घेते त्याचेच नाव ! या अर्थाने आवलीही विठ्ठलभक्त आहेच !




संगीत देवबाभळी



## आनंदी पहाट

## व्यावहारिक नाते ठेवत नाहीत ते खरे मित्र

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यांत अनेक घडामोडी घडत असतात. कितीतरी लोक आपल्या आयुष्यांत येतात आणि जातात. पण सगळ्यांत अधिक लक्षात कोण रहात असेल तर, ते म्हणजे सगे-सोबती अर्थात आपले मित्र-मैत्रिणी. अगदी बालपणीच्या मित्र-मैत्रिणींची नावेही त्यांच्या स्वभावासहित लक्षात राहतात. अर्थात हे सगे-सोबती आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला भेटत असतात. पदोपदी आपण आपल्या आयुष्याची नवनवीन रांगोळी काढत असतो आणि त्यांत विविध रंग भरण्याचे काम आपले सगे-सोबतीच करत असतात. प्रसंगी आपले मन मोकळे करण्याची एक सुरक्षित जागा सुद्धा मित्र-मैत्रिणींपैकीच असते. आपल्या चुका हक्काने दाखवणे असेल अथवा आपले कौतुक करणे असेल, मित्रमंडळी शिवाय ह्यात सहसा पुढाकार इतर कोणी घेत नाही. थट्टा मस्करी करून आणि विनोद सांगून डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसवणाऱ्या मित्रमंडळी शिवाय आपल्याला मनाने अधिक जवळ फारसे कोणी नसते. मैत्रीचे नाते अगदी दुध-पाण्यासारखे असते. दोन्ही एकत्र केले कि ते वेगळे करता येत नाही. काहीवेळा तर तुझं माझं जमेना पण तुझ्याविना करमेना, अशी गत ह्या मैत्रीच्या बाबतीत झाल्याचे आपण अगदी प्रत्येकजणच अनुभवत असतो. एकही क्षण ज्या मित्र-मंडळींशिवाय जात नाही, तेच काही वेळा केवळ सगे-सोबती ठरतात. अनेकांशी दीर्घकाळ संपर्कच होत नाही. आपल्या आयुष्याची दोरी आपल्या मित्रांच्या हातात देताना अगोदर चांगले मित्र निवडणे, त्यांची चांगली पारख करण्याची जाणीव होणे जरुरीचे असते. प्रत्येक व्यक्तीची ओळख त्या व्यक्तीच्या मित्रांवरून होत असते. जगात सुष्ट-दुष्ट, चांगली-वाईट, जवळची-लांबची, आपली-परकी अशी माणसे असतातच. समविचारी माणसांची आपापसांत मैत्री लवकर होत असते. श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात सामान्य माणूस आला तरी त्याचा कायापालट होतो.

## शिदोरी

आधुनिक केसरी

शिदोरी म्हटलं की आठवते ती लग्नातली शिदोरी... कुठे प्रवासात दूर वर जायला निघालो की आईने सोबत दिलेली जेवनाची शिदोरी.. मुलगी सासरी जाताना आईने तिला दिलेली संस्काराची शिदोरी. शिक्षण घेत असताना शिक्षकांनी दिलेली चांगल्या विचारांची शिदोरी. कामावर जाताना कामगारांनी सोबत घेतलेली पोटासाठी चटणी भाकरी ची शिदोरी. ड्युटीवर जाताना दुपारच्या जेवणासाठी ची डब्यात घेतलेली शिदोरी. आपल्या सर्वांच्या आयुष्यात ही शिदोरी किती महत्त्वाची आहे हे शिदोरी या व्यापक शब्दावरूनच लक्षात येते.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-४

किती गोड शब्द आहे हा शिदोरी.. आणि किती अर्थ भरला आहे या शिदोरी शब्दांत. आपल्या आयुष्याशी निगडित व खुप अनमोल असा शब्द म्हणजे शिदोरी. या प्रत्येक उदाहरणातील शिदोरी ही खूप महत्त्वाची आहे. खास करून आईने लेकीला सासरी जाताना दिलेली दोन प्रकारची शिदोरी. त्यातली खाण्याच्या पदार्थांची शिदोरी चार आठ दिवसात विसरली जाते. पण ती करण्यासाठी मुलीच्या आईला खूप मेहनत घ्यावी लागते. किती प्रकारची शिदोरी तयार करतात त्यासाठी काकू मावशी आत्या मामी ताई या सगळ्या जणी खूप मेहनत करतात .
शिदोरी चांगली कशी होईल याकडे लक्ष देतात. जास्तीत जास्त चांगले पदार्थ तयार करून ती शिदोरी मुलींसोबत देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. खूप आनंदाने आणि समाधानाने हे काम स्त्रिया करतात. त्यांना मुलीला खूप जास्तीत जास्त आणि चांगली शिदोरी देण्याचा आनंद असतो. आई मात्र अगदी लहानपणापासून मुलीवर चांगले संस्कार करते .तिला चांगले वळण लावते. सासरी जाताना सुद्धा सांगत असते की दिल्या घरी सुखी रहा. सासर हेच तुझे माहेर आणि सासर समज. आमच्यावरची माया कमी झाली तरी चालेल परंतु सासरच्यांना भरपूर माया व प्रेम दे . ननंद आणि दीर हेच तुझे भाऊ-बहीण समज . अशा चांगल्या विचारांची शिदोरी ती आपल्या लेकीला देत असते. लेक सासरी सुखी राहावी असेच तिला वाटते. आणि तिची ही संस्काराची शिदोरी मुलगी आयुष्यभर जवळ बाळगते आणि आपल्या आयुष्यात सुखी होण्याचा प्रयत्न करत असते. आई-वडिलांनी दिलेली संस्काराची शिदोरी तिला कायमस्वरूपी उपयोगी येते. तिच्या चांगल्या वागण्यावरून सासरची मंडळी देखील म्हणतात की आई-वडिलांनी चांगले संस्कार केले आहे. हीच तिची यशस्वी जीवनाची शिदोरी होईल.
लेकीला दिलेली संस्काराची शिदोरी ही आयुष्यभर पुरते. पोट भरण्यासाठी ची शिदोरी हीसुद्धा तेवढीच महत्त्वाची असते .पण संस्काराची शिदोरी ही खुप अनमोल असते ती जीवन जगण्यासाठी... आपण खूप अभिमानाने सांगत असतो की आम्हाला आमच्या आई-बाबांनी आयुष्यभर पुरेल एवढी संस्काराची शिदोरी दिली आहे. संस्कार व जीवन या दोन्ही शिदोरी माणसाला चांगलं जीवन जगण्यासाठी खूप महत्त्वाच्या आहेत.
तेव्हा आपण सारेच एकमेकांना शिदोरी देऊया.... चांगल्या विचारांची....

## निरूपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**मुक्ताहारं धरन्तीं त्वां लतैव**
**शोभितां बहु |**
**अभीष्टफललाभाय दुर्गां**
**देवीं नमाम्यहम् || ३३ ||**
**मुक्ताहार धारण करणारी तू वेलीप्रमाणे शोभून दिसतेस. तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**जहा भोग तह पतन है, जहँ विराग उत्थान ।**
**धीर विवेक विचार से, भय अधीन गुरु ज्ञान**
**।।२२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)**
**४/०६/२२ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
जिथे इंद्रिय-सुख प्राप्तीची इच्छा आहे आणि विषयांचा उपभोग आहे, तिथे पतन आहे आणि जिथे विषयां बद्दल वैराग्य आहे तिथे जीवनाचा उत्कर्ष आहे, उत्थान आहे. म्हणून मेधावी संत विवेक युक्त होऊन आणि सद्गुरूंना शरण जाऊन अध्यात्म ज्ञान प्राप्त करतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**आगळा होऊनि धरी वरिचिया वरी । चपळ तो जिंके गांढ्या ठके येरझारीं ॥२॥**
**हातीं सांपडलें उभें बैसों नेदी कोणी । सोरीमागें सोरी घेती ओणवें करूनि ॥३॥**
**डाई पडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवता ही उभा फेर ॥४॥**
**तुका म्हणे सुख पाहे तयाचें आगळें । जिंकी तो हरवी कोणी एका तरी काळें**
अझुनि कां थीर पोरा न म्हणसी किर । धरुनियां धीर लाजे बुर निघाला ॥१॥
मोकळा होतासि कां रे पडिलासि डाई । वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं
मेळवूनि मेळा एकाएकीं दिली मिठी । कवळिलें एक बहु बैसविलीं पाठीं ॥२॥
तळील तें वरी वरील तें येतें तळा । न सुटे तोंवरी येथें गुंतलिया खेळा ॥३॥
सांडितां ठाव पुढें सईल धरी हात । चढेल तो पडेल ऐसी ऐका रे मात ॥४॥

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी




विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

**ही भगवंताची गरज, सद्गुरू भगवंताचे 'नाम' देऊन भागवितात. आपण हे नाम निरंतर आणि श्रद्धेने घेणे आवश्यक आहे. अशा रीतीने नामात अखंड राहिले तर परमार्थ साधतो, भगवंताची गरज भासते, प्रपंचात समाधान मिळते, आणि जन्माला आल्याचे सार्थक होते. गुरूवर विश्वास ठेवून चिकाटीने व आवडीने नाम घ्यावे. आपले जीवन व पर्यायाने आत्म शांती प्राप्त करून देणारे जीवन जगण्यासाठी ज्ञानाची जास्तीतजास्त उंची आपल्या परीने गाठल्याशिवाय आपल्याला संसारातून (स्वार्थातून) परमार्थ गाठता येणार नाही. सत्कर्माचा अभिमान जर आपल्याकडे घेतला तर खऱ्या शांतीचा विसर नाही का पडला ? अभिमान गेल्याशिवाय मनः शांती होणार नाही. देवाजवळ गेला तरी नामदेवाचा अभिमान नाही गेला, म्हणून भगवंतांनी त्याला 'गुरू कर' म्हणून सांगितले. एकदा असे झाले, की एका साधूकडे चोरांनी चोरी केले. ते पळून जात असताना शिष्यांनी पाहिले, तेव्हा चोरांना धरून त्या शिष्यांनी खूप चोप दिला. हे त्यांचे करणे गुरूला समजले, तेव्हा त्या चोरांना आणून, गुरूने त्यांच्या अंगाला तेल वगैरे लावून स्नान घातले, आणि त्यांना पंचपक्वान्नांचे भोजन दिले. हे असे काय करता ? म्हणून शिष्यांनी गुरूला विचारले, तेव्हा त्याने शिष्यांना सांगितले की, "तुम्ही तरी काय करता ? सर्वचजण देवाच्या घरी चोरी करीत आहेत; कारण आपल्याला त्याने हा जो देह दिला तो देवाची प्राप्ती करून घेण्याकरिता म्हणून दिला. क्रमशः**

## गुरु कशाला हवा ?

आधुनिक केसरी

व्यवहारात सुद्धा आपल्याला गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? प्रपंचात सुखदुःख झाले, समाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील, अशी ज्याला तळमळ लागेल तोच गुरू करील. प्रपंच आम्हाला कडू वाटला तरच शिष्य होण्याचा प्रश्न. शिकावे असे ज्याच्या मनात येते तो शिष्य, आणि जो शिकवितो तो गुरू. मला काही कळत नाही असे ज्याला वाटतो तोच गुरू करील. मी 'राम राम' म्हणतो, वाईट मार्गाने जात नाही, मग गुरू कशाला हवा, असे काहीजण म्हणतात. 'मी' केले ही जाणीव आड येते, म्हणून सद्गुरूची आवश्यकता आहे. सत्कर्माचा अभिमान जर आपल्याकडे घेतला तर रामाचा विसर नाही का पडला ? अभिमान गेल्याशिवाय राम नाही भेटणार. देवाजवळ गेला तरी नामदेवाचा अभिमान नाही गेला, म्हणून भगवंतांनी त्याला 'गुरू कर' म्हणून सांगितले.
संतांच्या कृपेने दुखणे बरे झाले म्हणून त्याला मानणे हे खरे नव्हे. जो शिष्याला विषयात



ओढील त्याला गुरू कसे म्हणावे ? जो काही चमत्कार करून दाखवील त्याला आम्ही बुवा म्हणतो. संताची परिक्षा आम्ही बाह्यांगावरून करतो. सर्वांभूती भगवंत ज्याला पाहता येईल त्याला संताची खरी ओळख होईल. संताच्या संगतीत आपल्या मनावर जो परिणाम होतो, त्यावरून आपण संताची परिक्षा करावी. माझे चित्त जिथे निर्विषय होईल तिथेच संताची खरी जागा म्हणता येईल. ज्याला भगवत्प्राप्तीची तळमळ लागली आहे, त्यालाच शिष्य म्हणावे. जो गुरूआज्ञेबाहेर जात नाही, आणि गुरू हेच भगवंतप्राप्तीचे साधन मानतो, तो सच्छिष्य होय. गुरूपरता देवधर्मच नाही मानू. काही कानडी माणसे महाराष्ट्रात आली. त्यांना मराठी येत नव्हते. त्यांनी एक दुभाषी गाठला आणि त्याच्या मागोमाग ती पुष्कळ हिंडली. त्यांची चिंता आणि जबाबदारी त्या दुभाष्यावर पडली. तशी आपण दुभाष्याची म्हणजे सद्गुरूची संगत केली पाहिजे. तो म्हणेल तिथे जावे, तो सांगेल तसे करावे, मग परमात्मा मिळेलच. शास्त्रे आणि वेद अनंत आहेत; ते शिकायला आपल्याला वेळ कुठे आहे ? सद्गुरूंनी नवनीताप्रमाणे सर्व साधनांचे सार असे जे नामसाधन सांगितले, ते आपण करावे, म्हणजे भगवंताचे प्रेम लागेलच. बाजारात गेल्यावर जो माल आपल्याला अनुकूल आणि माफक दराचा असेल तोच घ्यावा, त्याप्रमाणे परमार्थाच्या अनेक साधनांत आपल्याला अनुकूल आणि माफक असे नामस्मरण हेच एक उत्तम साधन आहे; तेच करावे आणि आनंदाने रहावे.
१८३. भगवंताबद्दल जिज्ञासा उत्पन्न होणे ही खरी भाग्याची गोष्ट आहे. असा जिज्ञासू शिष्य भेटला तर संताला आपले स्वतःचे सार्थक झाले असे वाटते .

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्याद्रासभरोहणम् ।**
**येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥**
**स्पष्टीकरण - या श्लोकाचा रोख घडा फोडणे आणि वस्त्र फाडणे यावर नाही. कवीला एवढेच सांगायचे आहे, की माणसाने आचरटपणा करून प्रसिद्धी मिळवण्याच्या नादाला लागू नये. कारण ती खरी प्रसिद्धीच नव्हे. ती अपकीर्ती ठरेल. प्रसिद्धी मिळवायची ती विद्या आणि कला यांच्या आधारेच मिळवावी. पराक्रम, लोकोपकार इत्यादी गोष्टी करूनही मिळवावी.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, २ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२८८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 02 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-288 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-18 ● PRICE-5



बीड येथे शिवसंग्राम चे संस्थापक स्व.विनायक मेटे यांच्या जयंती कार्यक्रमात शुक्रवार दि. ३०जून २०२३रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना लोकमत मीडिया ग्रुपचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवॉर्ड मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे, पालकमंत्री अतुल सावे, आमदार प्रवीण दरेकर.

# खोके सरकारला हाताशी धरुन पालिका ताब्यात घेण्याचा प्रयत्न

## आदित्य ठाकरे : मुंबई पालिकेवर महामोर्चा

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई : खोके सरकारला हाताशी धरुन महापालिका ताब्यात घेण्याचा प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाही, ही मुंबई आमची आहे, तिला दिल्लीच्या आदेशावरुन लुटू नका, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपवर जोरदार टीका केली.**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुंबई महापालिकेच्या कामातील भ्रष्टाचारावरुन महापालिकेवर शनिवारी महामोर्चा काढला. मुंबईतील रस्त्यांच्या कामात 40 टक्के कमिशन खाल्ले जाते, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. आदित्य ठाकरे म्हणाले की, हा आक्रोश आणि ही गर्दी पाहिल्यावर 'समझने वालों को इशारा काफी है' हा संदेश जातोय. ही जी गर्दी आहे, जे भगवे वादळ दिसत आहे ते बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेचे आहे. इकडचा आवाज आता दिल्लीलाही ऐकायला लागतोय. आजूबाजूंच्या भुतांना गाडायचे आहे, या खोके सरकारला गाढायचं आहे.
मुंबईतील रस्त्यांच्या कामात मोठा भ्रष्टाचार होत असून याची सर्व माहिती आपल्याकडे आहे. चोरांच्या फाईल तयार असून आमचे सरकार आल्यानंतर या सगळ्यांना जेलमध्ये टाकणार.
पालिकेची इमारत हे आमचे शक्तीपीठ आहे. इथला आवाज दिल्लीलाही ऐकावा लागतो. हनुमान चालिसेत म्हटल्याप्रमाणे इथे बसलेली भूत आपल्याला पळवून लावायची आहेत. मुंबई कधी दिल्लीसमोर झुकली नाही, यांना आपल्याला कटोरे घेऊन उभे करायचे आहे.
मी एकटा लढायल तयार आहे, फक्त तुम्ही साथ द्या. जो हातोडा चालवला तो कोणाच्या फोटोवर चालवलात? कोणी आदेश दिला होता? आजपासून हेच ध्येय्य डोळ्यासमोर ठेवा, आपले सरकार आले की यांच्यावर बुलढोझर चालवायचा आहे.
आम्ही मुंबईचे रस्ते काँक्रिटीकरण करणार असल्याचे खोके सरकारने सांगितले. एखादा रस्ता खोदायला गेला किंवा तयार करायला गेला तर एकून 42 प्रक्रियातून काम केले जाते. वाहतूक पोलिसांनाही विचारावे लागते, तसेच राज्य सरकारच्या आणि केंद्राच्या 16 एजन्सी आहेत, त्यांना विचारावे लागते. पण घटनाबाह्य मुख्यमंत्री म्हणतात की मुंबईत 400 किमीचे रस्ते तयार करणार, हे सर्व त्यांना काही माहिती नसल्याने ते बोलतात. मुंबईतील रस्ते हे मुंबईकरांसाठी नव्हे तर यांना कमिशन खाता यावं यासाठी केले जात आहेत. पहिला यांनी रस्त्यांच्या किमती वाढवल्या, टेंन्डरमध्ये घोटाळा केला. पाच हजार कोटींच्या रस्त्याची किंमत 6080 कोटी रुपये वाढवली. त्यातून यांनी 40 टक्के कमिशन खाल्ले. आम्ही जी 20 वर्षात कामे केली ती आता दाबली जात आहेत. महापालिकेला महापौर नाही, नगरसेवक नाहीत, समित्या नाहीत, त्यामुळे कामे खोळंबळी आहेत.

# डॉ. विनय भुतडा डॉक्टरेट पदवीने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** समजू-उमजु शकणाऱ्या बालकांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्या आयुष्याला अनुरूप ठरणाऱ्या "अपडेटेड आयुष्य" या पुस्तकाच्या माध्यमातून जर स्वतः आपल्या कामाला, आपल्याकडे असणाऱ्या वेळेला, आपल्या व्यवसायाला, आणि त्याद्वारे आपल्या जीवनाला कालानुरूप बनवत गेले तर आपले आयुष्य कसे अधिक सोपे, सहज, सक्षम होईल.. असा संदेश आपल्या स्वतःला आलेल्या अनुभवातून इतरांनाही या पुस्तकाच्या माध्यमातून करून देऊ पाहणाऱ्या "अपडेटेड आयुष्य" चे लेखक डॉ. विनय भुतडा यांना नुकतेच वर्ल्ड ह्युमन राइट्स प्रोटेक्शन कमिशन च्या वतीने डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले.



डॉ. विनय सुरेश भुतडा हे लातूर येथील एक नामांकित युवा उद्योजक, उत्साही तत्पर, हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व. विविध व्यवसायात कार्यरत असतानाच क्रिडा क्षेत्राची आपली आवडही त्यांनी मनापासून जपली आहे. आपल्या "अपडेटेड आयुष्य" या पुस्तकासंदर्भात बोलताना डॉ. विनय भुतडा यांनी सांगितले की, आपण कुठे, कोणत्या परिस्थितीत जन्म घेतो हे आपल्या हातात नसतं. पण 'कसं जगायचं' हे मात्र आपण नक्कीच ठरवू शकतो. आपल्याला अनिर्बंध, अनियोजित पद्धतीनं, बेभरवशाचं जगायचं आहे? की आपल्या आयुष्याला उत्तम नियोजनाची जोड देऊन ते जास्तीत-जास्त सुखकर बनवायचं आहे, हे सर्वस्वी आपल्याच हातात आहे. आपलं 'लाईफ मॅनेज' करायचं तर त्यासाठी खूप जास्त कष्ट घ्यायला हवेत असंही नाही. छोट्या-छोट्या कृती आपल्याला मोठं यश मिळवून देऊ शकतात. दरम्यान, "अपडेटेड आयुष्य" या पुस्तकात एलएमटी ( लाईफ, मनी आणि टाईम ) म्हणजेच जीवन, पैसे आणि वेळ याचे व्यवस्थापण कसे करावे आणि यामुळे आपल्या आयुष्यात बदल कसा घडवून आणावा हा यामागचा उद्देश आहे. डॉ. विनय भुतडा यांच्या स्तुत्य उपक्रमाचा गौरव व्हावा यासाठी डॉ. भुतडा यांना नुकतेच "वर्ल्ड ह्युमन राईट्स प्रोटेक्शन कमिशन"च्या वतीने डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले असून डॉ. भुतडा यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

**अपडेटेड आयुष्यचे ऑडियो बुक लवकरच**
अपडेटेड आयुष्यला चांगला प्रतिसाद मिळत असून अनेकांनी सकारात्मक प्रतिक्रिया कळविल्या आहेत . अलीकडच्या काळात प्रत्येकाकडे स्मार्ट फोन असून विविध सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे . अशा वेळी सोशल मीडियावर देखील अपडेटेड आयुष्य पोहचविण्यासाठी ऑडियो बुकची संकल्पना राबविण्यात येणार असून लवकरच "अपडेटेड आयुष्य"चे ऑडियो बुक उपलब्ध होईल .
**डॉ . विनय भुतडा, लेखक अपडेटेड आयुष्य**








प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# जातवास्तव आणि राष्ट्रवाद

आधुनिक केसरी

**व्यक्ती म्हणून एखादी भूमिका स्वीकारणे आणि तीच भूमिका समूहाने स्वीकारली पाहिजे असा अट्टहास धरणे या दोन्ही भिन्न बाबी आहेत. कारण काळ कोणताही असला तरी व्यक्तीच्या तुलनेत समूह म्हणून कधी कधी वेगळी भूमिका आपण पाहतो. समाजाच्या सुधारणेवर व्यक्तीची सुधारणा अवलंबून असते की सुधारित व्यक्तीच्या प्रभावातून समाज सुधारतो, हा एक नवीनच संशोधनाचा विषय होईल. राष्ट्रवाद व्यक्ती मनाला जसे आवाहन करतो, त्याचप्रमाणात समूहाला असे आवाहन करताना तो काहीअंशी क्षीण झाल्याचे दिसते. कारण समूहमनाची अंतर्वादळे बाह्य कारकांना दूर सारतात.**



## क्षितिजापल्याड

व्यक्ती म्हणून एखादी भूमिका स्वीकारणे आणि तीच भूमिका समूहाने स्वीकारली पाहिजे असा अट्टहास धरणे या दोन्ही भिन्न बाबी आहेत. कारण काळ कोणताही असला तरी व्यक्तीच्या तुलनेत समूह म्हणून कधी कधी वेगळी भूमिका आपण पाहतो. समाजाच्या सुधारणेवर व्यक्तीची सुधारणा अवलंबून असते की सुधारित व्यक्तीच्या प्रभावातून समाज सुधारतो, हा एक नवीनच संशोधनाचा विषय होईल. राष्ट्रवाद व्यक्ती मनाला जसे आवाहन करतो, त्याचप्रमाणात समूहाला असे आवाहन करताना तो काहीअंशी क्षीण झाल्याचे दिसते. कारण समूहमनाची अंतर्वादळे बाह्य कारकांना दूर सारतात. भारताची ओळख जशी सहानुभूती आणि परोपकार या अंगाने आहे, त्यापेक्षा जास्त गडद ओळख अनेक जातीत विभागलेले राष्ट्र अशीही आहे. आपण कोणती ओळख अधिक प्रकाशात आणतो त्यावर आपले भविष्य अवलंबून असणार आहे. आपण वसुधैवकुटुंबकम ही संकल्पना वापरताना त्यात राष्ट्रवाद कुठे बसतो किंवा तो कसा असावयास हवा हा विषय तूर्तास बाजूला ठेवून आम्ही खरेच राष्ट्रवादाची जोपासना करू शकतो का आणि ही जोपासना करताना

आपणास कोणत्या गोष्टीकडे लक्ष द्यावे लागेल, हे समजून घेणे महत्त्वाचे ठरेल. पारंपरिक व्यवस्थेत भारतात सात प्रकारच्या बंदी अस्तित्वात होत्या. ज्यामुळे इथे प्रत्येक समूह दुसऱ्यापेक्षा आपले वेगळे अस्तित्व राखून होता. या अस्तित्वाचा काहींना फायदा तर बहुतांशी लोकांना जाच सहन करावा लागत होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपण सर्व प्रकारच्या बंदीना दूर सारले असले तरी समाजात काही प्रमाणात या बंदी आजही अस्तित्वात आहेत. उदा. पूर्वी कर्म बंदी होती ती आज शिक्षणामुळे आणि अर्थोत्पादनाचे चित्र बदलल्यामुळे ही बंदी शिथील झाल्याचे दिसते. पूर्वीश्रमीच्या एखाद्या क्षत्रिय किंवा ब्राह्मणाचे पादत्रणाचे आज दुकान पाहून आज आपण आश्चर्यचकित होत नाही.

किंवा पूर्वाश्रमीचा शूद्र ज्ञानदानाचे कार्य तेवढ्याच समरसतेने करताना वावगे वाटण्याचा संभव नाही. ही किमान पातळीवर मारलेली मजल म्हणता येईल. कारण हा अत्यंत वरवरचा पृष्ठस्तरीय बदल म्हणावा लागेल. ज्या जातींनी कर्मबंदी झुगारून इतर व्यवसायात स्थिरावल्या त्यांनी आपल्या जातीअंतर्गत मात्र उच्चनिचता तशीच ठेवली. भारतीय मुस्लिम समाजातील जातीयता हा तर स्वतंत्र लेखाचा विषय होईल. भारत हा केवळ अनेक जातींचा देश नाही तर असंख्य उपजातींचा देश आहे. बरे हे केवळ तथाकथित उच्च जातीतच आहे आणि ज्यांना आपण वंचीत समूह म्हणतो त्या एकदिलाने नांदतात असे काही आहे का ? अजिबात  नाही. जनावरांचे कातडे वेगळे करणारी एक जात, ते कातडे कमावा री दुसरी जात, कमावलेल्या कातड्यापासून नाडा तयार करणारी तिसरी जात आणि पादत्राने बनविणारी चौथीच जात. एका वस्तूसाठीच्या विविध कार्यविभागणीनुसार इथे चार जाती दिसून येतात. या कोणाचे कोणाशीच जमत नाही, हे आपण एखादेवेळी समजून घेऊ; परंतु या प्रत्येक जातीअंतर्गत आणखी उपजाती आहेत.

यांत आजही बेटी व्यवहार होत नाही. अहो, ज्या समुदायाचा नागरी वस्तिशी काहीच संबंध नाही, त्या समूहामध्ये देखील उपजाती आहेत आणि विवाह वगैरे बाबतीत हे समूह अत्यंत कडवटपणे परंपरेचे पालन करतात. या सर्वांना अगोदर जातीय पातळीवर एकत्र आणावे लागेल. ज्या बंदीच्या विरोधात आपण कसोशीने झगडण्याचा प्रयत्न करतो त्याची फलनिष्पत्ती काय ? हे असे चित्र भारतातील प्रत्येक जातीत आहे. त्यास कोणतीच जात अपवाद नाही. मग आम्ही जो परिवर्तन व्हावे म्हणून झगडा देत असतो तो एकतर केवळ अत्यंत स्वार्थकेंद्री असतो किंवा उथळ आणि वरवरचा असतो. गर्व से कहो हम अमूक है, तमूक है. हे कधी साध्य होईल. अगोदर या समूहांना जातीतून नव्हे



तर उपजातींतून बाहेर काढावे लागेल. माणूसपणाचा आणि अशा उपजाती, जाती मानणाऱ्यांचा काही एक संबंध नाही. राष्ट्रवाद वगैरे संकल्पना आमच्यात रुजायला खूप प्रबोधन केले गेले तर आणखी पाचशे वर्षे लागतील. आणि प्रबोधन वगैरेने काही होत नाही म्हणून आपण असेच वागत राहिलो तर मग काही बोलणेच नको. अगोदरच आज अशी परिस्थिती आहे की, कोणी कोणाचे ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. ही तर चंगळवादाची सुरुवात आहे. या वावटळीत आपले चारित्र्य, स्वत्व, एकोपा, सहनशीलता, सहानुभूती, प्रबोधन, प्रेम, दयाभाव आणि तत्सम गोष्टी जणू उडून जाण्यास उतावीळ आहेत. प्रबोधनाची खरी गरज या काळात आहे. मागे एक व्यंगचित्र पाहण्यात आले. सर्व समूह मनोरंजनात व्यग्र आहे, मोबाईल पाहण्यात मग्न आहे आणि त्यातले काही मान वर करून काय चालले आहे हे पाहत आहेत किंवा जे चालले आहे ते बरोबर नाही असे त्यांना वाटते आहे. असे वाटणाऱ्यांचा वरून एक माणूस उद्यानातील गवत कापण्याचे यंत्र जसे हाताने ढकलतात त्याप्रमाणे रणगाड्याने डोके वर काढणाऱ्यांना छाटून

काढतो आहे. कारण कोणत्याही व्यवस्थापकाला तुम्ही डोके वर काढलेले आवडत नाही, प्रश्न उपस्थित केलेले आवडत नाही. इथे तर चांगळवादासोबत स्वतःचे पारंपरिक एवढे प्रश्न आहेत की, डोके वर काढायला सवडच नाही. उपजाती, जाती, पंथीय विचारसरणी आणि भारतीयत्व अशा क्रमाने आपणांस काही उपाययोजना करावी लागेल

तेव्हा कोठे आपण राष्ट्रवादापर्यंत पोहचू शकू. ही प्रक्रिया म्हणजे रसायनशास्त्रातील काही संप्लवन प्रक्रिया नाही मधली पायरी सोडून थेट वरच्या पायरीवर उडी घ्यायला. त्यामुळे आपणांस एक एक पायरी चढावी लागेल. आज भारताचा डंका दसदिशात निनादत असताना आपली अवस्था दिव्याखाली अंधार अशी होऊ नये, यासाठी आपणासच काळजी घ्यावी लागेल. उपजाती आणि जातींचे प्रश्न सोडून थेट राष्ट्रवादावरील आपले लक्ष केंद्रित करणे हे मूलभूत प्रश्नांवरून लक्ष विचलित करणारे ठरू शकते. देशांतर्गत असणारे आपले जातीय प्रश्न आणि जगासोबतचे आपले धावणे याचा सुयोग्य मेळ तेव्हाच बसेल जेव्हा आपण प्रबोधनातून समाज विकास आणि भारतीय उदात्त विचारांची आंतरराष्ट्रीय पेरणी ह्याचे योग्य नियोजन करू. अन्यतः कंबरेचे सुटले पण खुंटीवरचेही पोहचत नाही अशी अवस्था होऊ नये. त्यामुळे अगोदर प्रत्येकाने येथील जातवास्तव समजून घेतले पाहिजे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



सागरकुमार झनके
संपर्क क्र. 9822575244

# पाऊस, वारा अन् मी

आधुनिक केसरी

**कोकिळेच्या कुहूकुहू आवाजाने जाग आली आणि झोपेतून उठलो. आमच्या घराच्या शेजारी एक मोठं पिंपळाच झाड आहे .त्या झाडावर ती कोकीळा सकाळी सकाळी आपल कहूकुहू संगीत चालू करते. आवाज ऐकतांना मन एकदम प्रसन्न होवून जातं. मी घराबाहेर आलो. आकाशात ढग दाटीवाटीने जमा होत होते. काळे काळे ढग एकावर एक आदळत होते. एक दिवसाअगोदरच पाऊस येवून गेला होता. यावर्षी पावसाचं एक महिना उशीरा आगमन झालं. त्यामुळे रुसून बसलेल्या पावसाच सर्वांनीच आनंदान स्वागत केलं. कडाकाच्या उनातून सूटका होवून वातावरणात गारवा निर्माण झाला होता. मोसमी वाऱ्याचा हा पाऊस सर्वांसाठी फार महत्वाचा.**

मी आपली सहज समोर नजर टाकली.एरव्ही आमच्या दारात उभ राहिल्यावर सातपुड्याचं मनोहरी, विलोभनीय,विहंगम दृश्य नजरेस पडतं.निळाईन व्यापलेला तो डोंगर आज धुक्याच्या सावटात गुडूप झाला होता. मेघराज्याने त्याला आपल्या बाहूपाशात कैद केले होते. त्यामुळे  सातपुडा पर्वत हरवलाय की काय अस वाटत होत...

कालच्या पावसान वातावरन थंडगार होतं.वाऱ्याची थंडगार झुळूक माझ्या अंगाला झोबत होती.सकाळच प्रसन्न वातारण.गावातील शांतता. दाटीवाटीने भरत चाललेला अंधार.पावसाची रिमझिम सार कस मनाला आनंदविभोर करनारं...काहिकाळ आपण हिमालयाच्या सानिध्यात आहो की काय असा भास होत होता. अंगात भरनारी थंडी,थंडीन जीवाची होत असलेली तगमग,पण काहीका असोना फार बरं वाटत होत.असलं वातावरण प्रत्येकालाच हवहवस वाटतं. पहिल्या पावसात भिजण्याचा आनंद काही औरच.त्यात प्रीयकर आणि प्रीयसीसाठी तर जंन्नतच....एका कविने फार सुंदर लिहिले आहे  "पाऊस कधीचा पडतो

**झाडाची हलती पाने,**
**हलकेच मज जाग आली**
वाऱ्याच्या मंद सुराने"

पावसात भिजनं,खेळन,बागळन धंम्माल मजा करण प्रत्येकालाच आवडतं.सुरवातीपासूनच पाऊस मला आवडायचा तो आजही आवडतो.पावसाच मला विषेश आकर्षण. या पावसाने मला हसवलय अन् रडवलही... पण त्याची अन् माझी मैत्री आजही घंट्ट आहे.आम्ही लहान असतांना आमच्या घरी छत्री नव्हती तेव्हा आम्ही घरातील एखादी पोतळी किंवा पोत्याची घोगडी करत असू आणि तीच अंगावर घेवून शाळेत जात असू.ज्यांना घराबाहेर जायच ते या एकाच घोगडीचा वापर करायचे.ते दिवस फार कठीण होते.घरी गरिबी होती.पण आम्ही त्याचं कधी आम्ही भांडवल केलं नाही.फाटक्या पण नेटक्या कपड्यात आम्ही राहिलो. आई,बाब आन् आम्ही सात भावंड.सार घर कस गंच्च भरलेलं असायचं.घर आमच साधं मातीचच होत.मातीच्या भिंती अन् घरावर टीन.त्याच्यासमोर स्वयंपाक करायला एक ओसरी होती.त्याच्यावर कौले हैती.पावसाळ्यात आमचं घर गळायचं.ज्या ठिकाणी टीनातून पाण्याचे थेंब जमीनीवर पडायचे त्या ठिकाणी एखाद भगून किंवा एखादा तांब्या बटलूय ठेवयचो.रात्री झोपतांना पाऊस सुरू असला तर त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागे.कारण पाण्यान ते भांड भरलं तर साऱ्या घरात पाणी व्हायचं त्यामुळे कितीही झोप असली तली उठावच लागे...

असा हा पाऊस कधी साथ देणारा तर कधी सोडणारा. पावसाच्या या  रिमझीम सरी अंगाखांद्यावर झेलत मनमुक्त आनंदी जगण प्रत्येकालाच आवडतं.काहीही असो पण या पावसाच अन् माझं नात कालही घंट्ट होत आजही घंट्ट आहे आणि उद्याही घंट्टच राहणार.त्याची अन् माझी मैत्री यापुढेही अशीच अबाधीत राहील.।।बा..पावसा एक मित्र म्हणून तुला एक सांगावस वाटत.तु या वर्षी येण्यास फार उशीर केला.दरवर्षी पावसाळ्यात तु यायचा आता मात्र तू तीनही ऋतूत भेटतो. तू हिवाळा अन् उन्हाळ्यात नाही भेटला तरी चालेल पण पावसाळा हा तुझा हंक्काचा...यात तर तुला यावच लागेल.तू असा एक एक महिना रुसून बसला तर आमचा जीव टागणीला लागतो.जून महिण्यापासून आम्ही तुझी आतुरतेने वाट पाहत होतो.मृग नक्षत्र उलटून गेले तरी तू  आला नाही. आमची चींता नाही कारे तुला.आम्ही सारे तुझ्या भरवशावर असतो.सारी पृथ्वीच तुझ्यावर अवलंबून आहे.हो मला कळतं.आम्ही माणसाने यात हस्तक्षेप केलाय.बेसुमार जंगलतोड,काँक्रीटीकरण, प्रदूषण यामुळे निसर्गाचा समतोल बिघडलाय.त्याचा विपरीत परिनाम होत चाललाय.पण काय सागू आम्ही माणस फार स्वार्थी. आमच्या स्वार्थासाठी आम्ही काहीही करायला तयार असतो. आम्ही तुला विश्वास देतो अन् घेतो.आम्ही  झाडांची लगवड करू,पर्यावरणाला जपण्यासाठी जीवाच रान करु.यापुढे आम्ही तुझ्यात हस्तक्षेप करणार नाही.....

तू या वर्षा थोडा उशिरा आला पण तू मनसोक्त बरस. आमच्या शेतकरी राज्याला चींब भिजव...धरणी मातेला चागल सजव...नदीनाले बारमाही वाहू दे.लहान मोठे धरणे पाण्यान भरू दे.शेतातील पिके चागली येवू दे.विहिरिंना काठोकाठ भरू दे.अन् तुझ्या येन्याने काळ्या  मातीच्या दरवळणाऱ्या सुवासाच्या अंत्तरात माझं तन मन प्रफुल्लित होवून जावू दे....



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# समृद्धीवरील अपघातात २५ जणांचा कोळसा

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** नागपूरहून पुण्याला येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसला समृध्दी महामार्गावर बुलडाणा - सिंदखेडराजा येथे अपघात होऊन २५ हून अधिक प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद, वेदनादायी आहे. समृध्दी महामार्गावर बसचा टायर फुटल्याने बस दुभाजक व खांबाला धडकली आणि बसने पेट घेतला. या भीषण दुर्घटनेनंतर समृध्दी महामार्गावरील वाहनांच्या आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा प्रकर्षाने ऐरणीवर आला आहे. अशा अपघातांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून राज्य शासनाने तज्ज्ञांच्या सल्ल्याने यावर तात्काळ उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे अशी मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे.

दरम्यान आजच्या भीषण बस दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या प्रवाशांना अजित पवार यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. शिवाय दुर्घटनेत जखमी प्रवाशांना शासनामार्फत चांगले उपचार मिळून ते लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थनाही केली. समृद्धी महामार्गावर सुरुवातीपासून अपघातांची मालिका सुरु आहे. या अपघातात अनेक नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. समृद्धी महामार्गाच्या सदोष निर्मितीमुळे आणि मानवी त्रुटींमुळे हे अपघात घडत असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणीही विरोधी पक्षांच्यावतीने सातत्याने करण्यात आली आहे. शासनाने आतातरी या मागणीचा गांभीर्याने विचार करावा असे स्पष्ट मत अजित पवार यांनी व्यक्त केले आहे.

समृद्धी महामार्गाचा प्रवास सुरक्षित होण्यासाठी तज्ज्ञांमार्फत अभ्यास करण्यात येईल . त्यांच्या सूचनांनुसार उपाययोजना प्राधान्याने अमलात आणण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली . समृद्धी महामार्गावरील खाजगी प्रवासी बसचा अपघात रात्री दोन वाजता झाला . या अपघातस्थळाला मुख्यमंत्री शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत भेट दिली . यावेळी मंत्री गिरीश महाजन, संदिपान भुमरे, पालकमंत्री गुलाबराव पाटील, खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय रायमुलकर, आकाश फुंडकर, श्वेता महाले, विभागीय आयुक्त निधी पांडेय, विशेष पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे, जिल्हाधिकारी डॉ . एच . पी . तुम्मोड, पोलीस अधीक्षक सुनील कडासने आदी उपस्थित होते . मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, समृद्धी मार्गावरील अपघात हा दुर्दैवी आहे . समृद्धी महामार्गावरील अपघात अतिवेग आणि वाहनचालकांना झोपेची डुलकी आदी कारणामुळे घडतात . असे अपघात घडू नये यासाठी काळजी घेणे गरजेचे आहे . अपघात रोखण्यासाठी ज्या ज्या उपायोजना करणे गरजेचे आहे, त्या शासन स्तरावरून गांभीर्यपूर्वक व प्राधान्याने करण्यात येईल . अपघाताच्या पार्श्वभूमीवर स्थानिक यंत्रणा अपघातस्थळी पोहोचली . बसचा मुख्य दरवाजा बंद असल्यामुळे प्रवाशांना बाहेर येता आले नाही . त्यामुळे मृतांच्या संख्येत वाढ झाली . तसेच चालकांचे समुपदेशन केले जाते . वाहन किंवा वाहनचालक योग्य पात्रतेचे नसल्यास त्यांना परत पाठवले जाते . यामुळे प्रवाशांची आणि वाहनचालकांची नाराजी होते . सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून नियमांचे पालन करून वाहतूक नियंत्रण केले जात आहे .

# वेगळ्या विदर्भाला जनतेचे समर्थन नाही

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वेगळ्या विदर्भाच्या आंदोलनात १००-२०० लोकांपेक्षा जास्त लोक येत नाहीत. वेगळ्या विदर्भाच्या मुद्याला जनतेचे समर्थन नाही. जोपर्यंत जनतेचे समर्थन मिळत नाहीत तोपर्यंत वेगळा विदर्भ कसा होईल, असे परखड मत नागपूरचे खासदार व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मांडले आहे.

रामदासपेठ येथील एका हॉटेलात आयोजित कार्यक्रमांतर्गत शुक्रवारी त्यांची मुलाखत घेण्यात आली. यावेळी त्यांनी विदर्भाचा विकास, वेगळा विदर्भ यावर मते व्यक्त केली. वेगळ्या विदर्भाची मागणी आता बाजूला पडली काय, असा प्रश्न गडकरी यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, मी तर याबाबत कधीच बोलत नाही. आमच्या पक्षाने ज्यावेळी वेगळा विदर्भाचा ठराव घेतला, त्यावेळी मला समर्थन असल्याचे वाटत होते. पण या विषयाला जनतेचे समर्थन नाही. विदर्भाच्या आंदोलनात १००-२०० लोकांपेक्षा जास्त लोक येत नाहीत. जर उद्या या आंदोलनात दहा हजार, एक लाख आले आणि दिवंगत जांबुवंतराव धोटे यांच्यासारखे आंदोलन झाले तर त्यामध्ये मीपण सामील होईल. जोपर्यंत जनतेचे समर्थन वेगळ्या विदर्भाच्या आंदोलनाला मिळत नाहीत तोपर्यंत वेगळा विदर्भ कसा होईल, असा सवालही त्यांनी केला. गडकरींच्या अजेंड्यावर वेगळा विदर्भ कुठे आहे, असा सवाल करण्यात आला. त्यावर ते म्हणाले, विदर्भावर अन्याय होत होता, विदर्भात रोजगार, उद्योग नव्हते. येथील जंगल विकसित झाले नव्हते. परिणामी विदर्भाचा विकास झाला नाही. त्यामुळे वेगळ्या विदर्भाची मागणी पुढे आली होती. महाराष्ट्रात राहून विदर्भाचा विकास होण्याकरिता गेल्या आठ-नऊ वर्षांत जेवढी कामे केली तेवढी ६०-७० वर्षांत झाली नाही. चांगले रस्ते बनले. चांगले उद्योग यायला लागले. बघता-बघता विदर्भ बदलला आहे. विदर्भाच्या लोकांना विदर्भाच्या राजकारणात रुची नाही.


# इटोली जि.प. शाळेत वसंतराव नाईक जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा इटोली येथे हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांची ११० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महानायक वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व सहशिक्षक भास्कर चव्हाण यांनी वसंतराव नाईक साहेबांचे बहुआयामी कार्य विद्यार्थ्यांना मार्मिक शब्दांत पटवून देत कृषीदिनाचे महत्व सांगत वृक्षावल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे एक मुल एक झाड लावण्यासाठी प्रेरित केले. शाळेतील कौशल्या नागरगोजे, गणेश येलाले कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले तसेच सर्व शिक्षकवृंद व अंगणवाडी सेविका आदि आवर्जून उपस्थित होते.





# दौलताबाद घाटात वाहतुकीचा खोळंबा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** घाटातील ऐतिहासिक दिल्ली गेट वर पुन्हा वाहतुकीची कोंडी झाली. दौलताबाद किल्ला, भद्रामारोती, घृषणेश्वर मंदिर वेरूळ लेणी बघण्यासाठी व दर्शनाकिरिता जाणाऱ्या भाविकांची पर्यटकांची मोठी गर्दी झाल्याने व त्यांच्या वाहनांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने देवगिरी दौलताबाद घाटातील तब्बल दोन ते तीन तास ट्राफिक जाम झाली होती. एरवी दिसणारे वाहतूक पोलीस पण गायब होते. मात्र वाहतूक सुरुळीत करण्याकरिता देवगिरी दौलताबाद पोलीस कसरत करताना दिसले. दिल्ली दरवाजा येथे एका वेळी एकच वाहन जाते पण काही वाहन चालक आपली वाहने पुढे घालतात. यामुळे ट्रॅफिक जाम होते. नेहमी छावणी वाहतूक पोलीस येथे तैनात असतात पण आज शनीवार असून सुद्धा येथे एकपण पोलीस कर्मचारी उपस्थित नव्हता. देवगिरी दौलताबाद पोलीस ठाण्याचे कर्मचारी ट्रॅफिक सुरळीत करण्याचा प्रयत्न करत होते दुपारी दोन वाजेपासून ट्रॅफिक जाम सुरू होते दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगच राग लागली होती वाहतूक ठप्प असल्याने अनेक प्रवासी व पर्यटकांनां झालेला मनस्ताप त्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होता.





महाराष्ट्र Business Katta












# शैक्षणिक तंत्रज्ञानातील प्रगती किती फायदेशीर ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आज मानवी जीवनावर वैज्ञानिक शोध आणि शोधांचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येत आहे.शिक्षण क्षेत्रही यातून सुटलेले नाही. शिक्षणावरही तंत्रज्ञानाचे वर्चस्व आहे. शिक्षक जेव्हा आपले अध्यापन प्रभावी करण्यासाठी विविध माध्यमांची मदत घेतो, ज्यामुळे अध्यापन आणि दृष्टीकोन या दोन्हींवर परिणाम होतो, तेव्हा त्याला अध्यापन तंत्रज्ञान म्हणतात, जे सध्या 'एज्युटेक' म्हणून लोकप्रिय आहे. या तंत्राचे मुख्यतः दोन मुद्दे आहेत- अध्यापनाची उद्दिष्टे साध्य करणे आणि अध्यापन प्रक्रियेचे यांत्रिकीकरण. गेल्या दशकात असे दिसून आले आहे की शैक्षणिक तंत्रज्ञान वाढत्या प्रमाणात मोठी बाजारपेठ आणि ग्राहक तयार करण्यात सक्षम झाले आहे. अलीकडच्या काळात 'एज्युटेक स्टार्टअप्स' हे कोट्यवधींचे व्यवसाय बनले आहेत आणि अनेक शक्यतांसह त्यांची प्रगती होत आहे. तसे पाहिले तर 'एज्युटेक ॲप'ने भरलेले स्मार्ट फोन आता शिक्षणाचा समानार्थी शब्द बनले आहेत.**

संशोधनातून असे दिसून आले आहे की भारतातील एज्युटेक हे जगातील सर्वात मोठ्या उद्योगांपैकी एक आहे ज्यामध्ये विविध क्षेत्रे आणि उप-क्षेत्रांमध्ये सुमारे 400 स्टार्ट-अप उद्योजक आहेत.विशेष म्हणजे, भारताची लोकसंख्या जगातील सर्वात मोठी आहे आणि शिक्षणाची चिंता आणि शक्यता येथे तुलनेने अधिक आहेत. लोकसंख्याशास्त्रीय लाभांश, तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा आणि वाढती बाजारपेठ एज्युटेकसाठी आकार घेत आहेत.स्वस्त इंटरनेटची उपलब्धता आणि कमाईचे वाढते स्रोतही या उपक्रमाला चालना देत आहेत. यातून पुढील पंचवीस वर्षांत 100 कोटी विद्यार्थी पदवीधर होतील असा अंदाज आहे. तथापि, भारतातील जलद डिजिटायझेशन आणि 2010 ते 2022 दरम्यान इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येत 10 पटीने झालेली वाढ हे सूचित करते की यात आणखी वेगाने वाढ होत राहील.2040 पर्यंत, सध्याचे इंटरनेट वापरकर्ते, जे सुमारे 90 कोटी आहेत, ते 1.5 अब्जचा आकडा ओलांडतील.

एक मात्र खरे की, कोविडमुळे एज्युटेकमध्ये अचानक तेजी आली.तेव्हापासून सुरू झालेली ही प्रक्रिया आता जगात एज्युटेक उद्योग म्हणून ओळखली जाते. 1995 नंतर जगातील तांत्रिक विकासाचा वेग झपाट्याने वाढला आहे आणि कोविड नंतर तर ते शैक्षणिक तंत्रज्ञान म्हणून अधिक लोकप्रिय झाले आहे. एका सर्वेक्षणात असेही दिसून आले आहे की भारतातील तेहतीस टक्के पालक या वस्तुस्थितीबद्दल खूप चिंतित आहेत की आभासी शिक्षण म्हणजेच 'व्हर्च्युअल लर्निंग' मुलांच्या शिक्षणावर आणि स्पर्धात्मक कार्यक्षमतेवर वाईट परिणाम करत आहे.एवढेच नाही तर एज्युटेकला मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शिक्षण पद्धतीत मनोरंजनाच्या उपक्रमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. भारताची डिजिटल शैक्षणिक रचना किती फोफावत आहे, हे वरील आकडेवारीवरून सहज समजते.

देशात 'नॅशनल डिजिटल एज्युकेशन आर्किटेक्चर' तयार करण्यात आले आहे. 'पीएम ई-विद्या कार्यक्रम 2020' अंतर्गत 'ई-लर्निंग' सुलभ करण्यासाठी, ते शाळांमध्ये सुरू करण्यात




आले आहे. पंचवीस कोटी शालेय विद्यार्थी आणि सुमारे चार कोटी उच्चशिक्षित विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. ई-पाठशाळा पोर्टल, स्वयंप्रभा, दीक्षा इत्यादी असे कार्यक्रम आहेत जे डिजिटल शिक्षणाच्या दिशेने सतत कार्यरत आहेत. गेल्या दहा वर्षांत स्मार्ट फोनच्या किमतीत सातत्याने घट होत आहे आणि भारत हा जागतिक स्तरावर सर्वात स्वस्त मोबाइल डेटा दरांपैकी एक आहे, ही देखील एक सकारात्मक बाब आहे. डिजिटल पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याच्या सरकारच्या स्वारस्यामुळे एज्युटेकलाही चालना मिळाली आहे. राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशन, डिजिटल इंडिया आणि डिजिटल क्रांतीमुळे 'एज्युटेक'ला दुर्गम भागात पोहोचणे सोपे झाले आहे. शिक्षणाच्या बाबतीत 'एज्युटेक' हे सुलभ माध्यम बनले असले तरी, भारतातील गरिबी आणि उपासमार यामुळे करोडो मुले या सुविधांपासून वंचित आहेत. ग्लोबल हंगर इंडेक्सनुसार भारतात तुलनेने भूक वाढली आहे, तर गरिबी देशाची पाठ सोडायला तयार नाहीये. बेरोजगारीच्या दरानेही भयावह रूप धारण केले आहे. शैक्षणिक तंत्रज्ञान आजच्या काळात उपयुक्त आहे आणि शैक्षणिक समस्यांचे निदान करण्यात ते पुढे जात आहे, परंतु डिजिटायझेशनच्या पायाभूत सुविधा इतक्या सामान्य झालेल्या नाहीत की त्या प्रत्येकाच्या शिक्षणासाठी पूर्णपणे उपलब्ध होऊ शकतील.या तंत्रज्ञानामुळे शिक्षणाशी जोडले जाणे सोपे झाले आहे यात मात्र शंका नाही. शिकण्याची प्रक्रिया तुलनेने मनोरंजक झाली आहे. विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणाहून सर्व माहिती मिळत आहे. गृहपाठ असो किंवा इतर कोणताही उपक्रम, तंत्रज्ञानाच्या मदतीने सर्व काही एका छोट्या उपकरणात उपलब्ध झाले आहे. परंतु सर्व काही सोयीस्कर असूनही शिक्षणाच्या या जगात तंत्रज्ञानाचे काही तोटे आहेत.

शिक्षणाच्या या मशिनमध्ये सोशल मीडियापासून अनेक अनुत्पादक कृतींमुळे विद्यार्थीही भरकटत आहेत.संशोधनातून असे दिसून आले आहे की तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांमध्ये भरकटण्याची स्थिती निर्माण होते. सर्वेक्षणांनुसार, अशी परिस्थिती उद्‌भवते ज्यामुळे बऱ्याच मुलांना मानसशास्त्रज्ञांकडे न्यावे लागते. शिक्षणाचे तंत्रज्ञान कधी मानसिक जखम बनले याचा अंदाज क्वचितच कोणी बांधू शकेल.स्मार्ट फोन आणि लॅपटॉपवर सतत काम केल्यामुळे मुलांच्या पाठ, खांदे आणि डोळ्यांमध्ये दुखू लागते. मुलांच्या दिनचर्येतही खूप बदल झाला आहे.त्याच्या स्वभावात चिडचिडेपणा आला आहे. ते ऑनलाइन जगात इतके हरवून गेले आहेत की समोरासमोर बोलणे अनेकांसाठी अस्वस्थ करणारे ठरते. तसं पाहिलं तर एज्युटेकला सकारात्मक संदर्भ आहेत, परंतु ते समस्यांपासून मुक्तही नाही.

'एज्युटेक' च्या एकूण प्रभावाला योग्य दिशा देण्यासाठी आणि निश्चित मापदंड तयार करण्यासाठी तंत्रज्ञान आणि पारंपारिक शिक्षण पद्धती यांचा समतोल राखणे महत्त्वाचे आहे.तंत्रज्ञान हा शेवटचा उपाय आहे हे समजून घेणे हा विचार फारसा तर्कसंगत नाही. एज्युटेकद्वारे शिक्षणात प्रवेश शक्य आहे, परंतु त्यामुळे ती अतिशयोक्ती होईल.उच्च कार्यक्षमता, प्रचंड संधी आणि अनेक स्तरांवर शिक्षणात परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता एज्युटेकचे वैशिष्ट्य आहे.पण या एज्युटेकने शिक्षणाला उत्पादन म्हणूनही सेवा दिली आहे. विद्यार्थी कंपन्यांचे ग्राहक बनले आहेत, जे शैक्षणिक दृष्टिकोनातून चांगले लक्षण नाही. डिजिटल शिक्षणाचे मानसिक आणि सामाजिक परिणाम आता थेट दिसून येत आहेत.त्याचा परिणाम पालकांच्या मनावरही स्पष्टपणे दिसून येतो. असे असूनही आता एज्युटेकशिवाय शिक्षणही शक्य नाही.

तसे पाहायला गेले तर भारतात शिक्षण तंत्रज्ञानाचा वापर 1980 च्या दशकातच आढळून आला, जेव्हा काही शाळांमध्ये संगणक शिक्षण सुरू झाले. जोपर्यंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनातून डिजिटल प्रणाली उपयुक्त मानली जात नाही, तोपर्यंत लॅपटॉप, मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे अ-उत्पादक पद्धतीने वापरली जातील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे सर्वांगीण शिक्षणाच्या संकल्पनेसह अंतर्भूत आहे.एज्युटेक प्रोग्राम्सनी हे सुनिश्चित केले पाहिजे की सर्वांगीण शिक्षणाचा मूळ गाभा पर्यावरणीय जबाबदारी, तसेच शाश्वत विकास आणि मानवी मूल्ये, व्यक्तिमत्व आणि मानसिक-सामाजिक अभिमुखता आणि स्थितीसह एकत्रित करतो. हे विसरता कामा नये की, कोणत्याही देशाचा वर्तमानकाळ त्याच्या भविष्याचे संकेत देतो.सध्या एज्युटेक ज्या प्रमाणात विस्तारत आहे ते केवळ शिक्षणालाच बळकट करणार नाही, तर नवीन आव्हाने आणि संघर्ष यांनादेखील समोर उभा करू शकेल

# 'सुरक्षित लैंगिक शिक्षण' काळाची गरज



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**शालेय जीवनात लैंगिक शिक्षणाचा समावेश केल्यास त्याचा नकारात्मक परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होईल म्हणून काही संस्था, संघटना व बुद्धिजीवी लैंगिक शिक्षणाला विरोध करतात. भारतीय कुटुंबांमध्ये आजही लैंगिक शिक्षणाचा विषय निघाला की भुवया उंचावल्या जातात. पण आताच्या काळात पालकांना हे समजणं अतिशय गरजेचं आहे की मुलांच्या भविष्य आणि वर्तमानास सुरक्षित ठेवण्यासाठी लैंगिक शिक्षण देणं अतिशय आवश्यक आहे. योग्य शिक्षण नसल्याने मुलांकडून अनेक अशा चुका घडू शकतात किंवा मुलं संकटात सापडू शकतात, ज्याचे परिणाम संपूर्ण कुटुंबीयांना भोगावे लागू शकतात. लैंगिक शिक्षणाच्या अभावी एक धक्कादायक प्रकरण केरळ राज्यातून समोर आले आहे.**

अल्पवयीन बहिण-भावाच्या संबंधातून एका बाळाचा जन्म झाला आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाने असे प्रकरण रोखण्यासाठी 'सुरक्षित लैंगिक शिक्षणासाठी एक समिती स्थापन करण्याचे सुचवले आहे. केरळ उच्च न्यायालयाने सरकारला समिती स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये 'सुरक्षित लैंगिक शिक्षण' लागू करावा, अशा सुचना न्यायालयाने केल्या आहेत. तसेच याप्रकरणी न्यायालयाने मुख्य सचिवांना योग्य ती कारवाई करण्यास सांगितले आहे.

लैंगिक शिक्षण ही संज्ञा कामजीवन, प्रजनन आणि गुप्तांगांबद्दल दिलेल्या माहितीसाठी वापरली जाते.लैंगिक शिक्षणात नुसती एखादी शरीराच्या भागाची माहिती करून घेणे अभिप्रेत नाही, तर त्या अनुषंगाने होणाऱ्या भावनिक बदलांशी जुळवून घ्यायला शिकवणे, भावभावनांच्या आंदोलनांना संयमित करायला शिकणे या गोष्टीही येतात. लैंगिकतेशी संबंधित विचार 'विवेकपूर्ण' बनवणे अभिप्रेत आहे. पालक, मोठी भावंडे, शिक्षणसंस्था आणि वैद्यकीय संस्था हा या प्रकारचे शिक्षण देण्याचा एक योग्य मार्ग समजला जातो.

भारतासारख्या उष्ण कटिबंधात मुले-मुली पौगंडावस्था ( वयात येण्याचे ) वय हळूहळू कमी होत चालले आहे. वयाच्या दहाव्या वर्षी मुलीला मासिक पाळी सुरू झाल्याची उदाहरणे समोर येत आहेत. या वयात मुलीचे शरीर तयार होत असले तरी तिचे मन एका बालिकेचेच असते. तिला तिच्यात होणाऱ्या बदलांची योग्य ती जाणीव करून देणे आवश्यक आहे.

आता शालेय वयापासून मुलं-मुली हे स्मार्टफोन, इंटरनेट वापरतात. विशेषतः इंटरनेटवर अक्षरशः लाखोंच्या संख्येने उपलब्ध असणारी पोर्नोग्राफिक संकेतस्थळे आणि त्यातून दाखवली जाणारी लैंगिक विकृती, भारतात अगदी सहजासहजी उपलब्ध असणारे लैंगिक साहित्य आणि पोर्नोग्राफिक फिल्म्स यांच्या नकारात्मक परिणाम मुलांवर होऊ नये म्हणून त्यांना निकोप कामजीवनाची ओळख, स्वतःच्या शरीराची ओळख शाळेतच करून दिली पाहिजे. तसेच समाजात बलात्कार, लैंगिक आत्याचाराच्या घटना, अल्पवयीन मुलींना वैश्याव्यवसाय करायला लावणं, अशा अनेक घटना घडतात. यामागे अनेक कारणं आहेत, पण एक महत्त्वाचं कारणं, ते म्हणजे 'लैंगिक शिक्षणा'चा अभाव ! मुलांना शाळेत पचनसंस्था, मज्जासंस्था वगैरेंसोबत मानवी प्रजननासाठी उपयुक्त ठरणारे अवयव, कार्य इत्यादींवरही एक धडा आहे. पण केवळ मुलांच्या वा केवळ मुलींच्या शाळेमध्ये ह्या धड्यातील काही भाग शिक्षक शिकवतात. परंतु, पचनसंस्था वा मज्जासंस्थेवरील धडा जेवढा खोलात जाऊन शिकवला जातो, तेवढाच प्रजनन संस्थेची माहिती देणारा धडा वरवर शिकवला जातो. मुले-मुली एकत्र असलेल्या शाळांत शिक्षक/शिक्षिकांना अत्यंत अवघडल्यासारखे वाटल्यामुळे अनेकदा हा धडा न शिकविण्याकडेच कल दिसून येतो. तसेच ह्या धड्यावर एकही प्रश्न परीक्षेत विचारला जात नाही. हा विषय वगळून इतर धड्यांवर भर देणे सहज शक्य होते. मात्र हा स्वतंत्र विषय म्हणून अभ्यासक्रमामध्ये घेतला तर तो वगळणे शक्य होणार नाही आणि खात्रीपूर्वक शिकवला जाईल.

माध्यमिक शाळेपासूनच लैंगिक शिक्षण देण्याची व्यवस्था जगातील अनेक देशांमध्ये सुरू असताना, भारतासारख्या देशात मात्र भारतात अजूनही माध्यामिक शालांपासून तर महाविद्यालयीन स्तरापर्यंत लैंगिक शिक्षण आपण देवू शकलो नाही.या बाबत देशात अजूनही मतैक्य होवू शकले नाही.विशेषतः भारतातील सुमारे १५ हजार मुलांच्या मुलाखतीवर आधारित जो नवा पाहणी अहवाल प्रकाशात आला आहे, तो पाहिल्यावर तर देशातील प्रत्येकाचे डोळे उघडायला हवेत. लैंगिकता हा जर प्रत्येकाच्या जगण्याचा अविभाज्य भाग असेल, तर त्याबाबत कोणत्याही प्रकारच्या विकृत कल्पनांना अजिबात थारा असता कामा नये.मात्र लैंगिक शिक्षणा अभावी नाते संबंधाचा विसर देखील विसर पडत असल्याचे अनेकदा समोर आले आहे.

वयाच्या विशीच्या आतच लैंगिक अनुभव घेतलेल्या मुलांची टक्केवारी ३० एवढी असेल, तर हा प्रश्न गंभीर नाही, असे म्हणण्याचे धाडस कोण करील ? याच वयोगटातील किमान १७ टक्के मुलीही अशा अनुभवाला सामोऱ्या जात असतील, तर हा विषय अधिक काळजीने हाताळायला हवा, हे तरी लक्षात येण्यास हरकत नाही. असा अनुभव घेतलेल्या मुलांचे सरासरी वय १३.७२ तर मुलींचे वय १४.०९ असे आहे, असे या पाहणीवरून आढळून आले आहे. सर्वात धोकादायक बाब म्हणजे या वयात लैंगिक विकाराने घेरल्याचे प्रमाण खरोखरीच काळजी करण्यासारखे आहे. देशातील जर चार टक्के मुले आणि मुली अशा विकाराने ग्रस्त असतील, तर या प्रश्नाकडे अधिक समंजसपणे पाहायला हवे. सामाजिक माध्यमे, चित्रवाणी, नियतकालिके, इंटरनेट यांसारखी माध्यमे जर प्रत्येक मुलाच्या हाती असलेल्या मोबाइलमध्ये सामावलेली असतील, तर त्याचा उपयोग विकृतपणे होण्याची शक्यता अधिक. सध्याच्या सरकारने त्यावर शोधलेला उपाय म्हणजे इंटरनेटवर असलेल्या कामुक संकेतस्थळांवर बंदी घालण्याचा. कोणत्याही प्रकारची बंदी घातल्याने सगळे प्रश्न चुटकीसरशी सुटतील, हा भाबडेपणा झाला. उलट असे प्रश्न अधिक तीव्र रूप धारण करतात. विशिष्ट वयात मुलांना लैंगिकतेबद्दल शास्त्रशुद्ध माहिती देणे आवश्यक आहे, त्यामुळे विविध माध्यमांमध्ये असलेल्या विकृतीशी सामना




करण्याएवढी समज तरी निर्माण होऊ शकते. अज्ञानापोटी निर्माण होणारे कुतूहल शमवणे हा मूलभूत मानवी स्वभाव असतो. नेमके हेच या पाहणीतूनही आढळून आले आहे. विवाहपूर्वी लैंगिक सुख मिळवणाऱ्यांमध्ये मुलांची संख्या अधिक म्हणजे १५ ते २२ टक्के एवढी आहे. मुलींमध्ये हेच प्रमाण १ ते ६ टक्के एवढे आहे. अज्ञानापोटी विकृती येते आणि त्यातून असाध्य रोगांनी पछाडले जाते. सहजसुलभ मानवी प्रेरणांचे दमन करून त्या उफाळण्याची शक्यता अधिक असते, हे सूत्र लक्षात घेऊन योग्य वेळी मुलामुलींना लैंगिकतेबद्दल योग्य ती माहिती दिल्यास त्यातून उद्‌भवणारी आरोग्यविषयक चिंता दूर होण्यास मदत होऊ शकेल. लैंगिक शिक्षणाची टर उडवण्यात धन्यता मानणारे सगळे जण स्वतःचेच उदाहरण देत असतात. परंतु त्यांना परिसरात सध्या काय घडते आहे, याचे भान नसते. आधीच नाना विकृतींमुळे भारतात लैंगिकतेशी निगडित एड्‌ससारख्या रोगांनी थैमान घातले असताना, लहान वयातच लैंगिक शिक्षण देणे म्हणूनच अत्यावश्यक आहे.

तरुण प्रौढ जे नुकतेच यौवनावस्थेतून गेले आहेत, अशांना शरीरातील अंग व त्यांच्या पुनरुत्पादन क्षमतेविषयी ज्ञान असणे गरजेचे असते. या वयात लैंगिक शिक्षण हे फक्त पर्यायी शिक्षणाचा भाग नसून, त्याचे ज्ञान असणे किशोरांसाठी आवश्यक असते. त्यांना या वयात नातेसंबंधांविषयी व सुरक्षित संभोगाविषयी माहिती असणेही आवश्यक असते. जेणेकरून प्रसंग ओढावल्यास आपले वर्तन कसे असावे, याची जाणीव त्यांना होईल.सुरक्षित नातेसंबंध आणि लैंगिक शिक्षणा अभावी शाळकरी लहान लहान मुलं नको त्या गोष्टी करतात. केवळ शारीरिक आकर्षातून एकत्र येतात. लैंगिक संबंध स्थापित करतात हे करत असताना त्यांना नात व वय देखील कळत नसते.मात्र विरूद्ध लिंगी आकर्षणातून मुलं मुली जवळीक साधतात.

लैंगिंक शिक्षण ही काळाची गरज आहे. वास्तव म्हणजे `सेफ सेक्स" काय, "लो रिस्क बिहेव्हिअर" कशाला म्हणतात. शारीरीक संपर्काशिवाय किंवा अगदी अचूक सांगायचे झाले तर "बॉडी फ्लुईड एक्स्चेंज" शिवाय आनंद कसा मिळवायचा आदिची माहीती देणे आदि "लैगिक शिक्षणांतर्गत" अंतर्भूत नाही काय ? शिक्षक-पालक साधारण कधी ही माहीती देतात ? आणि देत नसतील तर हे आवश्यक नाही का ?

आपल्या पार्टनर सोबत प्रामाणिकता किती महत्त्वाची आहे हे पटवून देणं महत्त्वाचं आहे. एक मूल्य यापेक्षा व्यावहारीक स्तरावर किती महत्त्वाचे आहे याचा कशी उहापोह झालेला माझ्या माहीतीत नाही. नैतिक मूल्य-मूल्य म्हणून ती डोक्यावर घेतलेली गोष्ट आहे पण त्याच गोष्टीला जबरदस्त व्यावहारीक मूल्य आहेच हे कधी हायलाईट होत नाही. मुलांशी मनमोकळेपणाने बोलणे हे नैतिकतेइतकेच किंबहुना जास्त व्यावहारीक पातळीवरुन व्हायला पाहीजे. मुलांची मानसिकता समजून घेणं खूप गरजेचं आहे. त्यामुळे योग्य वयात मुलांना मार्गदर्शन मिळणं महत्त्वाचं आहे.

# नवीन शैक्षणिक धोरण नसून बहुजनांचे मरण आहे



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची (एनसीपी) अंमलबजावणी करण्यासंदर्भात जोरदार चर्चा चालू होती. परंतु त्या संदर्भातील आराखडा मात्र कोणत्याही विद्यापीठामध्ये तयार नव्हता. विषयाच्या संदर्भातील नियोजनही नव्हते. त्यामुळे विद्यापीठातील सर्व व महाविद्यालयातील सर्व प्राचार्य,प्राध्यापक गोंधळात पडले होते. नेमके करायचे काय? हा प्रश्न सर्वांनाच पडला होता म्हणून दिनांक ९ जून २०२३ रोजी राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात सुकाणू समिती आणि सर्व कुलगुरू यांची सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.**

या बैठकीत सुकाणू समितीच्या मार्गदर्शक सूचनानुसार पुढील शैक्षणिक वर्ष 2024 25 पासून सर्व विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये एनईपी अंमलबजावणीसाठी अंतिम आराखडा तयार करावा असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. त्यामुळे यावर्षीचे हे नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी प्रकरण पुढच्या वर्षावर गेले. खरे तर आज देशांमध्ये विविध ठिकाणी अनेक महाविद्यालयांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भामध्ये विविध चर्चासत्राचे आयोजन केले जाते. खरे तर हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण किती चांगले आहे, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे आहे, विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित करणारे आहे, त्यामधून विद्यार्थी निश्चितच स्वावलंबी बनणार आहे. असे बरेच काही चांगले चांगलेच सांगण्याचा सूर या विविध चर्चासत्रांमधून निघताना दिसतो आहे. अनेक जण उर बडवून, छाती ठोकून आणि उसनं आवसान आणून या चर्चासत्राची स्तुती करत आहेत. कौतुक करत आहेत. मला तर वाटतं की, हे चर्चासत्रे त्यांच्याच लोकांनी आयोजित करायला लावून हे शैक्षणिक धोरण किती चांगले आहे हे पटवून द्यायला सांगितले आहे. तसे पाहिले तर आपल्या देशात बिनडोक लोकांची संख्या जास्त आहे. तीही अडाणीपेक्षा शिकलेल्या लोकांमध्ये जास्त आहे. दुसरीकडे या नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षक होण्यासाठी लागणारी पात्रता म्हणजे डी.एड. हे बंद केले आहे. एम्. फिल बंद केले आहे. डिग्री चार वर्षाची केली आहे.कला, वाणिज्य व विज्ञान शाखा बंद करणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात प्राध्यापक भरती ही केवळ पाच वर्षासाठी राहणार आहे. पदवी डिग्री घेतल्यानंतर तुम्हाला पीएच्.डी करता येणार आहे. अगोदर पीएच्.डी ही पदव्युत्तर डिग्री घेतल्यानंतर करता येत होती. आशा अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी बंद करून नवीन गोष्टी सुरू केल्या आहेत. या नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थीच नव्हे तर प्राध्यापकही गोंधळून गेला आहे. रोज नवनवीन बातम्या टी.व्ही वर ऐकायला मिळतात आणि वृत्तपत्रातही वाचायला मिळतात. नेमकं नवीन शैक्षणिक धोरण हे कसे आहे अजूनही कुणालाच उमगना झाले आहे. आज जी काही शिक्षण व्यवस्था आहे. त्याच शिक्षण व्यवस्थेमध्ये कोरोनाच्या काळानंतर विद्यार्थी प्रचंड बदललेला दिसत आहे. अनेक वेगवेगळ्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये बदल झाले आहेत. एम.सी.क्यू पद्धतीने परीक्षा घेण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखन वाचनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. तो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होताना दिसत आहे. परीक्षेच्या काळामध्ये तर अनेक परीक्षेच्या हॉलमध्ये विद्यार्थ्यांची अनुपस्थिती दिसून येते आहे. विद्यार्थी अभ्यासापासून दुरावले आहेत. खरे तर आजच्या विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदललेलाआहे. शिक्षणामुळे नोकरी मिळते. जीवनमान सुधारते. आचारात,, विचारात, राहणीमानात, चालण्या बोलण्यातही बदल, फरक दिसून येतो. अशी भावना शिक्षण घेणाऱ्या मध्ये एकेकाळी प्रचंड असायची.ती असायलाही हवी. त्यामध्ये काहीही वावगं नाही. परंतु माहिती व तंत्रज्ञान युगामध्ये मोबाईलचा जमाना आला आणि विद्यार्थी अनेक गोष्टी पासून दुरावत गेला.मोबाईल इंटरनेट कमी पैशात देऊन अनेकांना चांगल्या गोष्टींपासून दूर लोटले गेले.मुद्दामहुन इंटरनेट व मोबाईल मध्ये त्यांना यामध्ये अडकवले गेले की काय अशी शंका येते.ती रास्तही आहे. मोबाईल एके मोबाईल असेच तो वागू लागला. मोबाईल ने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबतचा नकारात्मक विचार आला. मोबाईल मुळे विद्यार्थी सैरभैर झाला. अनेक चांगल्या सवयी संस्कारापासून दुरापास्त होत गेल्या. संस्कृती विसरत चालला आणि पुन्हा तेवढ्यात शासनाने ही कहर केला. वर्षानुवर्ष लोटत गेली पण नोकरीच्या जागा मात्र शासनाने काढल्या नाहीत. नेहमी आर्थिक कारणे दाखवून शासन नोकरीच्या बाबत उदासीन दिसते आहे. कुठलीही नोकर भरती शासनाकडून मुद्दामून काढली जात नाही. त्यामुळे शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या ही कमी झाली आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे लवकर भरती बाबत शासनाची



असलेली उदासीन भूमिका होय. शासनाने कॉन्ट्रॅक्ट पद्धतीआणली आहे. पैसे दिल्याशिवाय नोकरी नाही अशी परिस्थिती आहे. त्यात पुन्हा नशीन शैक्षणिक धोरणाने जोरदार उडी मारली आहे. नवीन शैक्षणिक धोरणात अनेक बदल केले आहेत.ते धोरण मात्र अनेकांना म्हणजे कळेनासे झाले आहे. खरे तर विषाची परीक्षा घ्यायची नसते. एखाद्याने विष प्राशन केल्यानंतर त्याची होणारी दैन्यवस्था किंवा मृत्यू यामुळे अनेक जण शहाणे होतात. त्या विषापासून अलिप्त राहतात. याविषयी दैनिक आधुनिक केसरी आलेल्या लेखात डॉ.मारोती तेगमपुरे म्हणतात की, " देशातील सद्यस्थितीतील नवीन शैक्षणिक धोरण काही लोकसमूहासाठीच शिक्षण या पायवाटेने जाणारे असून अधिकाधिक समूहांना शिक्षण क्षेत्राच्या बाहेर फेकण्याचे काम करणार असल्याचे स्पष्ट होते. नवीन शैक्षणिक धोरण लागू करताना किंवा त्यांची घोषणा करताना देशाच्या संसदेमध्ये त्याची चर्चाही होऊ नये हे खऱ्या अर्थाने दुर्दैवी आहे." या धोरणाची कुठेही जास्त वाचता होऊ न देता किंवा लोकांना सावध न करता ते सुरू करण्यात आल्याचे दिसते. अगदी त्याचप्रमाणे नवीन शैक्षणिक धोरणात झालेले जे काही बदल दिसतात ते बदल निश्चितच सर्वसामान्य माणसांच्या जीवनावर, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकास वाढीवर, विद्यार्थ्यांच्या करिअरवर परिणाम करणारे वाटतात. ते परिणाम योग्य दिसत नाहीत. विद्यार्थी अनेक चांगल्या गोष्टी पासून दूर लोटला जातो की काय अशी भीती आहे. महाराष्ट्र टाइम्स , पुणे च्या बातमीत प्रा. प्रतिमा परदेशी यांचे मत नोंदवले आहे. त्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत म्हणतात की," नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (एनईपी) कमी पटसंख्या असलेल्या महाविद्यालयाचे 'क्लास्टर'तयार करून त्या मोठ्या शिक्षण संस्थांच्या अधिपत्याखाली आणण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. पुण्यातील मोठ्या शिक्षण संस्था यापूर्वीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रभावाखाली गेले आहेत. आत्ता या संस्था क्लस्टरच्या नावाखाली छोटी महाविद्यालये गिळंकृत करतील. खाज राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा प्रमुख गाभा असून, एक प्रकारे बहुजनांच्या संघर्षातून, उभ्या राहिलेल्या सर्व शिक्षण संस्था मोडीत काढण्याचे ब्राह्मणी षडयंत्र म्हणजे हे धोरण आहे." अगदी त्याचप्रमाणे शासनाचे ही धोरण शिक्षणापासून अनेकांना वंचितच ठेवण्याचे दिसते आहे. खोट्या गोष्टी वारंवार सांगितले की त्या अनेकांना खऱ्या वाटायला लागतात अगदी त्याचप्रमाणे नवीन शैक्षणिक धोरणाच्या बाबतीतही घडताना दिसत आहे. त्या धोरणातील अनेक नियमात खेड्यापाड्यातील महाविद्यालये बसू शकतील की नाही हे सांगता येत नाही. म्हणजे कालांतराने अशी महाविद्यालय बंद पडतात की काय ? अशीही शंका बोलून दाखवली जाते आहे. एवढे खरे आहे की गेल्या अनेक वर्षापासून शिक्षण व्यवस्थेचा अगदी पद्धतशीरपणे गळा घोटणे चालू आहे. आज देशातली सर्वसामान्य माणसाची परिस्थिती केवळ शिक्षणामुळे बदललेली दिसून येते. शिक्षणामुळेच माणूस नानाविध क्षेत्रात क्रांती घडवून आणू शकतो. शिक्षणामुळेच देश प्रगतीपथावर जाऊ शकतो. तो महासत्ताही होऊ शकतो. परंतु आमच्या शिक्षण व्यवस्थेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांनाही पास करा, त्यांची परीक्षा पुन्हा घ्या, यूपीएससी न करणाऱ्यांनाही मागच्या दारातून आयएएस केले जात आहे असे अनेक गोंधळ राबवले जात आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात तर अनेकांचे डोके कुलूप बंद होण्यास मदतच होईल असेही वाटायला लागते. असे अनेक प्रश्न येणाऱ्या काळात शैक्षणिक धोरणातून निर्माण होतील असे वाटायला लागते.दि.१४ जून २०२३ रोजीच्या सकाळ मधील बातमी वाचली त्यामध्ये नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित एक दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळा नांदेड येथे आयोजित केली होती.यावेळी शिक्षणतज्ञ डॉ. शरद जावडेकर यांनी एक भीती व्यक्त केली ते म्हणतात की, "देशभरात लागू करण्यात येत असलेल्या नवीन शिक्षण धोरणातील शाळांचे समायोजन, विविध शिष्यवृत्तावर घालण्यात येणारी बंदी, वसतिगृहावरील खर्चात कपात, शिक्षणाच्या आर्थिक नियोजनातील राजकारण या आणि अशा अनेक कारणामुळे गोरगरिबांच्या मुलामुलींचे शिक्षण धोक्यात येणार असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे." म्हणून नवीन शैक्षणिक धोरण हे धोरण नसून मरण आहे असे वाटायला लागते. म्हणून सरकारने या सर्व गोष्टींचा विचार करून सर्वसामान्यांना शिक्षण मिळवून देऊन त्यांचे कल्याण कसे होईल व देश समृद्ध कसा होईल या दृष्टीने पाऊल उचलणे गरजेचे आहे.

# पाचवी आणि आठवीची ढकलगाडी बंद....!

आधुनिक केसरी

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गाच्या परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करणार आहे पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्वाचे टप्पे आहेत त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा जो निर्णय महाराष्ट्र राज्य शैक्षणिक मंडळाने घेतलेला आहे तो निश्चितच स्वागतार्ह आहे म्हणायला हरकत नाही आता नवीन शैक्षणिक धोरणानुसार पाचवी आणि आठवीच्या शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार आहे त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील गेली काही वर्षे सुरु असलेली ही ढकलगाडी आता बंद होणार आहे पाचवी आणि आठवी या वर्गांना पुन्हा गतवैभव प्राप्त होऊन विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ होणारं आहे पहिलीपासून परीक्षाचं नसल्याने विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाल्याने बहुतांश विषयात कच्चा राहु लागला होता त्याची गणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत होवू लागल्याने तिथे विद्यार्थी अपयशी ठरत होता आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी गांभीर्य रुजेल आणि शैक्षणिक गुणवत्तेची सुधारणा होण्यास मदत होईल शिक्षणाचा अधिकार कायदा 2009 यामध्ये महत्त्वाची तरतूद आहे. त्याला सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन म्हटले जाते. त्याच्या आधारे विद्यार्थ्यांना काय समजले ते पडताळून श्रेणी दिली जाते. त्यानंतर पुढच्या वर्गात त्यांना प्रवेश दिला जातो. त्यामध्ये बदल होऊन पाचवी आणि आठवीमधील विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षा बंधनकारक करण्यात आले असून अनुत्तीर्ण झाल्यास विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेचा पर्याय दिला जाणार असला तरी या निर्णयाची दुसरी बाजू जर नापास झाल्यास मुलींचे शिक्षणाचे प्रमाण कमी होवून शाळाबाह्य मुलांचे प्रमाण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही !

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**



# अज्ञानामुळे प्रेम विनाशाकारी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**प्रेम तपस्या , उर्जा , शक्ति, साधना , सत्य आहे. तपस्या, शक्ति,साधना, उर्जा, सत्य ह्या जीवनाचा उत्कर्ष करणार्या बाबी आहेत मग याच बाबी विनाश करू शकतील का? तर नक्कीच नाही मग विनाशाच्या मार्गावर जात ते काय असतं ते प्रेम नसुन ती विकृती अज्ञान आहे. जीवावर उठण एखाद्याच आयुष्य उध्वस्त करण अथवा आपलं आयुष्य उध्वस्त करत जीव घेणे अथवा देणे हि वृत्ती आणि कृती म्हणजे प्रेमाच्या नावाखाली पोसत असलेली विकृती अज्ञान आहे. प्रेम जीवन घडवतो उर्जा देते जीवन उद्ध्वस्त करत नाही.**

आणि जीवन उद्ध्वस्त करणारी वृत्ती आणि कृती म्हणजे वैचारिक दिवाळखोरी अज्ञान सदृश अंधकारमय अवस्था आहे.सत्य हे कधीच विनाशकाडे घेऊन जात नाही पण आपण सत्य स्वीकारू शकत नाहीत म्हणून गरजेला प्रेम हे गोंडस नाव देतो यापालिकडे आपलं प्रेम या विषयातील मुळ ज्ञान शुन्य असतं. म्हणून सगळे अनर्थ होतात. कारण गरज हि क्षणिक असते. गरज हि वैचारिक, मानसिक शारिरीक यापैकी कोणत्याही प्रकारची असु शकते. गरज निकड याला तत्व नसतं सत्व नसतं सत्य तर नसतंच. असत ते सगळं असत्यच आणि अभाशी अवास्तव त्या मधुन जवळीकता निर्माण होणं अथवा एकत्र येणं म्हणजे प्रेम नव्हे. प्रेम हि शक्ति असुन हि शक्ति वापरताना विवेक जागृत असेल तर हित कल्याण होत. आणि हिच शक्ति अविवेकावर वापरली तर आपसुकच विनाश होतो. मग उत्कर्षसाठी असणारी शक्ति आपण आपल्या विनाशासाठी का वापरावी. आज्ञानावर आधारीत आपण जे काही करतो त्याचे परिणाम विघातक येणारच आणि विनाश होणारच हे निश्चित आहे. आपण शक्ति कशी वापरतो आहेत त्या नुसार त्याचे
परिणाम येत असतात. पाया मजबूत असेल तर इमारत भक्कम असते. पण पाया दुबळा असेल तर इमारत फार काळ टिकत नाही. ज्ञानाचा तत्वांचा पाया असणार प्रेम चिरकाल टिकत. तिथं स्वार्थ,मोह,गरज, व्यवहार, नसुन फक्त समर्पण असतं . आणि ते सुद्धा एकतर्फी समर्पण तेव्हा त्या प्रेमाच पावित्र्य टिकत. पावित्र्य टिकविण्यासाठी समर्पण आवश्यक असतं. भाळण म्हणजे भावनेच्या लाटेवर वाहत जाणे याला कुठेही वास्तविक प्रेमाचा लवलेश गंध देखिल नसतो. जीवनात ज्ञान, धर्म, संस्कार, चरित्र आणि आचरण ह्या बाबी महत्वपूर्ण आहेत. एखाद्या व्यक्तिवर नियंत्रण स्थापित करून त्याला नजर कैदेत ठेवण त्याच्याच व्यक्तिगत हक्कावर व अधिकारा गददा आणुन मुक्तसंचारावर बंदी आणण आभाशी स्वप्न दाखवण अथवा असत्यावर स्वार होऊन भुलवन अमिष दाखवणं सत्या पासुन दुर ठेवणं म्हणजे अजिबात प्रेम नाही. निसर्गाच्या सगळ्या संकल्पना ह्या मानवी कल्याणासाठी आहेत पण आपण त्याचा गैर अर्थ काढतोय आणि चुकीच्या दिशेने वाटचाल करत मग योग्य दिशेला पोहचणार कसे. प्रेम सत्याचा आविष्कार,मुक्तसंचार जीवन प्रणालीचा स्वीकार करणं,बंधन मुक्त नियंत्रण मुक्त जीवन, देणारी व्यवस्था असुन जीवन घडविणारी भव्य दिव्य शक्ति आहे.पण आपण हि शक्ति अयोग्य पद्धतीने वापरून जीवन उध्वस्त करतोय. भावनेच्या आणि आज्ञानाच्या लाटेवर स्वार होणार प्रेम नसतं तर ती क्षणिक गरज असते जी आयुष्य उध्वस्त करण्यासाठी कारणीभूत ठरत असते. परंतु जर ज्ञान हा प्रेमाचा पाया असेल तर ते जीवन घडवत असतं आपल्या जीवनातील असंख्य



अडचणीच मुळ आज्ञान हेच आहे. आपण अत्यंत अल्प अथवा शुन्य ज्ञानावर त्याच प्रमाणे भावनेवर तरंगत प्रेम या शब्दाचा अर्थ लावतो आणि स्वतःच व आपल्याशी निगडीत व्यक्तिच देखिल जीवन उध्वस्त करतो. एखाद्या विशिष्ट व्यक्ति विषयी आपल्या मनात भाव निर्माण होण्यासाठी काहिच हरकत नाही पण हे विचार हे भाव विकृती अज्ञाना मध्ये रूपांतरीत होता कामा नये. आपली सद्भावना हि स्वच्छ व प्रमाणिक असली पाहिजे. भाव भावना हि जीवघेणी ठरत असेल तर मग उपयोग आणि अर्थ काय आहे. आपली सद्भावना हि त्या संबंधित व्यक्तिच आयुष्य घडविण्यासाठी उपयोगी आली पाहिजे. पण आयुष्य घडविण्या ऐवजी आपण बिघडविण्यासाठी हि शक्ति वापरतो. हे अंत्यंत दुर्दैवी आहे. संपुर्ण स्वातंत्र्य, हा विचार शाश्वत प्रेमचा पाया असतो. प्रेम हि निसर्गाने माणसाला दिलेली शक्ति आहे हि शक्ति जीवन घडविण्यासाठी साठी दिलेली असुन आयुष्य उध्वस्त करण्यासाठी ती अजिबात दिलेली नाही. सध्य स्थिती मध्ये आपण याच शक्तिचा उपयोग अज्ञानी अवस्थेत चुकीच्या पद्धतीने करतो आहेत. आणि त्याचा त्रास स्वतःला तर होतोच आहे पण इतरांना देखिल होतो आहे. समाजिक पातळीवर सध्या समाजात प्रेमाच्या नावाखाली प्रचंड अंधाधुंद चालू आहे. प्रेमातला प सुद्धा न कळणारे जीव प्रेमात आहेत व त्याच महत्व विशद करून याच प्रवाहात येण्याचं अनेक निमंत्रण देत आहेत हि खुप मोठी आश्चर्याची बाब असुन भयानक असं भीषण वास्तव आहे. जीवांवर उठण एखाद्याच आयुष्य उध्वस्त करण, संधीचा फायदा घेऊन मानसिक त्रास देणं,हे प्रेम मुळीच नाही. आपल्या आचरणातून आपल्या संपर्कातील व्यक्तिला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही पश्चात्ताप होणार याची काळजी दक्षता घेऊन केलेलं आचरण हे वेगळं असतं. मुळात प्रेम म्हणजे हिंसा नाही जिथे फक्त सात्विकता, सत्य, वास्तव असुन सगळ्यात मोठी बाब प्रेम हा व्यवहार नाही. निर्मळ प्रजांळ भावना ,वासना ,भुक , स्वार्थ , व्यवहार म्हणजे अजिबात प्रेम नाही. ती एक गरज आहे आणि गरज हि कायम नसते. प्रेम हे कायम असतं तहयात असतं आणि गरज क्षणिक असते. म्हणून गरज संपली कि ती संपुष्टात येते. आणि मग त्या मधुन जे काही पुढे घडत ते जीवन उध्वस्त करत अथवा भयानक असतं. म्हणून स्वतःचा विवेक जागृत असेल तर अज्ञान मार्ग चुकुन सुद्धा दिसत नाही अथवा आपला रस्ता चुकत नाही व जीवन देखील उध्वस्त होत नाही. म्हणून चुकीच्या विचारांना खतपाणी न घालता सत्याचा वेध घेतला पाहिजे सत्य कटु असतं पण सुंदर असत.जीवन यशस्वी होण्यासाठी सत्य सदैव क्षणोक्षणी कमी येत . खोट्या विचारांवर स्वार होऊन आयुष्य उध्वस्त करण्या ऐवजी सत्य स्वीकारून मार्गक्रमण करा हिच आजची गरज आहे.ज्ञान ,संस्कार, भक्कम ठेवा वाट चुकणार नाही आणि पश्चात्ताप होणार नाही.

# ताकाचे उपकार तरी करा



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**माणसाच्या जगण्याचे सर्वच विषय वाङ्ग्यीन निर्मितीचे स्त्रोत आहेत. त्यात अकराव्या शतकापासून विविध संतांनी आपले लेखन ईश्वर भक्तीच्या अनुषंगाने लिहिले असून त्यात सगुण आणि निर्गुण असे दोन्ही प्रकारचे वाङ्मय वाचायला मिळते. तसं पाहिलं तर बहुतांश कवी-लेखकांनी माणसातच ईश्वराचे अस्तित्व पहिले असून ईश्वर चराचरातील चांगल्या गोष्टीत व्यापला आहे. त्यासाठी सर्वांनीच सद्गुणात ईश्वर पहिला आहे. संत ज्ञानेश्वरांनी आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणवर्य । वसती जेथ ॥आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथात वरीलप्रमाणे सगुण ईश्वराचे वर्णन केले आहे. ईश्वर सगुण असून ज्याच्याकडे यश, कीर्ती, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य हे सहा सद्गुण आहेत तोच ईश्वर! त्यासाठी सगळीकडे विविध अभ्यासकांनी माणसांतच देव पाहिला.**


श्रीराम, श्रीकृष्ण, श्री गौतम बुद्ध, महावीर आणि असे सर्वच धर्मातील उल्लेखनीय कार्य करणारे महापुरुष हेच ईश्वर आहेत. ही सगळी माणसेच होती, परंतु आपल्या अलौकिक, विशेष कार्याने आपल्या काळात, राज्यात स्वतःचे कीर्तिमान वाढवले. सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे या सद्गुणी महापुरुषांना समाज असामान्य म्हणजेच देवतुल्य समजू लागला आणि पुढे त्यांचा देव झाला. वनवासाला जाणारा दशरथपुत्र राम, कुरुक्षेत्रावर गीता सांगणारा कृष्ण, युद्ध नको म्हणून गृहत्याग करणारा गौतम ही सारी माणसेच होती. त्यांच्या लोकोपयोगी कार्याने त्यांना लौकिक प्राप्त झाला. पुढे पुढे लोकांनी त्यांना देवत्व बहाल केले. लेखक-कवी संतांनी नेहमी सद्गुणात आणि सगुणातच ईश्वर पहिला आहे. अनादिकालापासून परोपकार करणाऱ्या लोकांनाच लोकांनी आपला राजा, एवढेच काय देवच मानले. श्रीरामाच्या काळात अयोध्येत लोक सुखी, आनंदी होते. सर्ब लोकांना राजा राम आपल्या घरातील सदस्य मानत असे. त्यांच्या सुख-दुखात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यासमोर काहीही समस्या नसल्यामुळे लोक आनंदाने रहायचे. याचा प्रभाव आजतागायत असून आजसुद्धा लोक रामराज्याची अपेक्षा करत असतात. यावरून सगुणात असणारा सद्गुणी माणूसच खऱ्या अर्थाने देवतुल्य असतो. राजा श्रीकृष्णाने आपल्या राज्य काळात अनेक बंदिस्त स्त्रियांना मुक्त केले. लोकांना घरे बांधून दिली, शेती दिली. नातेवाईक-मित्रांचा सन्मान केला. त्यामुळे आजही कृष्ण-सुदामा यांच्या मैत्रीचे दाखले दिले जातात. राजपुत्र सिद्धार्थाने ऐन तारुण्यात राज्य त्याग करून केवल ज्ञान प्राप्त झाल्यानंतर लोकांना 'अशा हेच दुःखाचे मूळ आहे. शांती हाच मानवाचा मूळ गुणधर्म आहे' असा उपदेश करून आपल्या राज्यातील लोकांना युद्ध मुक्त केले. याचा परिणाम म्हणजे महान सम्राट चक्रवर्ती अशोकाने कलिंगच्या युद्धातील संहार पाहून स्वतः बुद्धाचा अनुयायी झाला. त्यानंतर आपल्या राज्यांत अनेक लोकोपयोगी, परोपकाराची कामे करून एक आदर्श प्रस्थापित केला. याच अनुषंगाने उक्ती-कृतीने समृद्ध झालेले संत तुकाराम प्रस्तुत अभंगामध्ये परोपकार किती महत्वाचा आहे हे सांगतात.

**नका घालूं दुध जया मध्यें सार ।ताकाचे उपकार तरी करा ॥१ ॥**
**नेदा तरी हे हो नका देऊं अन्न ।फुकाचें जीवन तरी पाजा ॥२ ॥**
**तुका म्हणे मज सगुणाची चाड ।पुरवा कोणी कोड दुर्बळाचें ॥३ ॥**

प्रत्येकाने काही ना काही प्रमाणात का होईना परोपकार करायलाच हवा. एखाद्या व्यक्तीला मदत करायची आहे, त्यासाठी एखाद्याला दुध जरी द्यायला जमले नाही तरी फुकटचे ताक तरी देऊन उपकार करावेत. एखाद्या गरजू भुकेल्या-तहानलेल्या अन्न जरी देता नाही आले तरी फुकटचे पाणी तरी पाजले पाहिजे. याचे कारण या गरजू, तहानलेल्या, भुकेल्या लोकांमध्येच सगुण रूपाने खरा ईश्वर सामावला आहे. जिथे जिथे दुर्बल, गरजू व्यक्ती भेटेल तो सगुण रुपात देवच असून त्याला सहकार्य-मदत करणे म्हणजेच खरी ईश्वरसेवा होय! त्यामुळेच मानवसेवा हीच ईश्वर सेवा आहे ही म्हण सर्वश्रुत आहे.

परोपकार करण्यात संत, समाजसुधारक सुद्धा मागे राहिले नाहीत. स्वतः संत तुकारामांनी "आधी केले मग सांगितले" उक्तीप्रमाणे घरातील कर्जखते बुडवून लोकांना कर्जमुक्त केले. त्यांच्या काळातील छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा रयतेच्या रक्षणाची सर्वतोपरी जबाबदारी घेऊन लोकांना अभय दिले. याशिवाय शेतकऱ्यांना मोफत बी-बियाणे, शेतीसाठी बैल पुरवून रयत उभी केली. अलीकडे एकोणिसाव्या शतकात महात्मा ज्योतीराव-सावित्रीबाई फुल्यांनी गावकुसाबाहेरील लोकांसाठी आपल्या घरासमोरील विहीर सर्वांसाठी खुली केली. सावित्रीबाईंनी क्रांतीकारी पाउल उचलून पहिल्यांदा मुलींना शिकविण्याचे धाडस केले. त्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या करवीर-कोल्हापूर संस्थानात अनेक परोपकारी, लोककल्याणकारी योजना राबवल्या. वंचित, उपेक्षित, अस्पृश स्त्री-पुरुषांना समान वागणूक संदर्भात कायदे केले. गावोगाव अनुदानित

**तुकारामनीती**
**भाग -60**



शाळा-वसतिगृहे उभी करून आठरापगड जातीच्या लोकांना मोफत ज्ञानदानाचे महान कार्य केले. त्यामुळेच शाहू महाराज राजर्षी शाहू महाराज झाले! आधुनिक काळातही असे अनेक महापुरुष होऊन गेले ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य परोपकारासाठी, लोकोद्धारासाठी खर्ची घातले. स्वामी विवेकानंद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम, सिधुताई सपकाळ आदि अनेक राजकारणी-समाजकारणी धुरंधर महापुरुषांनी परोपकाराने आपले नाव इतिहासात अजरामर करून ठेवले. बाबा आमटे, मदर तेरेसा सारख्या कृतीशील समाजसुधारकांनी आपल्या समाजसेवेतून खऱ्या ईश्वराचे दर्शन घडवून आणले. परोपकार, त्याग संदर्भाने मदर तेरेसा म्हणतात, "जो व्यक्ति दूसरों के लिए अपने स्वार्थ को त्याग कर दूसरों के लिए जीता है, वह मृत्यु के पश्चात भी लोगों के लिए प्रेरणादायक का स्रोत बन जाता है." जर्जर अवस्थेत रस्त्यावर पडलेल्या अंगाची दुर्गंधी येत असलेल्या कुष्टरोग्याला उचलून त्याच्या जखमा धुवून त्याच्यावर उपचार करून त्याला जेऊ घालण्याचे काम बाबा आमटेंनी केले. मदर तेरेसांनी निर्वासित, झोपडपट्टीतील बालकांना, घरातून हाकलून दिलेल्या वृद्ध स्त्री-पुरुषांना निवारा देऊन त्यांच्या जगण्याची व्यवस्था केली. या लोकांनी लोकसेवेतच ईश्वर पहिला. ही मानवता मुल्ये मानवी जीवनात रुजवण्यासाठी अनेकांनी आपले जीवन, विचार आणि कार्य समाजाला समर्पण केले. समाजाच्या उत्थानात आपले उत्थान मानले. महान आधुनिक संत गाडगेबाबांनी गाव झाडून काढल्याशिवाय त्या गावात भिक सुद्धा मागली नाही. एकदा जेवण करून गाव स्वछ करणारे आणि सायंकाळी कीर्तन करणारे गाडगेबाबा राष्ट्रसंत झाले.

वर्तमान मोठा धकाधकीचा काळ आहे. इथे कुणाला कुणाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. सगळीकडे माझ्यासारखे बोलघेवडे समाजसुधारक झाले आहेत. असे असले तरी आज घरोघरी एकमेकांना सहाय्य करण्याचा विचार पेरला जावा यासाठी संत तुकाराम आणि अन्य महान विभूतींच्या विचारांचा प्रचार-प्रसार होणे आवश्यक आहे. त्यासाठी अपना सर्वांनीच काहीतरी प्रमाणात परोपकार करणे गरजेचे आहे. फार काही नाही तर उन्हाळ्यात पक्षांना छतावर पाणी ठेवण्याचे छोटेसे काम केले तरी पुरेसे आहे! दुसरीकडे शहरांमध्ये वृद्धाश्रम वाढत आहेत. ही मोठी धोक्याची सूचना आहे. परोपकार करणे तर दूरच अनेकांना आपले माय-बाप जड झाले आहेत. हे खूपच भयंकर आहे. त्यासाठी घराबाहेर परोपकार करण्यापेक्षा आपल्या घरी जरी घरच्यांची काळजी घेण्याचे कार्य केले तरी पुरेसे आहे. घराघरांत हा अभंग जावा लागेल. तुकोबांचा परोपकाराचा हा विचार सर्वत्र प्रसारित होऊन आपण सगळेच काही तरी परोपकार करण्यास सज्ज होऊयात! जय तुकोबाराय!

# दृष्टिकोन व्यवस्थापन




डॉ. विलास इप्पर
संपर्क क्र.: 9322185214

आधुनिक केसरी

**शिक्षण हे आपला दृष्टीकोन बदलतो. शिक्षणाने अनुभवाने व्यक्ती प्रगल्भ बनतो. न्याय अन्याय, चांगल वाईट, लहान थोर अशा बाबतीत योग्य दृष्टिकोन बनऊन निर्णय घेतो. याउलट अज्ञानाने, अनभिज्ञपणे व्यक्तीकडून चुका होतात, आणि कालांतराने अशा चुका लक्षात येतात. अशाच महत्वपूर्ण संकल्पनेचा आज या लेखात विचार करण्यात आला आहे. या संदर्भात एक अत्यंत महत्त्वाचा विषय हाताळणार आहोत, जो सर्व सर्वांगीण विकासाचा मूळ पाया आहे.**

जो मन, बुद्धी आणि अहंकार या संकल्पनेच्या संदर्भात आहे. तो म्हणजे "दृष्टिकोन" इंग्रजी शब्द Attitude. जो आपल्या सूक्ष्म शरीराशी संबंधित आहे. मी नेहमीच म्हणत असतो की प्रश्न "स्थूल शरीराचा" नसून, सूक्ष्म शरीराचा आहे.

शरीर हे दोन प्रकारचे असतात. यातील सूक्ष्म शरीराच्या संदर्भात असलेले जे घटक आहेत ते म्हणजे मन, बुद्धी आणि अहंकार. सर्वात महत्वाचा घटक आपले मन. ढोबळ अर्थाने "मनाचे योग्य व्यवस्थापन" करणे म्हणजे दृष्टीकोन व्यवस्थापन. मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण. मन वढाय वढाय, मनोवांचीत, मन बुद्धीची कातरी, मनस्वी, मानसिक, थोडक्यात अशा किती तरी संज्ञा मनाच्या संबंधित आहेत. यासंदर्भात दुसरा शब्द आहे बुद्धी. बुद्धीचे वैभव अन्य नाही तुझे, एका केशव राजे सकळसिद्धी. रीद्धी सिद्धी निधी अवघीच उपाधी, जव त्या परमानंदी मन नाही. मनोमार्गे गेला तो तेथेच मुकला, हरिपाठ स्थिरावला तोचि धन्य. इथे हरिपाठ या संकल्पनेचा अर्थ आपल्या आजच्या विषयाशी आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे आजच्या लेखाचा विषय आहे "दृष्टिकोन व्यवस्थापन" म्हणजेच "अटीट्युड मॅनेजमेंट". मित्रहो , अटीट्यूड म्हणजे काय ? तर हा हा शब्द अहंकाराची संबंधित आहे. यातील तिसरा घटक अहंकार जो सूक्ष्म शरीराच्या संबंधित आहे. आजकाल कोणत्या ना कोणत्या कारणामुळे आम्ही चिंताग्रस्त असतो. छोटीशी कोणतीही घटना घडली की लगेच आपण दुःखी होतो कष्टी होतो. परिणामी आमच्या मनाला तिथे दूषित करण्याला प्रारंभ करतो. अगदी झोपेतून उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आम्ही आमच्या मनाला दूषित करण्याच मटेरियल प्रोव्हाइड करत असतो. आपण थोडक्यात ज्या गोष्टीचा विचार करतो त्या गोष्टी अहंकार वाढविणाऱ्या असतात. याचच योग्य व्यवस्थापन कसे करायचे हे कळणे महत्वाचे आहे. वर बोलल्याप्रमाणे "मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण". सतत प्रसन्न असणे, आनंदी असणे हे मनाच्या व्यवस्थापनासाठी महत्त्वाच आहे. याला आपण माईंड मॅनेजमेंट म्हणू शकतो. दुसरी संज्ञा आहे "बुद्धी". बुद्धी हे आपले अत्यंत महत्त्वाचे बलस्थान आहे. आम्हाला बुद्धीचे वैभव वाढवायच आहे, तर बुद्धीचे वैभव कसं वाढवायचं बुद्धीची ताकत वाढवायची असेल तर आपला दृष्टीकोन योग्य पद्धतीने तयार होणे गरजेचे आहे. कारण सर्व सिद्धी किंवा कार्य निष्पती, आपल्या जीवनातील जी अचीवमेंट आहे, त्या पूर्ण करण्यासाठी आम्हाला बुद्धीची तेजस्विता वाढवायची असते. बुद्धीची ताकद वाढवायची आहे, बुद्धीचं हे आपलं बलस्थान ते वाढवायचा आहे. मन आणि बुद्धी या दोन संकल्पनेत आजच्या विषयाचा आशय लपलेला आहे. अत्यंत महत्त्वाचा मुद्दा तो म्हणजे आम्हाला अहंकाराचे व्यवस्थापन करायचं. आम्हाला इगो मॅनेजमेंट करायचं. मन, बुद्धी आणि अहंकार या तिघांची गोळा बेरीज म्हणजे आमचा "दृष्टिकोन", आमच परसेप्शन आणि ते तीन शब्द आहेत. आपल्या अटीट्यूडशी संबंधित. दृष्टिकोन व्यवस्थापन म्हणजे नेमकं काय ? तर आपण त्या संबंधात सदैव जागरूक असणे. 'सावध झालो, सावध झालो, आलो हरीच्या जागरणा', येथे हरीचा जागर म्हणजे आमची सजगता, आमचा सावधपणा, शुद्ध भाव ,प्रसन्न मन, अत्यंत सकारात्मक भाव, समानतेचा भाव, हाच दृष्टिकोन. अगदी डोळे बंद करून ( ध्यान साधना ), आम्ही आमच्या स्वत्वाला, आम्ही आमच्या मूळ स्वरूपाला ओळखण्यास सुरुवात करायची. आम्हालाच आमचा उद्धार करण्यासाठी, आम्हालाच आमच्या जीवनात आनंद भरण्यासाठी आता तयार व्हायचे ! सावधान व्हायचंय आणि ह्या सगळ्या गोष्टी आहेत. आमचा दृष्टिकोन व्यवस्थापन करण्यासाठी, अर्थात अटीट्युड मॅनेजमेंट. मित्रहो, हल्ली व्यवस्थापनशास्त्र संकल्पनेला किंवा विषयाला अत्यंत महत्त्व आलेला आहे. व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे. त्याचप्रमाणे व्यवस्थापन ही एक कला आहे. कलेकलेने घ्यायचे ते शास्त्र म्हणजे व्यवस्थापन शास्त्र. याच व्यवस्थापन शास्त्राचा आधार घेऊन आम्ही दृष्टिकोन व्यवस्थापन ही संकल्पना शिकणार आहोत. अर्थात एटीट्यूड मॅनेजमेंट. आजचा लेख नवीन संकल्पनेच्या संदर्भात असला तरी ही फार मूळ आणि जुनी संकल्पना आहे. आपण फक्त गरजेनुसार तिला वेगळं करत आहोत. एक एक शब्द, एक एक घटक, वेगळा करून त्या घटकातील वेगळेपणा, त्या घटकाचे स्वरूप, त्या घटकाचे वैशिष्ट्य, त्या घटकाचे आमच्या जीवनाची संबंधित असलेले पैलू, त्या घटकाच्या संदर्भात असलेले फायदे आणि तोटे या सर्वांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून, नियोजनबद्ध पद्धतीने आपण अभ्यास करणे यालाच व्यवस्थापन म्हणता येईल. आम्ही आतापर्यंत व्यवस्थापन शास्त्राचा उपयोग फक्त व्यवसाय आणि वाणिज्य, विपणन किंवा नफा कमविण्याच्या संदर्भात महत्त्वाचा आहे असं समजत गेलो आहोत, परंतु व्यवस्थापनशास्त्र आपल्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत महत्वाचे असते. या शास्त्राचा अत्यंत महत्त्वाचा आधार असतो. त्याचे उत्तम उदाहरण ते म्हणजे संस्कार, गर्भसंस्कार आणि मृत्यूनंतर चे संस्कार हल्ली कोणत्याही गोष्टीला संस्कार देण्याची जी काही क्रिया असते ती ही व्यवस्थापनाचाच भाग असते. आमच्या दृष्टिकोनाला जो अज्ञान पसरविणारा, तो भीती निर्माण करणारा आणि परत कुठे तरी काल्पनिक विश्वामध्ये घेऊन जाणाऱ्या गोष्ठी आपण करतो. अज्ञानी लोक कुठे तरी शास्त्राला किंवा आध्यात्मिक शास्त्राला चुकीचा अर्थ लावून मनाला चुकीच्या मार्गाने नेण्याचे प्रयत्न करतात, आणि आमचा तसा दृष्टिकोन तसा बदलत राहतो. आमची धर्म, अर्थ, काम, मोक्ष या संबंधित जे हवं असतं, जे व्हायला पाहिजे, तसे न होता अज्ञानाचाच प्रचार आणि प्रसार केला जातो. शास्त्राचा अर्थ आपल्या सोयीनुसार, चुकीच्या पद्धतीने लावला जातो आणि आपला स्वार्थ, आपला व्यवसाय, आपल्याला "अर्थ" मिळविण्यासाठी म्हणजे पैसा मिळविण्यासाठी त्या शब्दाला मनोवांचीत असा अर्थ लावला जातो परिणामी आपला दृष्टिकोन बदलत जातो. ज्याप्रमाणे बालमनावर कोवळ्या मनावर जसे संस्कार होतात तसा तो व्यक्ती बनत जातो. हळूहळू आपण अशा संस्काराने घडत जातो. बदलत जातो, म्हणजे आपला तसा दृष्टिकोन होत जातो. थोडक्यात प्रत्येक क्षणी, प्रत्येक ठिकाणी दृष्टिकोन किती महत्त्वाचा आहे ? हे आपल्या लक्षात येईल. म्हणूनच अटीट्यूड मॅनेजमेंट ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे आणि आम्हाला योग्य पद्धतीने अटीट्यूड मॅनेजमेंट करायचं आहे. वर म्हटल त्याप्रमाणे मनो मार्गे गेला, तो तेथेची मुकला. हरीपाठी स्थिरावला, तोचि धन्य. या शब्दाचा काय अर्थ आहे ? हरिपाठ शास्त्र, हरिपाठ ग्रंथ हे एक असं ज्ञानशास्त्र आहे, जेथे आपला जो विषय आहे त्याचा अर्थ आपल्याला मिळून जातो. नित्य नेम नामे, ते प्राणी दुर्लभ. अर्थाजन करायच असेल तर आपण आपला तसा सकारात्मक दृष्टीकोन तयार करणे गरजेचे असते.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय राज्यघटनेमध्ये लिहून ठेवलेल आहे. श्रद्धेच स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य तर त्यानुसार तुम्हाला श्रद्धा बाळगायची. दृष्टिकोन निर्माण करायचा आहे. आणि त्या दृष्टिकोनाचं योग्य व्यवस्थापन करून आमच्या जीवनाचा उद्धार करायचा आहे. तीच संकल्पना आहे दृष्टीकोन व्यवस्थापनाची. आम्ही नेहमी म्हणतो दृष्टिकोन बदला, दृष्टिकोन बदला पण नेमकं काय करा हे कोणी सांगत नाही. तोच मुद्दा किंवा तोच प्रश्न डोळ्यासमोर ठेवून आज आपण वरीलप्रमाणे दृष्टिकोन व्यवस्थापन किंवा अटीट्युड मॅनेजमेंट या विषयाला हात घातलेला आहे. येथे सुरुवात होते ते कर्मयोगाला. कर्मयोग समजून घेतला पाहिजे. ज्ञानयोग समजून घेतला पाहिजे. ज्ञान म्हणजे काय एखाद्या वस्तूविषयी आम्हाला वास्तविक जाण होणे याला ज्ञान म्हणतात. ज्ञान ही संकल्पना खूप विस्तारित आहे, आणि ज्ञानाचा अर्थ देखील काळ स्थळ ,व्यक्ती, संकल्पना यानुसार बदलत राहतो. याचा अर्थ ज्ञानाचा अर्थ बदलत राहतो म्हणजेच तसा आपला दृष्टिकोन निर्माण होतो. मन, बुद्धी, चित्त किंवा अहंकार या शब्दाचा चांगल्या पद्धतीने सकारात्मक पद्धतीने वापर करून घेणे म्हणजेच दृष्टिकोन व्यवस्थापन होय. जोडोनिया धन ,उत्तम व्यवहारे .तुमचा व्यवहार उत्तम असेल, तुमचं बोलणं उत्तम असेल, तुमचं वागणं उत्तम असेल, तर त्याचे परिणामही उत्तमच असतील.



# एलिफंटा बेट कोरीव लेणी

आधुनिक केसरी

मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असणाऱ्या उरण तालुक्यातील घारापुरी ( एलिफंटा ) हे २५० ते ३०० इतक्या घरांची लोकवस्ती असलेलं बेट आता अंधाराच्या साम्राज्यात बुडालेले आहे या बेटांवर स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांहून अधिक काळ विजचं नव्हती मात्र सन २०१८ साली २० कोटी खर्चून समुद्रातून वीज वाहिन्या टाकून तिथे वीज पोहचली पण सद्या नादुरुस्त वीज वाहिन्यामुळे घारापुरी बेटावर अंधाराचे साम्राज्य पसरले आहे राज्याची राजधानी मुंबई व इन्फोटेक सिटी नवी मुंबई दरम्यान असलेल्या या लोकवस्तीला लाईटसाठी अजून किती दिवस वाट पहावी लागेल ? असा जनतेतून थेट सवाल विचारला जावू लागला आहे समुद्रामार्गे मुंबईपासून केवळ एक तास आणि रस्त्यामार्गे नवी मुंबईतून तासभराच्या अंतरावर असणाऱ्या व युनेस्को जागतीक दर्जा लाभलेल्या या उरण तालुक्यातील घारापुरी बेटावर लाईट सुविधेसाठी झगडावे लागते ही महाराष्ट्रासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल जगातील महासत्ता, निर्णय वेगवान, महाराष्ट्र गतिमान अशी जाहिरातबाजी करुन जनतेची दिशाभूल करणारी राजकीय मंडळी अजून किती दिवस या बेटाला अंधारात ठेवणारं आहे या प्रश्नाचे उत्तर मात्र अनुत्तरीतच आहे घारापुरी हे बेट कोरीव लेणी आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे स्थळ म्हणून पुढे आले आहे गेट वे ऑफ इंडिया वरुन या बेटाकडे जाण्यासाठी बोटींची सुविधा असून दररोज अनेक पर्यटक येथील एलिफंटा कोरीव लेणी पाहण्यासाठी भेट देत असतात त्यामुळे येथील लघू उद्योगांना उभारी मिळून अनेकांना रोजगार देखील उपलब्ध झाला आहे देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे लोटली तरीही जागतीक दर्जा लाभलेल्या या बेटांवरील जनतेला विज सुविधेसारख्या मूलभूत बाबींची पूर्तता होत नसेल तर यासारखे येथील जनतेचे दुसरे दुर्देव काय असू शकते ?

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

# दोन सिंहांची भेट :समृद्धी, स्थैर्याची फलदायी पहाट



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**प्रस्तावना : भारत आणि अमेरिका ही दोन्ही राष्टे म्हणजे जगाच्या नभांगणातील दोन लखलखते तेज पूंज सूर्य आहेत, जणू दोन सिंह आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अमेरिकेच्या वतीने राज्यभेटीचे विशेष निमंत्रण देण्यात आले होते. अमेरिकेने पंतप्रधान मोदी यांच्या साठी रेड कारपेट अंथरूण त्यांची विशेष अतिथी म्हणून गणना करण्यात आली आणि त्यांना 21 तोफांची सलामी देण्यात आली तसेच अमेरिकेच्या सिनेम व प्रतिनिधी गतहाने बनलेल्या कॉग्रेस या संयुक्त सभागृहास त्यानी विशेष संबोधन केले. प्रगत माहिती तंत्रज्ञान अंतराळ संशोधन तसेच संरक्षण उत्पादन अशा अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात उभय राष्ट्रामध्ये ऐतिहासिक करार संपन्न झाले त्यामुळे हा दौरा या दोन महान लोकशाही राष्ट्रामधील ऐतिहासिक संबंधाना कलाटनी देणारा ठरला आहे. हिंद प्रशांत क्षेत्रामधील शांतता, स्थैर्य आणि विकासासाठी उभय राष्ट्रांच्या सहकाऱ्यांमुळे एक नवे युग अवतरले आहे.जागतिक स्तरावर आर्थिक आणि भू-राजनैतीक क्षेत्रात परस्पर सहकार्यात नवी दिशा देण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यामुळे शक्य झाला आहे.**

**मोदी सिद्धांताचे वैशिष्ट्य :** स्वातंत्र्यानंतर गेल्या 75 वर्षात भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये एक नवे वळणे आले आहे.सक्रिय अलिप्ततावाद हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नवा सिद्धांत असून त्यांनी बलशाली भारताचा बुलंद आवाज जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेला आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या नव्या तत्त्वज्ञानामध्ये मोदीसिद्धांत महत्त्वाचा आहे. त्यामध्ये पुढील तीन प्रमुख पैलु आहेत.

जगाच्या राजकारणात स्वसामर्थ्यांमुळे भारत स्थीरध्रूव म्हणून उदयास आला आहे आणि त्यामुळे विश्वगुरू म्हणून भारताची भूमिका सर्वमान्य होत आहे. बहूध्रूवी जगामध्ये अमेरिका, रशिया व चीन यांना समान अंतरावर ठेवून त्यांच्याशी मैत्रिचे संबंध राष्ट्रीय हित लक्षात घेऊन प्रस्थापित केले जातील. युक्रेन युद्धात भारताने रशियावर टिका करणे कटाक्षाने टाळले कारण संकट समयीच्या काळात रशिया भारताला सदैव मदत करत आलेला आहे. भारताने पाकिस्तान वगळता दक्षिण आशियातील सर्व शेजारी राष्ट्राशी प्रेमाचे संबंध ठेवले आहेत. तसेच चीनच्या कुटील डावपेचामुळे अर्थव्यवस्था खिळखिळी झालेल्या श्रीलंका, नेपाळ यांनाही भारताने मदतीचा हात दिला आहे. "सबका साथ सबका विकास हे" हे तत्त्व शेजारील राष्ट्रानांसुद्धा लागू केले आहे. मोदी सिद्धांताचा हा वाढता प्रभाव विविध जागतिक व्यासपिठावर म्हणजे जी-7 ब्रिक्स आशिया तसेच एस. सी. ओ.या परिषदेतून प्रकट झाला आहे.

**अमेरिका दोऱ्याचे फलीत :**

पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी अमेरिका दोऱ्यामध्ये भारताची प्रतिमा उंचावली आहे.या दौऱ्यानंतर 58 कलमांनी युक्त संयुक्त निवेदन प्रकाशित करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने लोकशाही मुल्यांची प्रतिष्ठा मानवी हक्कांचे रक्षण तसेच भविष्यकालीन प्रगत तंत्रज्ञानांच्या संर्वधनासाठी संरक्षण क्षेत्रातील भागीदारी हरित ऊर्जा संवर्धन आणि हवामान बदलाची कामना, सखोल धोरणात्मक भागीदारी जागतिक स्तरावर अंतराळ संशोधन क्षेत्रात सहकार्य इत्यादी प्रमुख 58 कलमांचा समावेश आहे.

हिंद प्रशात क्षेत्रामध्ये चीनच्या वाढत्या प्रभावाला प्रतिशह देण्यासाठी अमेरिकेने भारताकडे एक विश्वासू मित्र म्हणून पाहिले आहे. भारत अमेरिका मैत्रीला चालना देण्यास चीन हा एक महत्वाचा घटक होय. क्वॉड शिखर परिषदेत झालेल्या चर्चेच्या केंद्रस्थानी चीन होता. भारत चीन सीमा प्रश्नावर अमेरिकेने नेहमी भारताची बाजू उचलून धरली आहे.

जगातील लोकशाहीला सर्वात मोठा धोका दहशतवादाच्या रूपाने आहे. पाकिस्तानचा राज्य प्रायोजित दहशतवाद हा संबंध जगाला धोकादायक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अध्यक्ष जो. बी. बीडेन यांनी पाकिस्तानला खडेबोल सुनाविले. अमेरिकेतील वॉशिंगटन येथे कार्य करणाऱ्या ब्रुकिंगस संस्थेच्या भारत प्रकल्पाच्या संचालिक तनवी मदन यांच्या मते अमेरिकेसाठी महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांना चीनबद्दल कायम शंका वाटतेअसे नाही तर भारत लोकशाहीच्या भल्यासाठी काय करतो हे महत्वाचे आहे. भारत व अमेरिकेची भूमिका जागतिक लोकशाहीच्या विकासासाठी पूरक ठरली आहे. वॉशिंगटन मधील वृद्रो विल्सन सेंटर थिंक टँकमधील दक्षिण आशिया विभागाचे संचालक मायकेल कुगेलमल यांच्या मते दोन्ही देशांनी व्यापक दृष्टिने हिंद प्रशांत क्षेत्राकडे डोळसपणे पाहण्यास प्रारंभ केला आहे. अमेरिकेने यथार्थ भूमिका घेतल्यामुळे पॅसिपीक सागर तसेच चीन समुद्र इथपासून ते हिंद सागरापर्यंत सुरक्षेकडे लक्ष देण्यास शक्य होईल. अमेरिका व भारत यांच्या संयुक्त निवेदनात चीनचा थेट उल्लेख नसला तरी हिंद प्रशांत क्षेत्रातील आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी दोन्ही राष्ट्र परस्परांना मदत करतील,असे म्हटले आहे.

**शांतता व स्थैर्याची गुरूकिल्ली:** भारत अमेरिका मैत्री ही जगातील लोकशाहीच्या यशासाठी वरदान ठरू शकेल. रशिया भारताला स्वस्थ दरात तेल पुरवित आहे. भारतामध्ये रशियाची तेलाची आयात 10 पट्टीने वाढली आहे परंतु भारताची रशियाशी असलेली मैत्री हि अमेरिका संबंधाशी अडसळ ठरू शकत नाही, हे अमेरिकेने लक्षात घेतले आहे. जेव्हा धोरणात्मक अभिसरण असते तेंव्हा दोन्ही देशांनी त्यांचे संबंध सुरळीत ठेवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

**तंत्रज्ञान सहकार्याचे नवयुग :** पंतप्रधान नरेद्र मोदी यांच्या अमेरिका भेटीमुळे उभय राष्ट्रात गंभीर आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या आदान प्रदानावर भर देण्यात आला.संगणक क्षेत्रातील आय सी कंटक्टर निर्मिती, लढाऊ जेट विमानांची निर्मिती, बोईंगविमानांसंदर्भात करार खरेदी तसेच क्रिटीकल तंत्रज्ञान, ए. आय.– कृत्रिम बुद्धिमत्ता व संयुक्त अंतराळ मोहिमा या दृष्टिने महत्वाच्या प्रकल्पावर भर देण्यात आला आहे.उभय राष्ट्रातील सहकार्यामध्ये संरक्षण आणि प्रशिक्षण हे एक महत्वाचे क्षेत्र आहे



त्यामुळे अभिसरणाचा एक मुख्य मुद्दा म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.वर्तमान जगामध्ये प्रतिभाशाली तंत्रज्ञान क्षेत्रात भारताची प्रतिभाशक्ती श्रेष्ठ असा लौकिक आहे.तसेच नासाआणि इस्त्रो दरम्यानच्या अंतराळ संशोधन करारात हा एक नवे वळण देणारा ठरणार आहे.भारत अमेरिका दरम्यान 130 अब्ज डॉलर्स चा दरवर्षी निवळ व्यापार आहे हा व्यापार दुप्पट करावयाचा आहे त्यासाठी सुद्धा ती भेट निश्चित वरदान ठरली आहे.

**कॉंग्रेसमधील ऐतिहासिक भाषण :** अमेरिकन कॉंग्रेसमध्ये पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी दुसऱ्यांदा विशेष संबोधन केले अशी संधी प्राप्त झालेले ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. आपल्या भाषणामध्ये त्यांनी भारत आणि अमेरिका हे लोकशाही मुल्यांवर श्रद्धा ठेवणारे दोन महान लोकशाही मुल्य आहेत. त्यांनी दहशतवाद नष्ट करण्यासाठी खाद्याला खांदा लाऊन लढण्याचे आव्हान केले. भारत अमेरिका मैत्रीचे माधुर्य कशात असेल तर विकासाच्या समान भागिदारी मध्ये आहे.अमेरिकेत मोदी यांचे धुमधडाक्यात स्वागत झाले. अमेरिकन कॉंग्रेसमध्ये केलेल्या भाषणात मोदी यांनी "जबरदस्ती आणि संघर्षाचे गडध घर आपली छाया पाडत आहे असा, चीनचा अप्रत्यक्ष उल्लेख केला" युक्रेन युद्धाचा उल्लेख करून मोदी म्हणाले की, युक्रेन संघर्षाने युद्ध संबंध युरोप मध्ये पसरले आहे त्यांनी आपल्या भाषणात जगाच्या विकासासाठी शातंतेची गरज प्रतिपादन केली. या भाषणामध्ये त्यांचे राजकीय प्राचुर्य चातुर्य आणि माधुर्य यांचा सुरेख संगम दिसून आला.अध्यक्ष जो बीडेन यांनी भारत अमेरिका मैत्री 21 व्या शतकातील उत्तम पारिभाषीत संबंधापैकी एक असे विशेषत्वाने नमूद केले हे जगातील दोन महान लोकशाही देश एकत्र आल्यामुळे दोन्ही देशातील मैत्री संपूर्ण जगाचे विकास सामर्थ्य वाढवण्यासाठी पुरक ठरेल असे सुत्र मोदी यांनी मांडले. उभय देशातील सर्व समावेशक आणि जागतिक सामरिक भागीदारी एक नवा अध्याय प्रकट करणार आहे.भारतातील मानव अधिकाराबाबत शंका उपस्थित करणाऱ्यांना पंतप्रधान मोदी यानी रोख ठोक उत्तर दिलेआणि भारतीय लोकशाहीमध्ये कोणताही भेदभाव होत नाही.लोकशाही आपल्या शिरामध्ये चालते आणि भारतात भेदभावासाठी मुळीच जागा नाही असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

**समारोप :** अशा प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोंदी आणि प्रे. जोबिडेन यांनी उभय राष्ट्रातील श्रेष्टउच्चस्तरीय शिष्ठ मंडळात विधायक चर्चा करून शाश्वत विकासाला गती देणारे महत्त्वपूर्ण प्रकल्प साकार केले आहेत. दोन्ही राष्ट्रांच्या शिष्ठ मंडळामध्ये झालेली चर्चा विधायक आणि तेवढीच उच्च दर्जाची होती पंतरप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण पंडित नेहरू यांच्या अलिप्तता वादाचा नवा विस्तार आहे. परंतु ही अलिप्तता निष्क्रीय नसुन ती सक्रीय व तेवढीच गतीमान आहे. नव्या जगात केवळ पंचशील तत्वाची माळ ओढून चालणार नाही तर नव्या शक्तीचे प्रदश्रन करून जगाला शांतता व विकासाचे धडे द्यावे लागतील. पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांच्या काळात भारताचा उदय नव्या जगामध्ये एक विश्व गुरू म्हणून होत आहे. स्वामी विवेकानंद म्हणाले होते, 21 व्या शतकात भारत जगावर राज्य करेल, तो केवळ धर्मामुळे नव्हे तर प्रगत विज्ञान तंत्रज्ञानामुळे.अमेरिका भारतातील विद्यापीठे आणि संशोधन केंद्राशी करार करण्यासाठी उस्तुक झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा दौरा म्हणजे भारताच्या प्रतिभाशाली बौद्धिक सामर्थ्यांचा नैतिक विजय होय, यात शंका नाही दोन सिंहाची ही समृद्ध आणि फलदायी भेट युगप्रवर्तक व इतिहासाला कलाटनी देणारी ठरली आहे.

# दान दे पावसा



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**जून संपत आला तरी पावसाचा पत्ता नाही. जमिनी कोरड्या पडल्या आहेत. महाराष्ट्र काय किंवा गोवा काय? भुईला पावसाची गरज असते. पाऊस हाच सर्वांत श्रीमंत ऋतू आहे. सर्व जीवन व जीवनचक्रच पावसावर अवलंबून असतं. पावसावर माणसाचं जगणं अवलंबून असतं. जिराईत शेती तर पावसाच्या पाण्यावरच अवलंबून असते. मी माझ्याच एका गझलेत म्हटले आहे.**

**मी तुला मागतो दान दे पावसा**
**मज कसाया रान दे पावसा**

याचा अर्थ आता पावसाला दान मागण्याची मला पाळी आली आहे. पूर्वी पाऊस कसा वेळेवर यायचा. आम्ही झाडं तोडली. नद्यांवर धरणे बांधली त्यामुळं पाणी वाहत राहिलं नाही. त्यामुळ पाणी पडायचं ( पाऊस वेळेवर येणे ) नाही. पाऊस वेळेवर आला नाही तर पीकं येतील कशी ? पीकं नाही आली तर माणसं आणि जनावरं जगणार तरी कशी ? सृष्टी फुलणारं कशी ? सृष्टी जर कोरडी राहिली तर सर्वत्र रखरख वाढेल. रूक्ष वातावरणात सगळं जग सुकून जाईल. म्हणून पाऊस हा हवाच. पावसावर सर्व अवलंबून आहे. पहिल्याच पावसात बेडूक दिसू लागतात. जमिनीवर पडलेले बेडूक धुंद होऊन ओरडत असतात. परंतु माणसाला देखवत नाही ते. त्याला जंपिंग चिकन म्हणून खाण्याची त्याची धडपड सुरू होते. दुसऱ्याच्या जिवावर उठतो तोच माणूस. तो दुसऱ्याचं जीवन संपविण्यात त्याला आनंद मिळत असावा. तो आताशा हैवान बनत चालला आहे. रागीट आणि संतापी बनत चालला आहे. राक्षसी वृत्ती वाढली आहे. वरचेवर आता पृथ्वीच्या विनाशाकडे जाऊ लागला आहे. जमीन आताश राहिली नाही, सर्वत्र सिमेंटची जंगले व बंगले उभा राहत आहेत. माणसे जंगलाला आगी लावून प्राण्यांच्या जागा हस्तगत करू लागले आहेत. झाडे तोडत आहेत. झाडे तोडल्यामुळे पावसानर परिणाम झाला. पाऊस रुसल्याने नद्या, नाले व ओहोळ आटले. खळाळणारे झरे शांत झाले. त्यातील जीव जंतू धोक्यात आले. जलातील जीवन धोक्यात आले. पूर्वी कसे सगळे व्यवस्थित व वेळेवर व्हायचे त्यामुळे पक्षी, पशू समाधानी असायचे. मन मानेल तसे राहायचे. आता तसे घडत नाही. आकाश सदाच निरभ्र असते अगदी पावसाळ्यातसुद्धा. त्यामुळेत मी एका कवितेत म्हटले आहे की निरभ्र आकाश आताशा मोकळेच फिरत असते. आभाळाचा पत्ताच नाही. त्यात जलद ( पाणी ) नाही की ढग नाहीत. कापूस पिंजल्यासारखे पांढरे ढग सर्वत्र फिरतात, भुईला आशा दाखवतात. पाऊस कधीचा पडतो असे कविवर्य ग्रेस यांनी म्हटले आहे. आता पाऊस कधी कधी पडतो असे म्हणायची पाळी आली आहे. पाऊस हक्काने वाजतगाजत ( गडगडाट करीत गर्जत ) यायचा. सोबतीला विजांचा कडकडाटही असायचा. आता ते सगळं इतिहासजमा झालं की काय अशी शंका येऊ लागली आहे. बाराही महिने आताशा उन्हाळाच भासू लागला आहे. हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालीचे असं आता आम्ही आठवणींच्या कवितांमधूनच वाचायचे असे दिवस आले आहेत. पाऊस आता बेभवशाचा झाला आहे. कारण झाडे इतकी विरळ झाली आहेत. पावसासाठी आता आभाळाकडं नुसतंच पाहायचं की आपणही त्यासाठी झटायचं हे आता ठरवावं लागेल. नाहीतर अखेर पावसा पावसा दान दे असंच म्हणावं लागेल. पावसाची विनवणी करत बसायचं. माणसे आता भावनाविहीन झाली आहेत. तसाच पाऊसही भावनात गुंतत नाही. दान मागितलं तरी पाऊस ते पावसाचं दान देईलंच असे नाही. कारण तो कोरडा झाला आहे. आताशा डोगरही उघडेबोडके होऊ लागले आहेत. डोंगरावरून झरे वाहत नाहीत. कारण माणसाने डोंगरही माणसाने फोडून टाकले आहेत. प्राणी व पशूंची तहान भागत नाही. झुळूझळू वाहणाऱ्या या पाण्यात मासे मिळत नाहीत. माणूस त्यांना अजून शोधत आहे. पण ते सापडत नाहीत. माणसांच्या जीवनासाठी पाणी आवश्यक आहे. सगळ्याच गावात व शहरात पाण्याचा खडखडाट झाला आहे. कावळ्याचीही तहान भागत नसल्याने त्याला मडके मिळत नसल्याने नळाच्या तोट्यावर तो चोच घासत आहे. पाणी मिळते का ते पाहत आहे. सर्वत्रच असे चित्र पाहायला मिळत आहे. त्याचा घसा कोरडा पडल्याने त्याचा आवाज बसला आहे. तो केविलवाणे ओरडत आहे. काही पशू आणि पक्षीप्रेमी माणसे आपल्या बाल्कनीत त्यांना खायला अन्न व प्यायला पाणी देत आहेत. ते काही फारसे पुरेसे नाही. निदान माणसांना नाही तर झाडे, वेली व प्राणी आणि पशुंसाठी तरी पावसा तू मला जलाचे दान दे अशी मागणी मी केविलवाणा होऊन दीनवाणा होऊन करीत आहे. जून संपत आला तरी पावसाला दया येत नाही. तो म्हणे कृपाळू व दयाघन आहे. घनातून बरसू दे पाणी भागू दे तहान आता असे मी विनवीत आहे, त्या दयाघनाला आता तरी करुणा येऊदे व आभाळ बरसू दे. माझे कविमित्र इंद्रजीत पाटील यांनीही अशीच पावसाची करुणा भाकली आहे. डोळे आकाशाकडे शेतकरी लावून बसला आहे.



# झाडे लावणे व जगवणे काळाची गरज....

आधुनिक केसरी

सध्या महाराष्ट्रातील काही भागातून पावसाने पळ काढला आहे... बळीराजा चिंतेत दिसत आहे.हाताला काम नसल्यामूळे शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी हवालदील झाले आहेत.त्यांना रोजचा पोटापाण्याचा प्रश्न भेडसावत आहे.गूरे-ढोरे व पशू- पक्षी यांची तारांबळ होत आहे. काही लोक तर आभाळाकडे बघितल्यावर गाव सोडून पूणे व मुंबईसारख्या ठिकाणी कामाला जावे की काय ? या विचारात आहेत...ही अतिशय खेदाची व तेवढीच गंभीर बाब म्हणावी लागेल. भारत भूमीत अनेक क्रांत्या झाल्या. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी 'सशस्त्र क्रांती' झाली. दूधगंगा घरोघरी पोहोचविण्यासाठी 'धवल क्रांती ' झाली. आज आपल्या पूढे स्वप्न आहे सर्वत्र वृक्षारोपण करून 'हरित क्रांती ' निर्माण करण्याची.

सुजलाम सुफलाम अशी होती धरती माझी. वैविध्याने नटलेली पाचूच्या बेटासारखी; पण आज ही धरती उजाड दिसत आहे. हिरवेगार डोंगर सुने-सुने वाटू लागले आहे. उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झालेला आहे. जंगल क्षेत्रातील मोठमोठे भाग आपण आधीच तोडून साफ केले आहेत त्यातील लाकूड इमारत बांधण्यासाठी, लाकडी वस्तू करण्यासाठी, इंधनासाठी, कागद निर्मितीसाठीही वापरले.निसर्गाच्या बाबतीत आपण सर्वच मानव स्वार्थी आहोत " देतो तो निसर्ग, घेतो तो मानव " निसर्गालाच लुटणारा स्वार्थी मानव आणि पृथ्वीवर वाढत जाणारी लोकसंख्या, प्रदुषण आणि औद्योगिकरण या सर्वाचा धोका निसर्गाला बसला आहे. औद्योगिकरण व वाहतूक समस्यांमुळे प्रदुषण वाढले. शीतगृहांतून बाहेर येणाऱ्या सी.एफ.सी. वायुमुळे पृथ्वी भोवताली असणाऱ्या ओझोनच्या थराला धोका निर्माण झाला. त्यातून जागतिक तापमानवाढीची समस्या निर्माण झाली वृक्षारोपण करणे काळाची गरज बनली आहे. पर्यावरण संतुलन राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. "वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे" असे तुकाराम महाराज म्हणतात. या भारत मातेचे सजल हिरवे रूप पहायचे असेल तर प्रत्येकाने आपला वाटा उचलला पाहिजे. झाडे लावणे, वृक्षांचे संवर्धन करणे हे प्रत्येकांचे कर्तव्य आहे.

**मानवाने वाया घालवू नये क्षण मानवाने वाया घालवू नये कण!!**
**हा जीवन मंत्र स्विकारू या आपली वसुंधरा वाचवू या!**

परंतू आज आपल्यावर हे जे भयानक संकट आलं आहे ना याला सर्वस्वी जबाबदार आपण सर्वजण होत.हे अगोदर आपण लक्षात घ्यायला हवे .आपणच स्वतःच्या हितासाठी अमाप झाडांची कत्तल केली... लोकसंख्या वाढत गेली व लोकांना राहण्यासाठी Ploting ची गरज भासू लागली...या नादात अमाप झाडांची कत्तल होऊ लागली व पाऊस मात्र लांबच लांब जाऊ लागला व शेवटी जिकडे झाडे तिकडे पाऊस ही अवस्था महाराष्ट्रात होऊन बसली...



म्हणूनच आपण बांधवांनो आपल्या सर्वांना कळकळीची नम्रविनंती आहे की, सगळ्यांनी किमान दहा तरी झाडे लावा म्हणजे त्यापैकी एक तरी झाड जगेल...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मो.7498715661**

# आंबेडकरी चळवळीतील दलितेतरांचे योगदान अधोरेखित करणारे संशोधन



अरविंद भराडे

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि चळवळीने विसावे व एकविसावे ही दोन शतके प्रभावित झालेली आहेत. त्यांचे विचार आणि चळवळ ही व्यापक मानवहिताची होती, देशाच्या हिताची, भविष्याची चिंता वाहणारी होती, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. मात्र आंबेडकरवादी विचारधारा विरोधक बाबासाहेबांची चळवळ संकुचित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आलेले आहेत. अशाप्रकारचा अपप्रचार बाबासाहेबांच्या हयातीपासून ते आजतागायत सुरूच आहे. परंतु खऱ्याअर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ ऐतिहासिक आणि संशोधनात्मक पद्धतीने समजून घेतल्यानंतर ही चळवळ किती सर्वव्यापी होती, समग्र मानवमुक्तीची होती याचा प्रत्यय येतो. त्याचबरोबर या चळवळीत समाजातील अनेक जाती-धर्माचे लोक जोडले गेलेले होते, हे प्रखर सत्य उजेडात येते. कारण खरा इतिहास आणि सत्य हे काळाच्या उदरात दडविण्याचे पातक इथल्या इतिहास तज्ज्ञ, अभ्यासक म्हणविणाऱ्यांनी केले आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक, राजकीय आणि धार्मिक चळवळ समाजाच्या सर्व घटकांपर्यंत नेण्यासाठी ज्याप्रमाणे तत्कालीन अस्पृश्य वर्गातील नेते-कार्यकर्ते झटत होते, त्याचप्रमाणे स्पृश्य वर्गातील लोकही बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून ही चळवळ गतिमान करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत होते.**

आंबेडकरी चळवळ वाढविण्यात स्पृश्य वर्गातील लोकांनीही मोलाचे योगदान दिलेले आहे, ही महत्त्वपूर्ण ऐतिहासिक नोंद इतिहासाच्या अभ्यासक प्रा. डॉ. भावना श्रीपती पौळ यांनी घेतली आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील दलितेतरांचे योगदान' या संशोधनात्मक ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी आंबेडकरी चळवळीतील दलितेतरांचे योगदान अधोरेखित केले आहे.

डॉ. भावना पौळ यांनी प्रस्तुत संशोधन ग्रंथाची मांडणी एकूण चार प्रकरणात केली आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी' या पहिल्या प्रकरणात डॉ. पौळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदय होण्यापूर्वी महाराष्ट्रात (साधारण १८९३ पासून) अस्तित्वात राहिलेल्या दलित चळवळीचा सविस्तर आढावा घेतला आहे. यात ख्रिश्चनरी मिशनरी, ब्रह्मोसमाज, प्रार्थना समाज, परमहंस सभा, आर्य समाज, सत्यशोधक समाज, राष्ट्रीय सभा यांनी केलेल्या दलित उद्धाराच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. त्याचबरोबर लोकहितवादी, क्रांतिबा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी वि. रा. शिंदे, महाराज सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज, श्री. म. माटे, प्रबोधनकार ठाकरे, खंडेराव बागल, भाई माधवराव बागल, डॉ. भांडारकर इत्यादी दलितेतर व्यक्तींनी केलेल्या कार्याची नोंद घेतली आहे.

अस्पृश्य समाजातील मुक्ता साळवे, गोपाळबुआ वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागुजी बनसोडे, संपतराव नाईक, संभाजी संतुक वाघमारे, जानोजी खंडारे, गणेश अकाजी गवई, विठोबा मून पांडे, कालिचरण नंदागवळी यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीतील दलितेतरांचे योगदान' हे या ग्रंथातील दुसरे प्रकरण आहे. यात डॉ. भावना पौळ यांनी साधारण १९२० ते १९३१ या कालखंडातील दलितेतर व्यक्तींनी बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीत दिलेल्या योगदानाची नोंद घेतली आहे. यात प्रामुख्याने बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी मदत करणारे आंबेडकर मास्तर, पेंडसे मास्तर, पार्शियन मास्तर खोदाबक्ष बेहेरामजी इराणी, कृष्णाजी अर्जुन केळुस्कर, ना. म. जोशी या शिक्षकांची माहिती दिली आहे. त्याचबरोबर महाराज सयाजीराव गायकवाड, पंडित आत्माराम, राजर्षी शाहू महाराज यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणासाठी मदत केली. तसेच 'मूकनायक', माणगाव परिषदेच्या निमित्ताने शाहू महाराजांनी केलेल्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेचे अधिपती सर चिमणलाल हरिलाल सेटलवाड, उपाध्यक्ष मेयर निस्सीम रूस्तुमजीजीनवाला, जी. के. नरीमन, डॉ. परांजपे, डॉ. व्ही. पी. चव्हाण, डॉ. बाळासाहेब खेर हे पदाधिकारी होते. समाज समता संघाचे पदाधिकारीदेखील ब्राह्मण, कायस्थ, शिंपी, भंडारी इत्यादी जातींचे कार्यकर्ते पदाधिकारी होते. ऐतिहासिक महाड सत्याग्रहासाठीही अनेक दलितेतरांनी योगदान दिले. त्यात प्रामुख्याने सी. के. बोले यांचा उल्लेख करावा लागतो. डॉ. पौळ यांनी एक अत्यंत महत्त्वाचा संदर्भ दिला आहे. महाड सत्याग्रहासाठी विठोबा महादेव वाडवल हे मराठा समाजातील गृहस्थ आले होते. तर फत्तेखान देशमुख या मुस्लिम व्यक्तीने महाड परिषदेसाठी जागा उपलब्ध करून दिली. विशेष म्हणजे त्यांच्यावर सवर्णांनी दबाव आणला होता. मात्र तो दबाव त्यांनी झुगारला. मनुस्मृती दहन, बहिष्कृत भारत, जनता साप्ताहिक, पर्वती सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह या महत्वाच्या लढ्यात बाबासाहेबांना अनेक दलितेतरांनी सहकार्य केले आहे.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कोलंबिया विद्यापीठातील शिक्षणापासून खास मित्र राहिलेले नवल एम. भथेना या पारशी गृहस्थाच्या विशेष मदतीची नोंद आहे. बाळ गंगाधर टिळक यांचे चिरंजीव श्रीधरपंत टिळक यांनीही बाबासाहेबांच्या चळवळीत खूप महत्त्वाचे योगदान दिले आहे. वेलिनकर वकील, जेधे-जवळकर, बापुसाहेब सहस्त्रबुद्धे, भाई अनंत चित्रे यांचेही योगदान मिळाले. जिवप्पा लिंगाप्पा ऐदाळे या लिंगायत समाजातील व्यक्तीने बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली बहिष्कृत अनाथ विद्यार्थी आश्रम सुरू केला. मुकुंदराव पाटील, देवराव नाईक, पंजाबराव देशमुख रत्नपारखी बंधु, वामनराव पत्की यांनी बाबासाहेबांच्या चळवळीला बळ दिले.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक चळवळीतील दलितेतरांचे योगदान' हे तिसरे प्रकरणही महत्त्वपूर्ण नोंदी घेणारे आहे. यात गोलमेज परिषद, पुणे करार, धर्मांतराची घोषणा, स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना या महत्त्वपूर्ण घटनाक्रमात डॉ. आंबेडकरांना अनेकांनी सहकार्य केले, त्याची दखल डॉ. भावना पौळ यांनी घेतली आहे. बॅरिस्टर मोहम्मद अली जिना यांनी बाबासाहेबांना घटना समितीमध्ये जाण्यासाठी मदत केल्याचा संदर्भ लेखिकेने दिला आहे. प्राचार्य म. भि. चिटणीस, संत गाडगेबाबा महाराज, संत तुकडोजी महाराज यांचीही नोंद या ठिकाणी घेतली आहे.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत दलितेतर महिलांचेही खूप महत्त्वाचे योगदान आहे, त्याची मांडणी चौथ्या प्रकरणात केली आहे. लंडन येथील शिक्षण काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिसेस फ्रॅन्सिस्का फिझिराल्ड उर्फ फॅनी यांची खूप मदत झाली. ड्रेशरबाई, जनाबाई जोशी, वत्सुताई चित्रे, श्रीधर टिळक यांची पत्नी शांताबाई, मनोरमा प्रधान, ताराबाई जवळकर, विमल वैद्य, शफी तय्यबजी, इंदिराबाई नाईक अशा अनेक महिलांनी बाबासाहेबांच्या कार्यात आपआपल्या परिने योगदान दिले आहे. या सर्वात ठळक नाव म्हणजे डॉ. शारदा कबीर हे होय. त्यांना डॉ. सविता आंबेडकर किंवा माईसाहेब म्हणून ओळखले जाते. माईसाहेबांनी बाबासाहेबांची त्यांच्या उत्तर आयष्याच्या काळात अत्यंत काळजीने देखभाल केली. संविधान निर्मिती, हिंदू कोड बिल, मिलिंद महाविद्यालयाची स्थापना, बुद्धिस्ट सोसायटीची स्थापना, बौद्ध धम्माचा स्वीकार या महत्त्वाच्या पण ऐतिहासिक घटनांप्रसंगी डॉ. माईसाहेब यांची बाबासाहेबांना खंबीर साथ मिळाली.

एकूणच डॉ. भावना पौळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र चळवळीत दलितेतरांनी जे महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, त्याची परिश्रमपूर्वक व अभ्यासपूर्ण नोंद घेतली आहे. अनेक दुर्मिळ संदर्भांची जुळवाजळव करून त्यांनी हे संशोधन पूर्ण केले आहे. जाती-धर्मांच्या नावाखाली माणसामाणसांत फूट पाडण्याचे कटकारस्थान आखले जात आहे. सध्याच्या काळात अनुसूचित जाती आणि उच्च समजल्या जाणाऱ्या जातींमध्ये दरी वाढते आहे, किंबहुनी ही दरी वाढविण्याचे जाणिवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. अशा स्थितीत यासारख्या संशोधन ग्रंथाचे महत्त्व लक्षणीय ठरते. आंबेडकरी चळवळ अधिक व्यापक आणि समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा स्वरूपाचे संशोधन पुढे येणे गरजेचे आहे.

# कुठे हरवल्या मराठी शाळा ?



अंजली औतकार
संपर्क क्र. 8208149689

आधुनिक केसरी

**मराठीची वाढती अधोगती पाहून एकेकाळी कुसुमाग्रजांनी म्हटलं होतं " माझी मराठी मंत्रालयासमोर भीक मागत आहे " तेव्हा मला ते वाचून वाईट वाटलं होतं. आज मला हे ऐकून वाईट वाटतं जेव्हा मराठी शाळेची महती सांगताना आजचे पालक सांगतात " धन्य ती मराठी शाळा जिने आम्हाला इंग्रजी शाळांची फीज भरण्याच्या पात्र बनवलं" मला हे पाहून देखील वाईट वाटतं जेव्हा सकाळी माझ्या छोट्याशा गावात एक स्कूल बस येते आणि गावातील 90% पोरं त्यामध्ये बसून जिल्ह्याच्या ठिकाणी शिकायला जातात एका इंग्रजी शाळेत अशी मुलं ज्यांना अजून आई-बाबाही बोलता येत नाही.... आणि त्यापेक्षाही जास्त वाईट वाटतं जेव्हा मी माझ्या जिल्हा परिषदेच्या शाळेसमोरून जाते आणि तिथे शाळेसमोरच्या ब्लॅकबोर्ड वर पटसंख्या पंधरा-वीस अशीच काहीशी आढळून येते.**

हे बघा घाबरून जाऊ नका तुम्ही तुमच्या मुलांना इंग्रजी शाळेत न टाकता मराठी शाळांमध्ये टाका, माझ्या मराठीवर दया करा, अशी दिनवाणी विनंती या लेखातून करणार नाही आहे मी . फक्त थोडंसं विवंचन करणार आहे या विषयावर, की आज मराठी शाळा म्हणजे लेस फॅसिलिटी , कमी दर्जाचे शिक्षण आणि आयुष्यभरासाठी मागासलेपणा असं आम्हाला का वाटतं . पण मी डिजिटल माध्यमात वावरणारी मुलगी आहे आणि म्हणून उगीच काय काय कमतरता हे सांगून प्रशंसा ऐकण्यास मी जराही उत्सुक नाही, शिवाय माझ्या व्हाट्सअप स्टेटस ला मला दिसतं की पंढरपूर जवळील करकंब येथील छोट्याशा चाळीस पन्नास विद्यार्थी असणाऱ्या शाळेतील घाटुळे सर नवनवीन उपक्रम आणून तिथल्या मुलांना जगभरातल्या गोष्टी सांगून जो प्रयत्न करत आहेत, ज्यांच्याकडून मी कधीतरी मराठी शाळेतच इंग्रजी शिकायचे ते सर आज आधुनिक जगासोबत चालताना शाळेत डिजिटल प्रोजेक्ट घेऊन येतात... तेव्हा ह्या शिक्षकांचे प्रयत्न पाहून मी गप्प कशी काय राहू शकते ? जेव्हा की मला माहिती आहे मी दोन शिक्षकांचा उल्लेख करत आहे संपूर्ण महाराष्ट्रात असे असंख्य शिक्षक आहेत अगदी शाळेत फक्त एक विद्यार्थी शिकायला येतो म्हणून 35 किलोमीटर अंतरावरून एसटीने प्रवास करून एका विद्यार्थ्याला शिकवायला येणारा शिक्षकही आहे. तुमच्या हातात सध्या मोबाईल असेल त्यावर वाबळेवाडी ची मराठी शाळा शोधा ! ती शाळा एक आंतरराष्ट्रीय दर्जाची महती प्राप्त झालेली मराठी माध्यमाची शाळा आहे. ती शाळा गावकऱ्यांनी बक्षीस पत्र म्हणून दिलेल्या जमिनीवर उभारण्यात आलेली एक फाईव्ह स्टार शाळा आहे जिथे मराठीची संकल्पना, अंगणात भरणाऱ्या मराठी शाळेची संकल्पना टिकवून ठेवली जाते काचेच्या भिंती बांधून की त्या कधीही उघडता येतील आणि मुलांना आपण बाहेर बसलो आहोत असा फील येईल , एकीकडे तिथे डिजिटल माध्यमातून म्युझिक कंपोज करण्यापासून ते रोबोट बनवण्यापर्यंत सगळं काही शिकवलं जातं. आता हे सगळं पाहत असताना मी हा आरोप कधीही सहन करून घेणार नाही की मराठी शाळा खराब असतात ! पण मग चुकत कुठे ? आज गाव खेड्यातली अशी पालक मंडळी ज्यांच्याकडे उद्याची इन्व्हेस्टमेंट म्हणून जमा करायला रुपया नाही , ते सुद्धा माझा मुलगा माझी मुलगी मागे राहू नये ,म्हणून त्यांना इंग्रजी शाळेत टाकणं गरजेचं आहे त्यासाठी अहोरात्र कष्ट करताना दिसतात. अशी कामगार मंडळी ज्यांच्या पगारात त्यांचा घर खर्च भागवणे कठीण होतं ते कर्ज घेऊन मुलांना इंग्रजी शाळांमध्ये टाकत आहेत. इंग्रजी शाळेत टाकू नका किंवा चांगल्या शाळेत टाकू नका हा माझा मुद्दा नाही. माझा मुद्दा हा की झेपत नाही तरीसुद्धा मुलांचं भविष्य पाहता इंग्रजी शाळा हाच उत्तम उपाय आहे ही भावना का आणि कुठून आली ? त्याला कारण काय आणि आपण कुठे कमी पडतो ? मराठी शाळांमध्ये शिकल्यावर समोर स्कोप नाही मुलं मागे राहून जातात असली वायफळ चर्चा जेव्हा कानावर येते तेव्हा आत्मपरीक्षणाची गरज भासते. मी सकारात्मक उदाहरण सांगितली म्हणून हे सत्य कधीच बदलणार नाही की, आज मराठी शाळा म्हटली की टाईमपास करत शिकवणारे शिक्षक , जुन्या पद्धतीचे शिक्षक किंवा फक्त खिचडी खायला शाळेत जाणारी मुल, किंवा मग साधं मुलांना थँक्यू शब्दाचा अर्थ कळत नाही हे असं काहीच चित्र आपल्यासमोर उभा राहतं. ज्या भाषेचा जनमानसातला उपयोग कमी होऊ लागतो ती भाषा संपून जाते , माझी मराठी देखील अशाच संपण्याच्या मार्गावर आहे.

पण आपण विचारच करत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत तुम्हाला तुमची मातृभाषा शिकवली जाते अगदी जेवणात मीठ असावं तेवढी. अहो ते खरं असेल पण माझ्या मराठीचं काय ? दर्जाहीन म्हणून तुम्ही तिचा अस्तित्व संपवत आहात त्याचं काय ? वर सांगितल्याप्रमाणे जे पालक आज इंग्रजी शाळांची फीज भरत आहेत ते जेव्हा मान्य करतात की आम्ही मराठी शाळांमधून शिकलो आहोत तर मग जगात असं काय बदललं की त्यांची पाल्य मराठी शाळेत शिकून नाही उभी राहू शकत. शिवाय अट्टाहास देखील नाही, संपूर्ण शिक्षण मराठी भाषेतून घऊ द्या असे तरी कोण म्हणतंय... पण किमान चौथीपर्यंत मराठी शाळेत शिकली तर काय फरक पडतो ? मी तर म्हणते हा फरक पडतोच कुठे विश्वभरातले मोठे मोठे नायक, मोठे मोठे खेळाडू त्यांच्या मातृभाषेत बोलतात आणि संपूर्ण जग त्यांना ट्रान्सलेट करून ऐकत.

आता आपले प्राईम मिनिस्टर नरेंद्र मोदीच घ्या ना विदेशात जाऊन जेव्हा ते भाषण देतात तेव्हा साईडला ट्रान्सलेटर उभा असतो , म्हणून मी म्हणेल एका भाषेत शिक्षण झालं किंवा फक्त एक मातृभाषा येते म्हणून तुमच्या यशाला कुणीच पाय बंद घालू शकत नाही. उलट आपण पाय बंद घालतो आहोत आपल्या संस्कृतीला हा विचार करून की मुलांना शिकवायचे कारण त्यांना नोकरी भेटावी आणि नोकरी इंग्रजी शाळेतून शिकल्याने भेटते कुठल्याही गोष्टीचा अपूर्ण ज्ञान हे नेहमी घातकच असतं म्हणून आधी पालकांनी आपली मानसिकता बदलायला हवी की मराठी शाळेतून शिकल्यावर मुलांना पुढे जाता येत नाही.



पण ही झाली नाण्याची एक बाजू दुसरी बाजू ही सुद्धा खरी आहे की मराठी शाळांचा दर्जा जो वेळेबरोबर बदलांना स्वीकार करून वाढायला हवा होता तो कुठेतरी वाढला नाही. डिजिटालायझेशनच्या जगात जिथे ऑनलाईन शिक्षण पद्धती आल्या , तिथे अजून सुद्धा आपण नवीन प्रणालींचा स्वीकार करायला तयार नाही आहोत किंबहुना असं म्हणेल की प्रयत्न करायलाच तयार नाही आहोत. मी वाबळेवाडीतील शाळेचे उदाहरण दिलं तसं असंख्य शाळा आहेत ज्यांनी बदलत्या प्रवाहासोबत बदल घडवून त्या त्या ठिकाणच्या मराठी शाळांना एक उच्च स्थान मिळवून दिलं आणि तिथे आनंदात विद्यार्थी शिकतही आहेत .

पण बोटावर मोजण्या इतक्या त्या शाळांचे उदाहरण देऊन पडद्यामागची दुसरी विदारक अवस्था झालेल्या मराठी शाळांची गोष्ट न सांगणं म्हणजे भेदभाव होईल. तुम्ही प्रयत्न करा ना... शिक्षकांना नवीन नवीन टेक्नॉलॉजीच्या ट्रेनिंग द्या. शक्य असेल तिथे आजच्या युगातील नवीन ज्यांना तंत्रज्ञानाच्या युगाचं नॉलेज असेल ज्यांना नवीन शैक्षणिक धोरणांबद्दल पुरेपूर माहिती असेल जे बदल घडवून आणायला तयार असतील अशा शिक्षकांची नियुक्ती करा.

उदाहरणासाठी इंग्रजी शाळा आहेतच की शिकण्यासाठी कुणाकडूनही शिकता येतं तिथे ज्या सुविधा आहेत त्या सुविधा आपल्याला कशा उपलब्ध करून देता येतील याकडे लक्ष द्या.

हो आता यातून सुखकर मार्ग काढायला खूप जण म्हणतात सरकारी शाळांची अवस्था अशीच असते . तुम्ही मराठी शाळेकडे सरकारी शाळा म्हणून का बघता जेव्हा मराठी आणि इंग्रजी दोन्ही शाळांमधून शिकणारा विद्यार्थी हा भारताचाच भविष्य आहे तेव्हा दोघांनाही सुरुवातीपासून समान शिक्षण भेटायला पाहिजे ना ? असं म्हणतात जिथे इच्छा तिथे मार्ग मग सरकारकडे ह्या बदलांसाठी मागण्या करा. आता काहीजण म्हणतील एका गावातल्या एका मराठी शाळेतला एक शिक्षक मागणी करून ती पूर्ण होणार आहे का ? तर संपूर्ण गावाला मागणी करायला लावा. महाराष्ट्रात तर शेतकऱ्यांची अवस्था अजूनच वाईट आहे ते कुठून शिकवणार त्यांच्या मुलांना महागड्या शाळांमध्ये ? तेव्हा त्यांच्याकडे हा पर्याय उरतो ना की लोकशाहीत जगत असताना स्वतःच्या मुलांसाठी एका चांगल्या मराठी शाळेची व्यवस्था करून घेतील. हे बघा निवडणुकीच्या काळात मतदान मागायला तुमच्याकडे उमेदवार येतात ना , मग तुमच्या हिताची गोष्ट मागायला तुम्ही का नाही जाऊ शकत त्यांच्या कार्यालयासमोर ? एका गावाने बदल होणार नाही अशा संपूर्ण महाराष्ट्रातील शाळा अशी संपूर्ण महाराष्ट्रातील गाव आणि मी तर म्हणेल गावच का शहरातल्या लोकांना आंदोलन म्हणजे फार अट्रॅक्शन चा विषय वाटतो मग त्यांनी का प्रयत्न करू नये की ह्या मराठी शाळांचे इन्फ्रास्ट्रक्चर, इथल्या शिक्षणाचा दर्जा आणि तिथलं वातावरण बदलाव यासाठी. मी नक्कीच या क्षेत्रातली एक्सपर्ट नाही पण मराठी शाळेतून शिकलेली एक विद्यार्थी आहे आणि या गोष्टीचा मी सुद्धा स्वीकार करते की जर समान शिक्षण सुरुवातीपासून मिळणार असेल तर आणि तरच देश पुढे जाऊ शकेल कारण कितीतरी हुशार बुद्धिमान विद्यार्थी फक्त आजच्या कॉम्पिटिशनच्या काळात टिकू शकत नाहीत म्हणून मागे राहतात, खरंतर किती मोठा टॅलेंट मागे पडतंय. ज्या हरवल्यात त्यांचं जाऊ द्या पण ज्या मराठी शाळा आहेत अजून त्यांच्यासाठी तरी आपण प्रयत्न करूयात. जे चित्र तुमच्यासमोर उभा आहे ते चित्र खोटं आहे मराठी कमी दर्जाची किंवा तुम्हाला मागे खेचणारी नाही हे सत्य, हे शाश्वत सत्य समजून घ्या कारण आज जर तुम्ही भाषा वाचवली नाही तर उद्या तुम्ही वाचणार नाही आहात.

## प्राण्यांची शाळा

शेपटीवाल्या प्राण्यांची एकदा
भरली हो झाडाखाली शाळा
छोटे माकड तर महाखोडकर
कोणाचे काहीच ऐकेना बाळा..१

वेलीचा करुनी खेळे झोपाळा
दुडूदुडू पळे झाडावरती एकटा
पेरू अन् मिर्ची खायला ताजी
पोपटही तेथे आला मग नकटा
...२

दोघांची जमली घट्ट मैत्रीही
ससोबाचा गाजरावर डोळा
काऊ,चिवू,मैना,मोर,लांडोर
मस्ती करण्या झालीत गोळा...३

वर्गात वाढला गलका जेव्हा
रागात आले वाघोबा मास्तर
डरकाळी फोडता झाली शांत
हजेरी देण्यास चडीचूप हजर....४

सिंहोबाची स्वारी आली जेव्हा
वर्गात चालला गणिताचा तास
तोंड पाठ म्हणता पाढे,कविता
झाले त्यांच्या परीक्षेत हो
पास...५

मधल्या सुट्टीत शाकाहारी जीवा
ताठ जिराफ देई प्रेमाने हो चारा
चित्ता येता वेगाने तपासणी
शाळा
सुटला प्रश्नांचा भयानक हो
वारा...६

माकडाने खाल्ला खारूचा डब्बा
छडी बसताच नयनी आले पाणी
कार्यक्रमी स्वागतास पाहुण्यांच्या
कोकीळ मंजुळ स्वरे गाई
गाणी...७

मागच्या रांगेत बसत शांत
संयमी
लांडगा,कोल्हा,रानमांजर हुशार
काम सांगताच लागे अभ्यासाला
ते धूर्त,लबाड,स्वार्थी,कामचु
कार...८

प्राण्यांची शाळा निसर्गात रमे
एकोप्याने जंगलात जाई वेळ
नित्य नवे पाठ शिकती प्राणी
जमला तेव्हा त्यांच्याशी मेळ ..९

प्रेम द्या अन् प्रेम घ्या म्हणत
जपूया हो निसर्गाचे वरदान
त्यांच्यासम जीवनी एकोपा
टिकवू एकमेकात हो महान...१०

- सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे

## उसासा...

तूच  सांग हे माझ्या राजा निसर्गा
एक सांधा सांधता सांधू मी
आता कसा,
भेगळल्या मायच्या ओटीत
तूच सांग घालू, घालू तरी कसा
पसा.
लै वकुत झाला,गिळलेल्या त्या
आवंढ्याचा सांडू दे रे आता
उसासा...
जीव कंठाशी रे आला आता
जशी आमावस्या पाहिली मी भर
दुपारच्या दिसा.
नयनाचा पाझर आज नभाला
दाटूनी  यावा  असा,
सुकलेल्या कंठात फुटुनिया
पान्हा, ओलावावा घसा...
आतुरली माय अन् तिची ओटी,
जोजवण्या कुशीत तान्हा
लडिवाळ जसा,
आर्त  ऐकुनी साद तिची, पानांना
कळवित वाऱ्यावर
स्वार होऊनी ऐटीत ये तू असा.
जणू फेडीत डोळ्याचे पारणे,
दूर देश सोडूनी आलिंगन द्याया
ये रे आता जसा असशील
तसा...
© वैशाली इंदुमती जाधव -
महाडिक.
सं. क्र.- ९७६७४३७९२३

## नवयुवकांनो...

भारतभूच्या नवयुवकांनो ,
मंत्र जपूया नवा...
व्यसनांपासून दूरच तुम्ही,
जीवन तुमचे ठेवा...

माय भूमीचे रक्षक तुम्ही,
तुम्हीच शिलेदार...
अविचाराने तुमच्या सारे,
उध्वस्त होईल घरदार...
नका न विझवू स्वतःने,
प्राणज्योतीचा दिवा...
व्यसनांपासून दूरच तुम्ही...

उद्ध्वस्त होईल कुटुंब तुमचे,
पोखरंत जाईल जीवं...
जन्मदात्या  त्या मायबापांची,
येऊ द्या थोडी किवं...
असे असू द्या वर्तन तुमचे,
जगास वाटेल हेवा...
व्यसनांपासून दूरच तुम्ही...

दारू, गांजा, अफीम ,गुटखा,
नका कुणी हो घेऊ...
अंमली पदार्थांपासून साऱ्या,
दूर स्वतःला ठेवू...
मंत्र सुखाचा एकच तुम्ही,
आज हो ध्यानी घ्यावा...
व्यसनांपासून दूरच तुम्ही,
जीवन तुमचे ठेवा...

सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे
चोपडे परभणी ९८२३०६६६०६

## घना बरस ना

तुझे बरसने अल्लडपणाचे
अंगणात दुडू दुडू नाचून गेलास
कोरडया खट्ट पडलेल्या भुईला
वरवरचा नुसताच ओलावा
दिलास..
तुझ्या येण्यानंच फुलतील
नयनांच्या डोहातली हिरवी स्वप्ने
रुपडं सारखच बदलतंय गड्या
अंदाज वाटतात अपने अपने...
सकलास तू हवाहवासा
आस लावूनी बसले तुझ्याच
वाटेवर
जीवास घोर लागूंनी राहिला
बी कसे रुजेल सांग एकाच
कुशीवर..
तू टेकसी डोंगरास तेंव्हा
वाटे जणू सांगावा धाडलास
कळ सोसली मूक वेदनेची
सुखाचा घास थोडाच वाढलास,..
सखा आहेस तू जीवाचा
कोडी सोडवशील का मनातील
चिंब सरीत न्हाऊनी पक्षीही
गातील
मग सुरेल गीत रानातील..

अशी हुलकावणी नको देऊस
कोसळू देत सरीवर सरी
तृप्त होऊ देत जीव सारे
धरणीची ओटी तूच हिरवाईने
भरी...


©रंजना सानप
मायणी (सातारा)





## माझ्या मनात मी

माझ्या मनात मी
दिली तुझ्या मंदिराला जागा
तुझ्या वाचूनी आहे
तुझा गाभारा मोकळा
तन मन धना ने पुजीतो तुला
वाट पाहत डुबलो
तुझ्या चिंतनात आता
तुझ्या हक्काच्या जागेवर
तू कधी घेशिल कब्जा
वाट पाहूनी आहे मी उभा एकटा
माझ्या आतल्या मंदिरातल्या
गाभाऱ्यावर तु हो विराजमान
आता
माझ्या मनात मी
दिली तुझ्या मंदिराला जागा
तुझ्या वाचूनी आहे
तुझा गाभारा मोकळा
लक्ष्मण वाल्डे,कन्नड
मो.नं-8888606068



## संवाद ज्ञानोबा तुकयाचा

समस्त ज्ञानासी असशी तूच पाया
तूच ज्ञानराया, तुका म्हणे
केले तुवां खुले ज्ञानाचे भांडार
हर्ष अपरंपार होई लोका.
थोर तुझा महिमा
काय मी वर्णावा
निःशब्द हा तुका ज्ञानदेवा.
दावियली लोकां ऐसी शब्दकळा
फुलविला मळा अमृताचा
सोसुनी प्रहार लोकनिंदेचे
बोल अमृताचे प्रसवले.
गीतेचा तो अर्थ
सांगे ज्ञानेश्वरी
दिव्य ती वैखरी अमृताची.
म्हणे ज्ञानराजा ऐक ऐक रे तुकया
माझिया सखया भूलोकीच्या
रचियली तुवां अभंगाची गाथा
भाविक तो माथा टेकतसे.
रूढी परंपरा, दंभ अभिमान
व्यर्थ ते लक्षण भाविकांचे
दावियला तुवां भक्तिमार्ग लोका
धन्य माझा तुका बोले ज्ञानदेव.
काळावरी तरले तुझे ते अभंग
धरूनिया संग श्रीहरीचा
असे मी जरी पाया
तू झालासी कळस
आली देवळास
अलौकिक शोभा.
तुका म्हणे ज्ञानराजा
आता वंदितो चरण
न करी वर्णन
आणिक माझे.
साक्षी तया दोघा
इंद्रायणी पार
सोन्याचा पिंपळ डुलतसे.
धन्य  इंद्रायणी, धन्य चंद्रभागा
कृपा पांडुरंगा झाली तुझी.
©विश्वास देशपांडे,
चाळीसगाव

## श्री विठ्ठल...

परब्रह्म शोभे
सावळ्या रुपात
तीर्थ पंढरीत
विराजित ।

पाहता विठ्ठल
लोभ वाटे मनी
त्रैलोक्याचा धनी
विटेवरी ।

विठू माय बाप
पंढरी माहेर
मायेचा पदर
चंद्रभागा ।

अद्वैताचे रूप
प्रकटले आज
वैकुंठाचा साज
श्री विठ्ठल ।

- बलराज संघई

## मोह, माया

मोह, मायेच्या जाळ्यात
माणूस अडकून पडला
सारे भान गेला विसरून
भलत्याच वाटेला लागला

आज मोहाच्या लोभापायी
स्वतःलाही विसरून गेला
माझं, माझं डोई ओझं म्हणत
सत्यालाही सोडून दिला

वाटेकरी झाला अभिमानाचा
बोलू लागला नको ते काही
मानतच नाही हो कोणाला
माझ्या सारखा म्हणते कोणी नाही

कधी निघणार त्या जाळ्यातून
हेच काही समजत नाही
माणूस बोलण्यातच राहिला
माणूस शोधूनही सापडत नाही

नका गुंतू रे मोह, मायेच्या
जाळ्यात
आता तरी पडा रे थोडे बाहेर
स्वाभिमान विकता कशाला. . ?
हेच का म्हणून नाही कळत

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## "पाखरं"

धरणीला आभाळाचा
लळा लागला
की पाऊसधारा कोसळतात
भिजवून चिंब चिंब करून
सोडतात
त्या भूगर्भाच्या पृष्ठभागाला
तिची लाही लाही झालेली पाहून
झिरपू लागतात...
पाझरू लागतात...
उंचच उंच फेसाळणाऱ्या
झऱ्यातून
घननाद घुमू लागतो नभात
पारंब्याही पार सळसळतात
नितळ प्रतिमेला शहारतात
आणि मग वसुंधरेची पाखरं लुब्ध
होतात..
©प्रदीप बडदे, नवी मुंबई
(९५९४०२७९९५)



## आयुष्याच्या वाटेवर

तिच रोजचं अस तळमळनं
या कुशीवरून त्या कुशीवर वळणं
मनात विचारांच काहूर उठवून
उसासे टाकणे, मनाला टोचत राहतं
बाई गं! थांबव हे आता
किती विचार करशील त्याचा
सुखं दुःखाचे असे तरंग
उठतच असतात आयुष्याच्या वाटेवर
किती गटांगळ्या खाशील या गर्तेत
मूलं नसणं हा काही सक्षभ्य अपराध
नाही आहे तुझा
बाई गं! नसतात सगळ्याच
झाडांना फुल फळ येत
पण ते बहरतात...
ठेव थोडा विश्वास स्वतःवर
अन बन पक्ष्यांना आधार देणाऱ्या
त्या डेरेदार वृक्षासारख जग
आनंदाने इतरांच्या आयुष्यात आनंद पेरीत
प्रा.डॉ. संगीता दोंदे
मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद

## आम्ही वारकरी

आम्ही वारकरी ! चंद्रभागे तीरी
दंग भजनात ! पांडुरंगा !!१!!
दुःखे पचवून ! मन संसारात !
मदतीचा हात ! माथ्यावर  !!२!!
डोळे पाणावले ! तुला विनविले !
धाव मायबापा ! बा विठ्ठला  !!३!!
आस दर्शनाची ! हिच एक आशा
तोड भय पाशा ! क्षणार्धात  !!४!!
मार्ग जीवनाचा ! कर सुखकर
तुझे उपकार ! सदोदित  !!५!!
ऐक माझी आता ! जीवनाची व्यथा !
टेकवितो माथा ! चरणाशी  !!६!!
- जनार्दन बाळा गोरे
छत्रपती संभाजी नगर.

## पाऊस...

आभाळात मेघ काळे, नि वीज  थैमान घाली.
चोहीकडे सुटला वारा, पाऊस पडतो खाली.
सूर्य ढगात लपला, उतरे उन्हाचा पारा.
मुसळधार कोसळे, टपोऱ्या थेंबांच्या धारा.
मुसळधार पावसाने, शिवार चिंब- चिंब केला.
तृप्त झाली काळी भुई, सारा परिसर न्हाला.
नदी-नाले,ओढे हे, भरभरूनी वाहती.
जमलेला पाला-पाचोळा, सोबत घेऊन जाती.
रानपाखरे जमली, कोकीळा ही गाई गाणी.
सृष्टी ही प्रसन्न दिसे, निथळ साचलेले पाणी.
पाऊस बरसल्याने, मातीचा येई सुगंध.
रानावनात धावती, मृग-हरिणी बेधुंद.
वनात नाचतो मोर, पशु-पक्षी ही आनंदली.
देवाजीच्या करणीने, सारी धरणी हसली...!
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४

## कसा हा पाऊस

कसा आहे न बघ हा पाऊस
फेडत नाही भिजायची हाउस
कुठ लपलास काय ठाऊक
येत नाही जरा सरीना घेऊन
आता तुझी वाट बघून
गेले डोळे माझे थकून
फुल,पानें पण कोमेजून
रोपटे गेलेत बघ वाकून
कधी येशील तू सांग ना
निरोप तरी पाठव एकदा
निघून गेला जून महीना
नाही तुझा अजुन पत्ता
झिर मिर झिर मिर येतोस
आशा दाखउन तु जातोस
बेमौसमी कधीही बरसतोस
या दिवसात दांडी मारतोस
शेतकरी राजान काय कराव
तुझ्या भरोशावर त्यान रहाव
शेतात कस काय सांग पेराव
की कर्जात बुडून त्यान मराव
- कु. कविता आधार चव्हाण,
जळगाव







# अनुराधा श्यामसुंदर भोगले... संपन्न व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी

सुलाखे हायस्कूलचे नातू सर पुढे अर्नाळा येथील विद्यामंदिरात मुख्याध्यापक म्हणून खूप वर्षे कार्यरत होते. प्रतिभा नातूनी पुढे बी.ए.बी.एड.ची पदवी प्राप्त केली.विवाहा नंतर प्रतिभा नातूची...सौ.अनुराधा शामसुंदर भोगले झाली.

आपले वडील नातूसरांकडून ज्ञानदानाचा वरदहस्त लाभलेली अनुराधा भोगलेनी बोरवलीच्या " सुविद्यालयात ". शैक्षणिक ज्ञानदानाच्या कार्यात पदार्पण केले. रामचंद्र नातू सरांच्या सुसंस्कारित मुलीनं शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक दालनांत आपल्या कर्तृत्वाने सप्तरंग चितारले.हिने मराठी बरोबरच हिंदी.. संस्कृत.. आणि अर्थशास्त्र अशा विषयांचे अध्यापन केले.




> सुलाखे हायस्कूल बार्शी येथील रामचंद्र नातू सर...शास्त्र..व गणितज्ञ असणारे हाडाचे शिक्षक...बार्शीत त्यांना न ओळखणारे विरळच.विलक्षण शिस्तीचे.. प्रगल्भ बुध्दीचे नातू सर शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचं नाव बार्शी मधे मोठ्या आदराने घेतले जातं असे.नातूसरांना शिक्षणाच्या बरोबरच विलक्षण भावपूर्ण काव्यरचना करण्याची आवडही होती.त्यांचीच मुलगी प्रतिभा नावाप्रमाणेच प्रतिभा संपन्न होती. आपल्या वडिलांच्या सुंदर संस्कारांची शिदोरी घेऊन आलेली प्रतिभा नातू शालेय जीवना पासूनच काव्यरचना करण्यात रमलेली होती.

प्रतिभा नातूची आई ही तर त्या काळात संगीत क्षेत्रातील विशारद पदवी प्राप्त करणारी बार्शीतील त्यांच्या घरण्या मधील एकमेव महिला होती. सौ.सुधा नातू (प्रतिभाची आई ) त्याकाळी मुलींना शास्त्रीय संगीत शिकविण्याचे क्लासेस घेत असतं. मुळात हुशार असणारी अनुराधा शामसुंदर भोगले हिच्या बालपणापासून कानावर संगीताचे संस्कार झाल्यामुळे तिला देखील गाण्याची आवड निर्माण झाली.

वडिलांच्या मुळें काव्यरचना रचना करण्यास सुरुवात केली होती.अनुराधा आपल्या काव्यरचना करण्याच्या छंदामधे इतकी रममाण झाली की आपल्या मित्र.. मैत्रिणींना.. नातेवाईकांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देखील सुंदर काव्यपंक्ती करुन शुभेच्छा पाठवून देतं असे. अनुराधाने आपली गाडी चालवण्याची हौस वयाच्या ५०व्या वर्षी गाडी शिकून पूर्ण केली. अनुराधा भोगले हिने अगणित भावपूर्ण कविता केल्या. त्यानंतर अनुराधाचे तीन काव्यसंग्रह.. चारोळ्यांचे संग्रह देखील प्रकाशित करण्यात आले.



हायस्कूल पासून अनुराधाने अनेक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करण्याची आवड होती ती तिने विकसित केली. अनेक मोठ्या व्यासपीठावरुन काव्यवाचन...मुलाखतींचे निवेदन.. सूत्रसंचालन केले. त्यानंतर अनुराधा भोगलेला थेट दूरदर्शनच्या " काव्यकुंज " आणि " पिंपळपान " अशा दर्जेदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन.. काव्यवाचन करण्याची संधी मिळाली.

अनुराधाच्या जीवनातील तिच्या साहित्याला..कला गुण छंदांला ही जणू सोनेरी किनार लाभली. आपली शिक्षिकेची नोकरी सांभाळून अनुराधाने अनेक कार्यक्रमांचे नियोजन.. निवेदन.. काव्यलेखन.. काव्यवाचन.. निबंध लेखन.. अशा अनेक क्षेत्रांत अनमोल कामगिरी करत पुरस्कार मिळविले.

अनुराधाला कवयित्री म्हणून ओळख प्राप्त झाली त्याचं बरोबर अनुराधा एक चांगली लेखिका म्हणून नावारूपास आली.अनुराधाचे अनेक वैचारिक लेख महाराष्ट्रातील अनेक सुप्रसिद्ध दैनिकामध्ये प्रसिद्ध करण्यात आले.तिच्या अनेक दर्जेदार लेखांना..निबंधांना..काव्यरचनेला...पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

अनुराधा भोगले ही प्रतिभा नातू असल्या पासूनच म्हणजे शालेय जीवना पासूनच नाट्य.. अभिनयाची आवड होती अनुराधाने शालेय रंगभूमीवर सादर केलेल्या नाटकां पैकी वाहतो ही दुर्वांची जुडी , आधुनिक शाकुंतल , शारदा या नाटकांत कामे करून आपली अभिनयाची हौस पूर्ण केली




अनुराधाला शालेय जीवना पासूनच निसर्गाची पर्यटनाची विलक्षण आवड होती.पुढे जातं ही आवड अनुराधानी केवळ जोपासलीच नाही तर आपल्या मित्र मैत्रिणींच्या बरोबर कधी आपल्या परिवारासह भारतभर प्रवासा बरोबरच निसर्गाचा आनंद घेत घेत त्याची काव्य रूपाने जपणुक केली आपल्या शिक्षकाच्या तीन दशकांहून अधिक काळातील नोकरीत शालेय जीवनाच्या नोकरीमध्ये विद्यार्थ्यांसाठी अनेक शैक्षणिक सहलींचे आयोजन देखील केले .विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला गुण छंदाचे महत्व लक्षात घेऊन त्यांच्या कला गुणांना वाव दिला .त्यामागची तळमळ होती ती अनुराधा भोगले याच शिक्षिकेची. आपली शैक्षणिक जीवनाची ३३ वर्षांची सेवा एका आंतरिक तळमळीने पूर्ण केली खरी.पण शिक्षकांचं मनं अनेक ठिकाणी प्रकट होतं होतं हे बाकी खरं.

आधुनिक तंत्रज्ञान अनुराधाने सहजतेने आत्मसात केले . त्यांचाच वापर करत अनुराधाने निवृत्तीनंतर देखील विविध उपक्रमांच्या माध्यमातून आपल्या विद्यार्थ्यांना.. मित्र.. मैत्रिणींना.. नातेवाईकांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून अनेक कला.. गुण..छंद ..गायन..वादन.. चित्रकला.. हस्तकला..लेखन.. काव्यरचना...लेखन नी सादरीकरण...असे असंख्य उपक्रम ऑनलाईन घेतले , ज्यांना आपल्या आतापर्यंतच्या वाटचालीत आपल्या कला गुणांना... छंदांला वावच मिळाला नव्हता अशा स्नेही जनांना आनंद मिळाला व करोना काळात मनावरील ताण कमी झाला

अनुराधा भोगलेंच्या कौटुंबिक जीवनात देखील ती एक आदर्श गृहिणी म्हणून सगळ्यांच्या मनात तिची सुंदर प्रतिमा निर्माण केली आहे .अनुराधाचे पती शामसुंदर एका बॅंकेत मोठ्या पदावर व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. आपली नोकरी सांभाळून त्यांचा अनुराधाच्या प्रत्येक कार्यक्रमांना मोठं पाठबळ होते.त्यांचा मुलगा अलंकार यांच्यावर देखील दोघांचेही विलक्षण सुंदर असे संस्कार होतं.आई बाबांच्या परिश्रमाच्या फलश्रुतीच्या माध्यमातून अलंकार आज एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कंपनीत सिनिअर व्हाईस प्रिसिडेंट म्हणून कार्यरत आहे. त्याची पत्नी निकेता ही देखील पोस्ट ग्रॅज्युएशन केलंल असून ती एका नामांकित महाविद्यालयांत प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहे.तिचा मुलगा अनुराधाचा नातू हा देखील आई बाबांच्या प्रमाणेच विलक्षण बुद्धिमान आहे.आज तो १० वीत शिकत असताना आपल्या नातवालाही अनुराधा शिक्षणाचे धडेही देताना दिसत असतें.

अनुराधा शामसुंदर भोगले ( पूर्वाश्रमीची प्रतिभा रामचंद्र नातू) २ जुलैला आपल्या जीवनाच्या ७१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे तरी तिच्या मनातील संकल्पीलेली सगळी स्वप्ने साकार व्हावीत यासाठी आम्ही शुभेच्छा देतो...

यापुढील अनुराधाचे जीवनही आनंदमय सुखमय सुजलाम सुफलाम व्हावे हीच पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना करतो.



सुधीर कोर्टीकर
मो.नं.9765553312
जुई बी-६ अपार्टमेंट , तिरुपती पार्क , गुरु साहनी नगर ,
एन-४ सिडको , छत्रपती संभाजी नगर





# अशी बदलत गेली शाळा



दिपाली शेडगे
संपर्क क्र. 7775980646

आधुनिक केसरी

**"जो जगी शिकवी जगाला धन्य त्याचा जन्म आहे ज्ञानज्योती ठेवत ठेवा जिथे जिथे अज्ञान आहे!अथक प्रयत्न,परिश्रम करून वाघमारे सर आणि मी मुलांना शिक्षणाची गोडी लावली होती. आहे त्याच इमारती मधे आमची शाळा आनंदाने भरत होती. मुलं सुद्धाआनंदाने, आवडीने अभ्यास करत होती. गाणी, गोष्टी, विविध वस्तू तयार करणे, विविध उपक्रम यामुळे मुलं शाळेत रमत होती.**

कातकरी समाजाची मुल असल्यामुळे कधी डोंगरात दुपारी रानमेवा आणण्यासाठी जात असत.

तर कधी उनाडायला म्हणून डोंगर दऱ्या मधे भटकंती करायला जात असत.परंतु अथक प्रयत्न करून सरांनी आणि मी त्यांना शिक्षणाकडे वळवले होते. मुलांचे शिक्षण काही केल्या थांबले नाही पाहिजे हा एकच ध्यास आमच्या मनात होता. अश्यातच वाघमारे सरांची बदली दुसऱ्या शाळेवर झाली होती. त्यामुळे एक नवीनच आव्हान समोर उभे राहिले होते. शाळेला इमारत बांधकाम करण्यासाठी मंजूर झाली होती. मनाच्या इवल्याश्या कप्प्यात शाळेविषयी पाहिलेलं स्वप्न पूर्ण होणार होते. आम्ही सगळे जण,विद्यार्थी, पालक वर्ग, ग्रामस्थ, व्यवस्थापन समिती यांना मनापासुन आनंद झाला होता. खूप प्रशस्त इमारत मंजूर झाली होती.राठोड सर नव्याने शाळेत हजर झाले होते.नेहमी प्रमाणे शाळेत अध्ययन, अध्यापन सुरू होते. मुलं रोज न चुकता शाळेत येत होती. अभ्यास खेळ, गाणी, गोष्टी करत होती. पाहता पाहता आमच्या शाळेची सुंदर, प्रशस्त इमारत पूर्णत्वास आली होती. राठोड सरांनी देखील शाळेसाठी सहकार्य केले होते. मुले शाळेत रोज यावी, ती टिकावी, त्यांची गळती होऊ नये म्हणून मी आणि सर दोघेही खूप प्रयत्न करत होती.आदरणीय केंद्रप्रमुख श्री.जाधव सर यांनी वेळोवेळी लाखमोलाचे मार्गदर्शन केले. ते शाळेत आल्यावर पालकांना बोलावून घेत असत. त्यांना मार्गदर्शन करत असत. थोड्या कालावधी नंतर आम्ही नवीन शाळेत आमची शाळा सुरू केली होती.२०१२ साली इमारत पूर्ण झाली. २ प्रशस्त वर्गखोल्या, मुख्याध्यापक खोली, व्हरांडा, किचन शेड खूपच सुंदर रचना शाळेची झाली होती. नवीन इमारत पाहून मुल सुद्धा आवडीने शाळेत येऊ लागली. पालक सुद्धा आपुलकीने शाळेत येवू लागले. शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या मनावर रुजू लागले होते. मुलांना पालक रोज नित्य नेमाने शाळेत पाठवत असतं. कातकरी मुले असल्यामुळे अंघोळ करण्यासाठी नदीवर पाठवावे लागत होते.त्याचा शाळेचा गणवेश, इतर स्वच्छ्ता विषयी जागरूकता घेणे हे आम्हा शिक्षकांचे नित्याचे



काम झाले होते. ते काम आम्ही आवडीने करत असू. अंगणवाडी सेविका मोरे मॅडमची या कार्यात नेहमीच मदत होत होती त्यामुळे पालकांशी संपर्क साधणे सहज शक्य होत होते. बघता बघता मुलं शाळेत रोज येऊ लागली, अभ्यास, खेळ, गाणी, गोष्टी शिकू लागली. शाळेतील गमती जमती घरी सांगू लागली. बाग बगीचा आवडीने करू लागली.शाळेची स्वच्छता, साफसफाई करू लागली.मुलांमधे झालेला हा बदल खूप काही सुखद अनुभव देवून गेला. मनामधे पाहिलेले शाळेचे, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न साकार झाले होते. मुलांना हसत खेळत शिक्षण घेताना पाहून मन आनंदी झाले होते. मुलं नियमित पने शाळेत येत असल्यामुळे शाळेचे वातावरण प्रसन्न झाले होते. शाळेच्या भिंती बोलक्या झाल्या होत्या, शाळेची रंगरगोटी केली त्यावर रंगीबेरंगी चित्रे, फुले, फळे, शैक्षणीक चित्रे, आकृत्या, गणिती संबोध रेखाटले गेले होते.नव्याने रुजू झालेल्या वाघ सरांनी शाळेत अजून नवीन बदल केले. त्यामुळे शाळेचे रुप आणखी छान वाटू लागले.

**जणू काही मुले बोलत होती**
**"शाळा आमची आहे किती छान**
**आम्ही रोज शाळेला येणार !"**



# शिंदे - फडणवीस सरकारचे एक वर्ष- एक दृष्टिक्षेप

आधुनिक केसरी

राज्यातील शिंदे -फडणवीस सरकार सत्तेवर आल्याला आता एक वर्ष पूर्ण होत आहे या एक वर्षाच्या कारकिर्दीकडे कटाक्ष टाकल्यास आपणास असे दिसून येईल की या सरकारने अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत . शिंदे हे सर्वसामान्यांचे प्रतिनिधी म्हणून अतिशय चांगली कामगिरी बजावीत आहेत .तर फडणवीस आपल्या अनुभवाचा फायदा देत आहेत . मुळात शिंदे सरकारचे ४० आमदार हे मूळच्या शिवसेनेतून युतीत आले . न्यायालयाची टांगती तलवार सतत असल्याने अनेक दिवस अस्थिरता होती .पण अखेर सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिल्यामुळे त्यांची कारभारातील गतिमानता वाढली आहे . या शिवाय खरी शिवसेना कोणाची हा निवडणूक न्यायालयाचा निकाल सुद्धा शिंदे यांच्या शिवसेनेच्या बाजूने लागला आहे .अर्थात यामुळे त्यांचा मंत्री मंडळ विस्तार काही काळ रखडलेला होता कित्येक ठिकाणी एकाच मंत्राला अनेक जिल्हे पालक मंत्री म्हणून सांभाळावे लागत होते . अनेक महामंडळाच्या . नेमुणूका सुद्धा झालेल्या नाहीत .या काही गोष्टी अजूनही युतीचं सरकारचे अपयश दाखवितात .१ ऑगस्ट ला सरकारमध्ये १८ मंत्र्यांचा शपथविधी झाला . आज जवळपास दहा ते अकरा महिने हे १८ मंत्री राज्याचा कारभार करतायेत अजूनही सतत विस्ताराच्या बातम्या मधून मधून येत आहेत पण तो का रखडला आहे याचे नक्की कारण कळत नाही . कदाचित काही नाराजांची भीती असावी .आता तरी येत्या पावसाळी अधिवेशापूर्वी तो विस्तार होईल अशी अशा करूया . या एक वर्षाच्या कालावधीत शिंदे सरकारच्या अनेक मंत्र्यांनी वादग्रस्त विधाने केली . त्यावर चर्चा होत राहिल्या . मध्यंतरी शिंदे शिवसेनेच्या सर्वत्र जाहिराती प्रसिद्ध झाल्या . त्यावरून बरीच चर्चा झाली . अखेर हे प्रकरण मिटले शिवसेना भाजपा यांच्यात पक्षीय समन्वय असावा या दृष्टीने दोन्ही पक्षातील काही लोकांची एक समन्वय समिती असावी . पण गेली वर्षभर अशी समिती स्थापना होऊ शकली नाही हे सुद्धा एक अपयश होय . असे जरी असले तरीही सरकारने महिला, शेतकरी, उद्योजक यांच्या दृष्टीने अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले . कारभारात गतिमानता आणली . मुख्यमंत्री शिंदे हे सतत कामात व्यग्र असतात . व सर्वसामान्यांच्या प्रश्नाला महत्व देतात . मग एखादा अपघात असो कि पंढरपूर वारीचे व्यवस्थापन असो .. तेथे जातीने स्वतः लक्ष घातले होते . देशात अनेक मुख्यमंत्री वारी निमित्त पंढरपूरला जाऊन आले पण त्याचे व्यवस्थापन अगोदर पाहणारे एकनाथ शिंदे हे एकमेव मुख्यमंत्री होत . महिलांना एस टी मध्ये ५० टक्के सवलत दिली . ७५ वर्षावरील जेष्ठाना फुकट प्रवास करावयाची संधी दिली . याचा परिणाम असा झाला कि एकेकाळी एस टी तोट्यात होती आता ती फायद्याच्या दिशेने जाऊ लागली आहे . दावोस येथे महाराष्ट्रात गुंतवणुकीचे एक लाख ३७ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले याचा फायदा महाराष्ट्राला उद्योग विकासात निश्चितच होणार आहे . शेतकऱ्यांना हजार रुपये देणार ही सुद्धा शेतकऱ्यांच्या दृष्टीने चांगली घोषणा आहे . जनआरोग्य योजनेत सर्वांना पाच लाखापर्यंत कवच दिले . कांदा उत्पादकांना प्रत्येक क्विंटल मागे ३५० रुपयांचे अर्थसहाय दिले . कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात १० हजार रुपयांची वाढ, पाचवी तसेच आठवी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ तसेच स्वातंत्र सैनिकांच्या निवृत्ती वेतनात वाढ करून या सर्व वर्गाला दिलासा दिला. नागपूर शिर्डी भरवीर पर्यंत खुला केला लेक लाडकी योजनेमार्फत पिवळ्या आई केशरी कार्ड धारकांच्या मुलींना लाभ वयाच्या १८ वर्षापर्यंत एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य देणार . शासन आपल्या दारी या योजनेत सुमारे ४० लाख नागरिकांना लाभ . मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून १२ हजार हुन अधिक उधोजकांना लाभ . बेरोजगारांसाठी ७५ हजार रिक्त पदावरील नोकरी भरती सुरू केली . हा बेरोजगारांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा निर्णय होता .शेतकऱ्यांसाठी केवळ एक रुपयात विमा भरून त्यांना दिलासा दिला या कामी सरकार ३३९२ रुपये भरणार आहे अतिवृष्टी झालेल्या शेतकऱ्यांना दुप्पट रक्कम तसेच तीन हेक्तर पर्यंत मदत जाहीर केली हे सर्व निर्णय शेतकरी, उद्योजक, व्यापारी, तसेच विद्यार्थी यांच्या हिताचे होते . एका वर्षात एवढे महतवाचे निर्णय घेणारे शिंदे फडणवीस सरकार हे खरेच जनसामान्यांसाठी काम करत आहे. अजूनही या सरकारला सुमारे एक ते दीड वर्ष कालावधी आहे . त्या मुदतीत आणखी लोकोपयोगी कामाची जनतेला अपेक्षा आहे.

शांताराम वाघ, 91 96234 525 53

# आदिपुरूषची चुकीची मांडणी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**बिग बजेट आणि तगडी स्टारकास्ट असलेला आदिपुरूष चित्रपट दिनांक 16 जूनला चित्रपटगृहामध्ये प्रदर्शित झाला तेव्हा पासून लोकांमध्ये रोष व निराशा असल्याचे दिसून आले.कारण यातील सर्वच पात्र व चित्रिकरण रामायण मालिकेच्या किंवा रामायणाच्या अनेक चित्रपटाच्या विपरीत असल्याचे दिसून येते.देशात अनेक भाषा आहेत त्या पध्दतीने वेगवेगळ्या भाषेत आपल्याला वेगवेगळे पात्र रामायणाच्या माध्यमातून दिसून येते व हुबेहूब रामायणाचे चित्रिकरण केल्या जाते आणि लोक सुध्दा प्रतिसाद देतात.**

परंतु आदिपुरूष चित्रपटाने रामायणातील संपूर्ण सीमा ओलांडून देशवासियांच्या भावनांशी खेळ केला आहे.त्यामुळे श्रध्दास्थानाचा मोठा अपमान होत आहे. आदिपुरूष हा रामायणावर आधारित नसुन कार्टून चित्रपट असल्याचे दिसून येते. कारण रामायणातील प्रत्येक पात्रांनी अत्यंत संवेदनशीलतेने कार्य केले.त्यात राम, सीता,लक्ष्मन, हनुमान, रावण,बिबीशन, कुंभकर्ण,मेघनाथ इत्यादी अनेक पात्रांनी हुबेहूब चित्रिकरण करून लोकांची मने जिंकली व संपूर्ण आनंद घेतला.तेव्हाच प्रत्येकाच्या हृदयात आजही हुबेहूब जुन्या रामायणाची कल्पना सामोरं रहाते व सत्य युगाची कल्पना साकार होते.परंतु आदिपुरूष चित्रपटांमध्ये रामायणातील एकाही पात्रांची बरोबरी केलेली नाही.उलट आदिपुरूष चित्रपटाच्या निमित्ताने रामायण मालिकेची निंदा केल्याचे दिसून येते.आदिपुरूष चित्रपटावर अनेक वादंग झाले. यानंतर निर्मात्यांनी काही डायलॉग कट केल्यात.परंतु आदिपुरूष हा चित्रपट मुळातच रामायणाच्या विपरीत बनलेला आहे. त्यामुळे या चित्रपटावरच बंदी घालायला हवी. कारण अशा चित्रपटांनी धार्मिक भावना दुखावतात. आदिपुरूष चित्रपटावर बंदी घालण्याच्या याचिकेवर दिनांक 28 जून 2023 रोज बुधवारला आदिपुरूष या चित्रपटामध्ये रामायणातील व्यक्तिरेखांची मांडणी अत्यंत लज्जास्पद पध्दतीने करण्यात आली आहे अशा शब्दांत अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने निर्मात्यांवर ताशेरे ओढले व निर्मात्यांची तीव्र शब्दांत कानउघाडणी केली.त्यामुळे कोणताही चित्रपट काढतांना फक्त पैसा कमविण्याचा उद्देश न ठेवता लोकांच्या भावनांकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे. कोणताही चित्रपट काढतांना रामायण, कुराण, बायबल, ग्रंथ किंवा इतर ग्रंथ यांचा पुर्णपणे अभ्यास करूनच चित्रपट बनविला पाहिजे.त्याचप्रमाणे कोणत्याही धर्माच्या भावना दुखावणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी.कारण भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहातात याची भान चित्रपट निर्मात्यांने ठेवायला पाहिजे. आदिपुरूष चित्रपटामुळे लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत.त्यामुळे अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले आहे की अशा प्रकारचे चित्रपट तयार करताना विशिष्ट मार्गदर्शक तत्वे आखून देण्याची गरज आहे.धार्मिक विषयावर चित्रपट तयार करताना एखादा धर्म किंवा समाजाच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत.आदिपुरूष चित्रपट चुकीच्या पद्धतीने प्रसारीत केलेला आहे.संपुर्ण भारतवर्ष जाणते की रावणाची लंका सोन्याची होती. परंतु ओम राऊतनी आदिपुरूष चित्रपटाला रामायणाकडे न नेता पाश्चिमात्य पध्दतीकडे नेवुन मॉडर्न रावण दाखवून रावणाची लंका कोळशाच्या खाणीप्रमाणे काळ्या रंगाची दाखविली आहे.

# उपवासाची इडली चटणी :

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424



आधुनिक केसरी

**साहित्य :** इडली साठी -- दीड वाटी भगर म्हणजेच वरई , अर्धी वाटी साबुदाणा ,अर्धी वाटी दही ,2 चमचे साजूक तूप किंवा शेंगदाण्याचे तेल , 1 चमचा बेकिंग सोडा ,मीठ .
चटणीसाठी -- 1 वाटी खोवलेला नारळ , अर्धी वाटी भाजून साले काढून केलेले शेंगादाण्याचे कुट , 1 चमचा जिरे ,अर्धा इंच आले , 4..5 हिरव्या मिरच्या ,1 चमचा साखर , चालत असेल तर अर्धी वाटी चिरलेली कोथिंबीर, चवीप्रमाणे मीठ , आवडत असेल तर पाव वाटी दही .दही घातल्यास तिखट, मीठ, साखर थोडी जास्त घालावी .

**कृती :** प्रथम साबुदाणा मिक्सर मधून थोडासा फिरवून घ्यावा. मग त्यात भगर घालुन थोडे जाडसरच ठेवून ते एका बाउलमध्ये काढून त्यात दही घालून छान फेटून लागेल तेवढे पाणी घालून थोडे घट्टसरच इडलीच्या पिठाप्रमाणे बॅटर तयार करून घ्यावे. ते 4..5 तास भिजवून ठेवावे.नंतर त्यात मीठ , सोडा घालून पुन्हा भरपूर फेटून घ्यावे आता इडली पात्रात पाणी घालून ते गॅस वर गरम करण्यासाठी ठेवावे . आता इडली स्टॅण्ड ला तूप लावून त्यात इडलीचे पीठ घालून इडल्या करायला ठेवाव्यात. 10 ते 12 मिनिटे वाफवल्यावर गॅस बंद करून स्टँड बाहेर काढुन थोड्या गार झाल्या की काढुन ठेवाव्यात म्हणजे इडली झटकन आणि व्यवस्थित निघते .
आता चटणी करण्यासाठी मिक्सर मध्ये आले ,मिरची आधी बारीक करून मग त्यामध्ये नारळ ,शेंगादाण्याचे कुट ,मीठ, साखर , जिरे आणि चालत असेल तर कोथिंबीर व दही घालून चटणी छान वाटून घ्यावी .थोडे पाणी घालून पुन्हा थोडी फिरवावी म्हणजे छान एकजीव होईल .मग ती एका बाऊलमध्ये काढून पाहिजे असेल त्याप्रमाणे पाणी घालून सैलसर करावी .
सर्व्हिंग डिश मध्ये इडली व बाउल मध्ये चटणी ठेवून सर्व्ह करावी .

**वैशिष्ट्य :** भारतीय संस्कृतीमध्ये उपवासाला खूप महत्व आहे .त्यामुळे नवरात्री, एकादशी, चतुर्थी, हे तर जास्तीत जास्त लोक करतातच ,पणत्याच बरोबर अनेक सण, आठवड्यातील काही वार ,प्रदोष असेही अनेक दिवस उपवास करतात. अशा वेळी सारखे खिचडी ,वडे, भगर, चिवडे, वेफर्स असे तेलकट,तुपकट आणि तेच तेच पदार्थ खाऊन खूप कंटाळा येतो त्यासाठी अतिशय कमी तेल किंवा तुपात आणि नावीन्यपूर्ण अशी ही इडली चटणी सर्वांना नक्कीच आवडेल. आवडत असतील त्यांनी इडली मध्ये खोबऱ्याचे तुकडे, ड्रायफ्रूटस् घातले आणि चटणीतही खमंग पाहिजे असेल तर मिरच्या आवडीप्रमाणे जास्त घालव्यात. एरवीसुद्धा खाण्यासाठी ही डिश नक्कीच सर्वांना आवडेल .

# विचारांमृत देणारे 'तेजज्ञान'चे गुरु सरश्रीजी




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**सोमवार दि.३ जूलै रोजी 'गुरूपोर्णिमा' असून या दिवसाला अतिशय महत्व आहे. महर्षी व्यासमुनींनी महाभरात व पुराण लिहिले, त्यांची पूजा करण्याचा मंगल दिवस. महर्षी व्यास हे भारतीय सांस्कृतीचे शिल्पकार व मूलाधार मानले जातात. याच दिवशी भगवान बुध्दांनी सारनाथांना पहिले प्रवचन दिले, तो हि पवित्र दिन आहे.म्हणून आजच्या दिनी गुरूची पूजा करावी, अथवा वंदन करावे. माणूस ज्यांच्यापासून घडतो, प्रगती करतो, त्याला गुरू मानतो. लहानपणी संस्कार देणारे ते आई -वडील हे प्रथम गुरू आहेत. आपणाला ज्ञान देणारे शिक्षक गुरूच आहेत! अध्यात्मिक क्षेत्रात पती-पती हे गुरूमंत्र घेउन. गुरू करण्याची परंपरा चालत आलेली आहे.**

तसेच राजकीय क्षेत्रात नेत्यांचे नेते गुरू आहेत, आता गुरू कोणाला म्हणावे ? असा प्रश्न विचारला जातोय! गुरू याचा अर्थ अंधः कार पुसून टाकणारा असाच अर्थ अभिप्रेत आहे. ज्ञान देणारे, प्रकास देणारे हे गुरू होय. संत तुकोबाराय म्हणतात, जो शिष्याला आपल्यासारखे करतो, त्यांना गुरू मानावे, असे म्हंटले आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'गुरू साधकाशी साह्य! गुरू भक्तालागी माय।। गुरू हा कामधेनू गाय। भक्तांघरी दुभतसे।। असे म्हंटले. संत कबीर म्हणतात, गुरू पारस को अंतरो, जानत है सब संत।। वह लोहा, कंचन करे, ये करि लये महंत।। तुकोबारायांनी तर ढोंगी गुरूवर प्रखर शब्दात प्रहार केले आहेत, 'एक करिता गुरू -गुरू ।भोवतां भास शिष्यांचा ।। पूस नाही, पाय चार चारी ।मनुष्य कुतरी ती ।। जो स्वतः गुरू म्हणून मिरवितो, त्याचे भवती शिष्य फिरतात! त्यांनी जरी शेपटी व चार पाय नसले, तरी ते कुत्रेच आहेत! असे म्हंटले आहे.



सर्व धर्मग्रंथ माणसाला विचाराची शिकवण देतात.तरी विचारांचा व धार्मिक संघर्ष चालच आहे.तो विचारांच्या गफलतीमुळे होत असतो. माणसाच्या विचारात सुख व दुःखाचा अंतभूर्त आहे.विचार माणसाला दिलेली एक अनमोल देणगी आहे.एखाद्या गोष्टीवर चिंतन करणे, म्हणजे विचार होय.माणसाला विचार करणे, जमले नाही तो अतिविचार तणाव, मानसिक आजार नकळत ओढून घेतो.माणसांचे नकारात्मक विचार सकारात्मक स्वरूपात बदलता येतात, जर माणसाला सकारात्मक विचाराची दिशा मिळाली, तर तो दुःखावर मात करू शकतो, जीवनाचा खरा आंनद घेवू शकतो.तसेच तो परिवारातील वैर संपते. क्रोधावर नियंत्रण आणता येते.आजच्या तांत्रिक, मोबाईलच्या, धावपळीच्या युगात सकारात्मक विचार करण्याबाबत चिंतन केले जात नाही.त्यामुळे तरुण पिढीला जीवनाचा खरा आनंदकसा घ्यावयाचा हे कळत नाही. शेवटी तो नैराश्यातून आत्महत्या करत आहेत.अनेक परिवार, शेतकरी आत्महत्या करता आहेत, त्या टाळता येवू शकतात. माणसाला सकारात्मक विचार कसे करावे, याचे ज्ञान देणारे अध्यात्मिक गुरू म्हणजे सरश्रीजी हे आहेत.महाराष्ट्रातील अनेकांना परिचित नाहीत, हे दुर्देव आहे ते कधीच प्रसिध्दीच्या झोतात येत नाहीत.सरश्रीजींनी लळा लहानपणापासून अध्यात्मिक ज्ञाचा शोध घेण्यास सुरुवात केली.त्यांनी अनेक ग्रथांचे वाचन व अभ्यास केला.त्याचबरोबर त्यांनी आध्यात्मिक शोधात मग्न राहून अनेक ध्यानपध्दतीचा अभ्यास केला.सत्यप्राप्तीच्या शोधासाठी जीवनाचे रहस्य ज्ञात व्हावे, यासाठी त्यांनी बराच काळ मनन करून शोधकार्य केले.या विचाराच्या मंथनातून जे अमृत ज्ञान प्राप्त झाले.ते म्हणजे तेजज्ञान आहे. हे तेजज्ञान देण्याचे अविरत कार्य ते करत आहेत. यासाठी पुणे येथे तेजज्ञान संस्था १९९७ मध्ये स्थापन करण्यात आली.या संस्थेशी सुमारे दीड लाख सदस्य तर ७ हजार स्वयंसेवक आहेत संस्थेच्या कार्यक्रमाला तिब्बतचे सर्वोच्च अध्यात्मिक नेता व बोधिसत्व यांनी दलाई लामा दि.१० आक्टोबर २०१० रोजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.सरश्रींजीनी दहा भाषेत या विषयावर अनेक पुस्तके लिहिलेली आहेत. तेजज्ञान फाऊंडेशनचे स्वयंसेवक राज्यात प्रत्येक भागात शिबीर घेत असतात.यात विचार नियमाव्दारे जीवनात क आनंद कसा मिळावा ? याची विचार सेवा देण्याचे कार्य केले जात आहे. नकारात्मक विचारातून सकारात्मक विचारांकडे वाटचाल, हे तेजज्ञान फाऊंडेशनचे ध्येय आहे.सकारात्मक विचाराकडे म्हणजेच 'हॅपी थॉट्स. तेजज्ञान म्हणजे ज्ञान अज्ञान या दोहोपलिकडेच ज्ञान.अनेक जण तर सामान्य ज्ञानालाच ज्ञान समजतात.पण खरे ज्ञान आणि माहिती यात बरेच अंतर आहे.आजकाल लोक सामान्य ज्ञानालाच महत्व देतात.यात कर्म आणि भाग्य, योग आणि प्राणायाम, स्वर्ग आणि नरक अर्तंभूत आहे.




समाजात सामान्य ज्ञान प्रदान करणारे मोठ्या प्रमाणात आहेत.पण यातून माणसाच्या जीवनात कोणतेही परिवर्तन घडून येत नाही.कारण हा बुध्दीविलासाच नव्हे, तर अध्यात्माच्या नावावर चाललेला बुध्दीचा व्यायाम आहे.या समस्यावर उपाय म्हणजे, तेजज्ञान. यातून क्रोध, चिंता व भय यातून मुक्त जीवन म्हणजे तेजज्ञान आहे.तो शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि अध्यात्मिक प्रगतीचा, सर्वांगीण प्रगतीचा मार्ग आहे. हे ज्ञान सामान्य ज्ञानापलिकडे आहे.प्रत्येक समस्येवर उत्तर आहे.ईश्वरी साक्षात्कार घडवून अंतिम सत्यात स्थापित करणे, अशाच ज्ञानाची विश्वाला गरज आहे. आजवर जप-तप, तंत्र- मंत्र, कर्म- भाग्य, ध्यान-ज्ञान, योग- भक्ती असे अनेक मार्ग अध्यात्मात सांगितले आहेत.मात्र या सर्वमार्गांनी प्राप्त होणारी 'अंतिम समज', अंतिम ज्ञान, बोध एकच आहे. अंतिम शोधयात्रेत साधकाला अंतिम 'समज'प्राप्त होते. ते सत्य श्रवणाने प्राप्त होऊ शकते.तेजज्ञानाच्या श्रवणाने सत्याचा सक्षात्कार घडतो, ईश्वरीय अनुभव मिळतो.तेजज्ञान आपल्या अंतरंगात आहे, ते तेजज्ञान फाऊंडेशनच्या शिबिरातूनच मिळते! सरश्रीजींचे श्रवण एक अमृत आहे. यामुळे हजारोंच्या जीवनाला कलाटणी मिळालेली आहे परिवारातील कु वैर संपुष्टात आले आहे.त्यांचे जीवन सुखमय झाले आहे.ते आज आनंदी आहेत.याची अनेकांना अनुभूती आलेली आहे.या संस्थेच्या विचार सेवा कार्याची बोधिसत्व दलाई लामा, तसेच योगाचार्य बी.के. एस. अयंगार, वैज्ञानिक डॉ.विजय भाटकर, मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ.किरण बेदी, श्रीमती गुरूचरण कौर( माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या पत्नी ) चित्रपट अभिनेता सुरेश ओबेराय, शाहरुख खान, गायक अनुप जलोटा आदींनी प्रंशसा केलेली आहे.तेंव्हा आपण सामान्य ज्ञानातून तेजज्ञानाचा अनुभव घेण्यासाठी 'हॅपी थॉट्स' शिबिराशी जोडावे, हि विनंती.धन्यवाद! **( या लेखातील माहिती पुस्तकाच्या आधारावर आहे.)**

# सर्वोपचाराची साधने: प्राणायाम व योगासने!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दररोज योगा केल्याने आपल्या शरीरावर सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन इष्ट परिणाम होतो. शरीर आणि मन शांत करण्यासाठी योगा खुप फायदेशीर मानला जातो. योग केल्याने आपल्या शरीराला ऊर्जा मिळते, स्नायूंची ताकद वाढते. तसेच यामुळे आपले श्वसन, ऊर्जा आणि चैतन्य सुधारते. तो सर्वांना वर्तमानात जगायला शिकवतो. योगासनांमुळे स्नायूंना बळ मिळते. नियमित योगासने केल्याने शरीरातील अतिरिक्त चरबीही कमी होते. तणाव दूर होऊन चांगली झोप लागते; आपली पचनक्रियाही सुधारते.**

शरीर आणि मन निरोगी ठेवणाऱ्या जागतिक योग दिनाचा इतिहास आणि महत्त्व जाणून घेणे आवश्यक आहे. इंटरनॅशनल योगा डे- आंतरराष्ट्रीय योग दिन हा दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी या दिनाला मान्यता दिली आहे. भारताचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी दि.२७ सप्टेंबर २०१४मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला होता; दि.११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने जाहीर केले की, २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात यावा. त्यानुसार हा दिवस साजरा केला जातो. दि.२१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. या दिवशी संपूर्ण जगभरात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भारताची राजधानी दिल्ली येथे राजपथावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः कार्यक्रमात सहभाग घेऊन योगासने केली.

योगाचे प्रमाणित ग्रंथ जसे- शिवसंहिता व गोरक्षशतक यांमध्ये चार प्रकारचे योग सांगितले आहेत- १ ) मंत्रयोगः यात वाचिक, मानसिक, उपांशू व अणपा २ ) हटयोग ३ ) लययोग ४ ) राजयोगः यात ज्ञानयोग व कर्मयोग येतात. पतंजलीप्रमाणे योगाची आठ सूत्रे- १. यम- खरे बोलणे, अहिंसा, लोभ न करणे, विषयासक्ती न धरणे आणि स्वार्थी न होणे. २. नियम- पवित्रता, समाधानी, तपश्चर्या, अभ्यास व ईश्वर चरणी जाणे ही होत. ३. आसन- बसण्या-उठण्याच्या पद्धती. ४. प्राणायाम- श्वास घेणे, श्वास सोडणे आणि श्वास रोखून धरणे महत्त्वाचे. ५. प्रत्याहार- बाह्य वस्तू, इंद्रियांपासून प्रत्याहार. ६. धारणा- एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे. ७. ध्यान- याबाबत प्रकृतीचे चिंतन करणे. ८. समाधी- ध्यान करणाराच्या वस्तूंचे चैतन्यासह विलिनीकरण करणे समाविष्ट आहे. याचे सविकल्प व अविकल्प हे दोन प्रकार आहेत. अविकल्पात जगाकडे परतण्याचा मार्ग नसल्यामुळे ही योगपद्धतीची चरमस्थिती मानतात. तर श्रीमद भगवद्गीतेतील योग तीन प्रकारचे- कर्मयोग- व्यक्ती आपल्या स्थितीच्या योग्य कर्तव्यानुसार श्रद्धेप्रमाणे कार्य करतात. भक्तियोग- यात भगवद कीर्तन मुख्य आहे. भावनात्मक व्यवहारी लोकांना हे सुचवले जाते. ज्ञानयोग- यात ज्ञानप्राप्ती करून ज्ञानी होणे अभिप्रेत आहे.

योगाभ्यास आणि त्याचे फायदे याबाबत जनजागृती करण्यासाठी संपूर्ण जगभरात दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. मानवी जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योग भ्यासामुळे मानवी जीवनात शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पातळीवर अनेक सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते. २१ जून हा वर्षातील इतर दिवसांपेक्षा सर्वांत मोठा दिवस असतो. या दिवशी उत्तरायण संपून दक्षिणायण सुरू होते. या दिवशी सूर्योदय लवकर होऊन सूर्यास्त उशीरा होतो. दिवस मोठा असल्याने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. योग ही भारताची प्राचीन परंपरा आहे. ज्ञान प्राप्त करण्यासाठी आणि शरीर व मन तंदुरुस्त राखण्यासाठी विशिष्ट योगसाधना केल्या जातात. प्राचीन काळापासून आजतागायत या सर्व साधना गुरु-शिष्य परंपरेने जतन केल्या गेल्या. परंतु तरीही लोकांच्या मनात योगाविषयी हवी तेवढी जागरूकता नव्हती. त्याचे महत्त्व काही मर्यादित लोकांनाच माहित होते व लोकांच्या मनात त्यांविषयी काही गैरसमजही होते. उदा- योग अंगीकारणे म्हणजे संसारापासून दूर जाणे किंवा योग हा फक्त हिंदूधर्माचा भाग आहे, इत्यादी. तसेच काही लोकांनी त्यातील साधनांमध्ये अन्य विचित्र गोष्टींचे मिश्रण करून त्यांचे स्वरूप विकृत करून टाकले होते; उदा.बियर योग, डॉग योग आदी. योगाच्या प्राचीन शास्त्रशुद्ध परंपरेतील साधनांविषयी लोकांच्या मनातील गैरसमज दूर करून जागरूकता उत्पन्न व्हावी आणि अधिकाधिक लोकांनी योगाभ्यास करून आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले करावे, हा जागतिक योग दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश आहे. जागतिक योग दिनामुळे समाजाच्या सर्व स्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्यास मदत झाली आहे.

जागतिक योग दिनानिमित्त शासकीय तसेच इतर स्तरावरूनही योगाशी संबंधित अनेक कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहाने आयोजन केले जाते. त्यामध्ये योगासने, शुद्धिक्रिया, प्राणायाम अशा अनेक योगसंबंधित क्रियांचे प्रात्यक्षिक दाखवले जाते आणि योग-तत्त्वज्ञान, योगाचे प्राचीन ग्रंथ, योगातील साधना, योगचिकित्सा आदी अनेक विषयांची माहिती देणारी व्याख्याने आयोजित केली जातात. शालेय स्तरावरून विद्यार्थ्यांसाठी सामूहिक स्वरूपात सूर्यनमस्कार, योगासने आदी कार्यक्रम आयोजित केले जातात. म्हणून सद्यस्थितीत योगसाधनेला आपल्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग बनवणे गरजेचे झाले आहे. सन २०२०मध्ये आलेल्या कोविड साथीमुळे शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्य देखील अधिक धोक्यात आले. अशा काळात असंख्य लोक महाजाल- इंटरनेटच्या माध्यमातून एकत्र येऊन योगसाधना करताना दिसत आहेत. सन २०२० व २०२१मध्ये ज्याठिकाणी कोविड साथीमुळे लोकांना एकत्र येऊन योगसाधना करणे शक्य नव्हते, तेथे महाजालकाच्या माध्यमातून एकत्र येऊन मोठ्या उत्साहात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला होता.



# गुरुपौर्णिमेचे महत्त्व

आधुनिक केसरी

**गुरुपौर्णिमा गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू ; गुरुदेवो महेश्वरः ।गुरुः साक्षात परब्रम्ह तस्मै श्रीगुरवे नमः** ।। अर्थात गुरू ला ब्रह्मा, विष्णू, आणि महेश्वर म्हणजेच महादेव पेक्षा आहे श्रेष्ठ व महान स्थानं आहे. गुरु म्हणजेच काय, " अंधकार दूर करणारा" सत्याचा मार्ग दाखवणारा, चांगलं- वाईट शिकवणारा, समाजा- मध्ये वागायला शिकविणारा म्हणजेच आपल्या आयुष्याला योग्य ते वळण व मार्ग दाखविणारा व्यक्ती. प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये पहिलं ' गुरु' हा आई- वडील असतेत. जे आपल्याला या सुंदर आशा जगामध्ये घेऊन येतात. लहानपणापासून आपले संगोपन करतात. चांगले विचार शिकवतात.

समाजामध्ये ताठ मानेने आपण राहावे म्हणून धडपड करत असतात. स्वतः कुठल्या गोष्टीचा विचार न करता आपल्या मुलांचे आयुष्य चांगले व्हावे हि इच्छा मनात धरून जगतात. म्हणूनच आई- वडील आपल्या पहिले ' गुरु' आहेत. आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणा मध्ये वेगवेगळे ' गुरु' प्रत्येकांकडून वेगवेगळे ज्ञान नवीन- नवीन विचार शिकायला म्हणतात.

अशा या गुरुंसाठी ' गुरुपौर्णिमा' हा दिवस या गुरुंसाठी पाळला जातो. ज्ञानाचे भांडार असलेल्या अशा या गुरूंना ' गुरुपौर्णिमा' दिवशी सगळे शिष्य मिळून ' गुरु पौर्णिमेच्या' शुभेच्छा देतात. काही भेट वस्तू देऊन आपल्याला गुरूंचे स्वागत केले जाते.

जुलै- ऑगस्ट महिन्याच्या पौर्णिमेला ' गुरु पौर्णिमा' असते. आकाशामध्ये चंद्राचा आकार गोल झालेला असतो व चांदण्यांचा पाऊस पडलेला असतो. अशा या पौर्णिमेला ' गुरुपौर्णिमा' म्हणून ओळखले जाते. प्राचीन काळापासून ' गुरूंना' अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. शिवाजी महाराजांच्या गुरु वीर माता जिजाऊ होत्या त्यांनी शिवाजी महाराजांवर लहानपणापासून वीर- शूरवीर शिकवण दिली म्हणून शिवाजी महाराज घडले. एकलव्याचे गुरु हे द्रोणाचार्य होते. त्यांनी आपल्या गुरूंचा म्हणजेच द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा तयार करून धनुर्विद्याचे ज्ञान प्राप्त केले. द्रोणाचार्यांनी गुरुदक्षिणा म्हणून एकलव्याचा अंगठा मागितला त्यावर एकलव्यानी कशाचाही विचार न करता आपला अंगठा द्रोणाचार्यांना दिला. यावरून कळते की गुरु बद्दल एक्लव्यांना किती निष्ठा होती. तसेच, 'साने गुरुजी' यांचे ही ' गुरु' त्यांची आई होती. त्यांनी ' श्यामची आई' या पुस्तकामध्ये आपल्या गुरूंच्या कथा लिहिल्या आहे. आई-वडीलानंतर आपले पहिले गुरू शाळेत गेल्यावर ' शिक्षक' असतात. ते आपल्याला ज्ञान देतात. शाळेमधले ' गुरु' आपल्याला मराठी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल या विषयांचे ज्ञान देतात.

त्यासोबतच मैदानावर खेळणे, चांगले लेखन, वाचन चार लोकांसमोर बोलण्याचे धाडस शाळेतील गुरुंपासूनच प्राप्त होते. कॉलेजमध्येही आपल्याला वेगवेगळे ' गुरु' मिळतात. भावी पिढीचे डॉक्टर, इंजिनीयर, शिक्षक घडविण्याचे काम हे गुरु करत असतात. तसेच, " गुरुपौर्णिमा" ही सद्गुरूंची पौर्णिमा म्हणूनही ओळखले जाते. पौर्णिमा म्हणजेच ' प्रकाश' गुरु हि या प्रकाशाप्रमाणेच आहेत. ते आपल्याला ज्ञानाचा प्रकाश देतात. त्यांना असलेले ज्ञान प्रकाशाप्रमाणे सर्वत्र पसरवण्यासाठी प्रयत्न करतात. ' गुरुचरित्र' या ग्रंथांमध्ये गुरूंच्या ध्यानाचे, ज्ञानाचे, सेवेचे, भावाचे, व त्यांच्या लीलांचे वर्णन केलेले दिसेल भारतीय गुरुपरंपरेत आपल्याला गुरु-शिष्याच्या अनेक जोड्या बघायला मिळतील जसे की शुक्राचार्य- जनक, कृष्णा- सुदामा, राम- लक्ष्मण, द्रोणाचार्य- अर्जुन या गुरु- शिष्यांचा इतिहास जर आपण पाहिला तर आपल्याला दिसेल की गुरु-शिष्यांच्या नात्यातील प्रेम, निष्ठा, श्रद्धा किती दृढ होती. गुरु -आज्ञानाचा अंधकार दूर करून प्रकाशाच्या वाटेवर घेऊन जातात हे सत्य आहे आणि हे सत्य पुढील कित्येक वर्षे असेच राहील. गुरू बिन ज्ञान कहा से लावू " हे वाक्य अत्यंत खरं आहे. गुरु म्हणजे ज्ञानाचा सागर आहे. परंतु गुरूजवळ शिष्याने नम्र वागल्याविना त्याला ज्ञान प्राप्त होणार नाही.

**निराकार गुरु, गुरुरे निर्गुण ।गुरू सृष्टीकर, गुरु विश्वंभर"** ।।

म्हणजेच गुरु हा एकमेव मार्ग आहे, जो आपल्यातील निर्गुन ओळखून तीन नाहीसे करण्याच्या मार्गावर असतो. तसेच गुरूंना सृष्टीकर अशीही उपमा दिलेली आहे. हे जग, सृष्टी निर्माण करण्याची ताकद एका गुरु मध्ये असते. जीवनामध्ये गुरूंना जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व सद्गुरूंनाही आहे. ' गुरु पौर्णिमे' दिवशी सद्गुरुनाही गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या जातात. **ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ।त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे । मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी ।तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ।।**

सद्गुरु म्हणजे मानवजातीला अध्यात्मिक मार्ग दाखवणारे, भक्तांना मोक्ष देणारे, परमार्थ दाखवणारे सद्गुरु यांनाही आपल्या आयुष्यामध्ये गुरु एवढेच स्थान आहे.

म्हणून अशा या सर्व गुणांनी पूर्ण असलेला गुरूंच्या मार्गावर चालल्यानी आयुष्यात येणाऱ्या सर्व समस्यांवर मत देण्याचे धाडस आपल्या मध्ये येईल म्हणून माझ्याकडून माझ्या सर्व गुरूंना ' गुरुपौर्णिमेच्या' खूप खूप शुभेच्छा.

**रविंद्र जाधव कोतापकर, डोंबिवली**

# पुन्हा सामाजिक, वैचारिक पुनर्बांधणीची महाराष्ट्राला गरज...!

## पुण्यात तरुणीवर कोयता हल्ला प्रकरण निषेधार्हः आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांच्या सडेतोड प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर : पुरोगामी महाराष्ट्रात अलीकडे पहिली घटना लग्नास नकार दिला म्हणून तर,दुसरी घटना प्रेम संबंधास नकार दिल्याच्या रागातून कोयत्याने हल्ला करून जीव घेण्यापर्यंत मजल पोहोचते हे निषेधार्ह आहे. यावरूनच महाराष्ट्रात महिलांची सुरक्षा, कायद्याचे राज्य, आदी प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत." मला नाही तर कुणालाच नाही..." ही खूणी मानसिकता थांबायचे नाव घेत नाही. एकूणच पुन्हा सामाजिक, वैचारिक पुनर्बांधणीची गरज महाराष्ट्राला आहे का? हा प्रश्न अस्वस्थ करतो. समाजात स्त्री पुरुष भेद आणि त्यांच्यातील नैतिकता मोडून पडल्याने ही भयावह परिस्थिती थांबायचे नाव घेत नाही. म्हणूनच हा ज्वलंत प्रश्न आणि त्यावर जालीम उपाययोजनेची सामुहिक जबाबदारी समाजावर येते अशा संतप्त आणि संवेदनशील प्रतिक्रिया आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांनी मांडल्या.**

आधुनिक केसरी जनचर्चा

### स्वतः चांगले जगावे व इतरांना चांगले जगू द्यावे...



डॉ.सोनिया कस्तुरे
लेखिका तथा समुपदेशक

जगा आणि जगू द्या ही प्रकृती. आपण जगता जगता दूसऱ्याच्या जगण्याला हातभार लावणे, मदत करणे ही संस्कृती. स्वतःच्या आणि इतरांच्या जगण्याला अडथळा करणे ही विकृती असते. मुली नकार सहज पचवताना दिसतात. काही मुलं नकार न पचवू शकल्याने विकृतीच्या आवेगात येऊन खून करतात. मुली शिकतात, स्वतंत्र विचार करतात. त्यांना स्वतःचे मत आहे. स्वतःच्या पायावर उभे राहू इच्छितात.,ते नाही म्हणू शकतात. हे पुरुषसत्ताक मानसिकतेला कुठेतरी पचत नाही. महिलांचे सबलीकरण/सक्षमिकरण होत आहे. पण या सक्षमीकरण झालेल्या महिलांशी तडजोडीने वागण्याची मानसिकता पुरुषांची तयार झालेली अजूनही दिसून येत नाही. त्यासाठी कौटुंबिक व सामाजिक पातळीवर ठोस प्रयत्न व्हायला पाहिजेत. ज्यांना मानवता कळते त्यांची अडचण नाही.थोडा विचार केला तर लक्षात येईल. दुसऱ्यांना मारणे, दुसऱ्यांचा छळ करणे. दुसऱ्यांना इजा करणे. दुसऱ्यांवर राग काढणे. स्वतःला त्रास करुन घेणे. इतरांना त्रास देणे. स्वतःला संपविण्याचा वा दुसऱ्याला संपवण्याचा विचार डोक्यात येणे. तसे प्रयत्न करणे ही मानसिक विकृती आहे. हा मनाचा विशिष्ट आजार आहे. असे लक्षात आल्यास वेळीच मानस उपचार तज्ञांची मदत घ्यावी. स्वतः चांगले जगावे व इतरांना चांगले जगू द्यावे. स्वतःचे व इतरांचे जगणे आनंदी करण्यासाठी Psychiatrists, Psychotherapists, Counsellor यांची मदत घ्यावी. आपल्या मनाचे आरोग्य तपासून घ्यावे. आपल्या मनाचे आरोग्य उत्तम

### स्त्री सारखा पुरुष घडवावा लागेल...



- शीला घरडे पाटील
मानसशास्त्र अभ्यासक

मानसशास्त्रज्ञ अल्बर्ट बांडुरा यांच्या निरीक्षणात्मक अध्ययन किंवा सामाजिक अध्ययन सिद्धांतानुसार, "मूल किंवा व्यक्ती निरीक्षणातून व अनुकरणातून शिकत असते." म्हणजेच अलिकडे ज्या हिंसा होत आहेत त्या निरीक्षणातून होत आहेत .मुलगे हिंसेचे अनुकरण करीत आहेत . वरवरून पाहता आजचा समाज सुधारलेला दिसत असला तरी, बहुतांश घरांमध्ये छोट्या छोट्या कारणांवरून स्त्रीला मारहाण केली जाते.केवळ संशयाखातरही मारहाण केली जाते. मारहाणीचंच पुढचं रूप हत्या असू शकते.घरामध्ये स्त्रीला मारहाण केल्यानंतर स्त्री काहीच बोलत नाही किंवा कुठलेही पाऊल ती उचलत नाही. त्यावेळेला घरातील मुलींना असे वाटतं की ही बाब सामान्य आहे आणि मुलांना असे वाटतं की आई काही बोलत नाही म्हणजे ही गोष्ट फार काही गंभीर नाही .अशाप्रकारे ह्या गोष्टी समाजामध्ये रूढ होत आलेल्या आहेत. आणि रूढ झालेल्या ह्या गोष्टी रुढीप्रमाणे पाळल्या जातात. युंग यांच्याच्या आदिमरूप सिद्धांतानुसार,"पिढ्यानपिढ्या एखाद्या अनुभवाची पुनरावृत्ती झाल्यास त्याची साठवण आदिम रूपाच्या स्वरूपात होते" जसे- अंधाराला आपण पिढ्यानपिढ्या घाबरत आलेलो आहे .त्याच त्याचप्रमाणे स्त्रीवर अन्याय करण्याची परंपरा ही पूर्वीपासून चालत आलेली आहे. पुरुषसत्ताक पिढीने ती दुसऱ्या पिढीला दिलेली आहे. परंपरा ह्या सर्वमान्य असतात ,अशी धारणा सगळ्यांची असते .ह्या चुकीच्या परंपरेमध्येच अलीकडे झालेल्या काही हत्याकांड्यांची बीजं ह्या अन्यायी परंपरेमध्ये सापडतात. स्त्रीला वस्तू म्हणून वापरण्याचा वारसा हा मागील पिढीने सध्याच्या पिढीला दिलेला आहे. वस्तू समजून तिचा वापर ते आपल्या पद्धतीने करतात. यातूनच 'पुण्यातील कोयता प्रकरण' किंवा 'प्रेयसीचे तुकडे तुकडे करणे 'असली प्रकरणं घडतात. चारित्र्यावर संशय घेऊन आजवर कोणत्याही स्त्रीने कोणत्याही मुलीने वा स्त्रीने कोणत्याही मुलांच्या किंवा पुरूषांच्या हत्या केल्या नाहीत. कारण मुलींना बालपणापासून स्वतः वर नियंत्रण ठेवण्याचे शिकविले असते. तिला ही राग येतो. परंतू तिला रागावर नियंत्रण ठेवण्याचे किंवा तो येवूच द्यायचा नाही अशी शिकवण असते. ती शिकवण आपण मुलांना देतो ? सिमॉन-दि-बोव्हा यांच्या मते , "स्त्री ही जन्मत नाही ती घडवल्या जाते " तसेच पुरुषही जन्मत नाही तो सुद्धा आपणच घडवतो. आता आपल्याला स्त्री सारखा पुरुष घडवावा लागेल. तेव्हा त्याला खरे प्रेम सुद्धा कळेल. तेव्हाच प्रेमातून हत्या नव्हे जीवन मिळेल.



### समाजाने नैतिकतेने वागणे गरजेचे...



अनुराधा कुलकर्णी
लेखिका तथा सहशिक्षिका

या घडत असलेलया घटनावरून समाजामध्ये नैतिकतेचा ऱ्हास होत चालला आहे असे दिसते.सुशिक्षित व्यक्तीला नकार पचवण्यास अवघड जात आहे. त्यातूनच तो विविध वाईट मार्गाचा अवलंब करत आहे .ही समाजाला लागलेली कीड आहे. अशा सुशिक्षित व्यक्तींची मानसिकता बदलणे व समुउपदेशन करणे आता गरजेचे झाले आहे . मानसिक विकास घडवण्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. म्हणून मुलांचा मानसिक विकास होत नाही. त्यांच्या मनात नकारात्मक भावना वाढीस लागते हे समाजाच्या दृष्टीने वाईट आहे. व्यक्तीमध्ये ज्ञानाबरोबर शील ,चरित्र, संस्कार याची रुजवणूक करणे याला नैतिक मूल्य म्हणतात. ज्ञान आणि तत्व किंवा मूल्य याबाबत एक विसंगती आढळून येते ज्ञान मिळवता येते, ते देता येते व घेता येते. मात्र मूल्य ही अंगीकारित लागतात त्याची रुजवणूक करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. घरच्या वातावरणातून शालेय वातावरणातून व समाजाच्या वातावरणातून हे नैतिक मूल्य जोपासणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जन्मताच कुणी वाईट किंवा चांगला नसतो त्या व्यक्तीला समाजामध्ये वावरताना आलेल्या अनुभव तसेच सभोवताली वातावरण त्यानुसार त्याचे व्यक्तिमत्व घडत असते. त्यामुळे समाजामध्ये प्रत्येकाने चांगले संस्कार अंगीकार केला पाहिजे. त्यामुळे नकारात्मक भावना नाहीशी होण्यास मदत होईल नैतिकतेने वागणे हे समाजाशी संबंधित असते . चांगले संस्कार चांगले वर्तन समाजमान्य वर्तन प्रत्येक व्यक्ती कडून घडणे गरजेचे आहे.

### महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होतोय...



सीमा देशमुख
लेखिका

पुण्यातील ही बातमी पाहिल्यावर, ऐकल्यावर अंगावर काटा आला. आणि मनात हा प्रश्न उभा राहतो की, कुठे हरवला माझ्या शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र ? जिथे कुठल्याही स्त्रीवर मग ती कोणीही , कुठल्याही धर्माची असो...! परक्या बाईवर वाकडी नजर टाकायची कुणाची हिंमत नव्हती. पण हल्लीची तरुण पिढी शिवाजी महाराजांचा आदर्श विसरायला लागली आहे असे वाटते.मोबाईल आणि नशेच्या आहारी गेलेली तरुण पिढीला देश, राज्य याविषयी प्रेमच उरलेले नाही. आपली संस्कृती आपला इतिहास आजकालच्या तरुणांना माहीतच नाही. एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले, बलात्कार या घटना महाराष्ट्रात सर्वात ऐकायला येत आहे. आणि त्यात दिवसेंदिवस होत असलेली वाढ ही खूप चिंतेची गोष्ट आहे. महाराष्ट्रात अनेक मुली स्त्रिया नोकरी करतात. वेळी, अवेळी त्यांना बाहेर राहावं लागतं. त्यांच्या सुरक्षितेचा प्रश्न पुन्हा- पुन्हा डोके वर काढत आहे. खरंच खूप चिंतेची बाब आहे. यावर ठोस उपाय तातडीने करण्याची आज गरज आहे.

### मला काय करायचे ही सामाजिक उदासिनता थांबणार का ?



वसंत राठोड
लेखक

सुसंस्कृत मानल्या जाणाऱ्या पुण्यात दिवसागणिक कोयता संस्कृती उदयास येत आहे हे मागील काही दिवसात प्रत्ययास आले आहे. निव्वळ नकार दिला म्हणून तरुण मुलींना लक्ष केलं जातं आहे. एकतर्फी प्रेमातून हल्ले म्हणून निव्वळ डोळेझाक करून चालणार नाही तर हातात कोयता येण्यापर्यंत मजल जातेच कशी ही मानसिकता शोधली पाहिजेत. यासाठी समाजप्रबोधन आणि सोबतच पोलिसांचे वचक अर्थात धाक असणे गरजेचे आहे. जगण्याचा अधिकार सर्वांना आहे ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.नकार पचविण्याची मानसिकता असली तर असे प्रकार होणार नाही. मुलींनी सुध्दा चांगले, वाईट याचा समंजसपणे विचार करावा. शारीरिक आणि सांपत्तिक प्रलोभने यांचा आहारी जाता कामा नये. प्रेम हे सुंदर आहे, तरल आहे,भावना प्रदान आहे तसेच जीवन हे सुध्दा खूप सुंदर आहे. आजच्या तरुण पिढीला समाजाकडून शिकवण दिली पाहिजे परंतु इथेच 'मला काय करायचे...' हीच आपली सामाजिक उदासिनता दिसून येते. महाराष्ट्रात अनेक मुली स्त्रिया नोकरी करतात. वेळी, अवेळी त्यांना बाहेर राहावं लागतं. त्यांच्या सुरक्षितेचा प्रश्न पुन्हा- पुन्हा डोके वर काढत आहे. अनेक कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी छेडछाडीच्या घटना घडल्याचे प्रकार घडत आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलिसांचा धाक हवाच. मुलींनीही अशा घटनांना न भीता दामिनी पथक, पोलिसांची मदत घेतली पाहिजे. प्रत्येक शाळा, महाविदयालयात प्रकाराला पायबंद करण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे.

## नदीपात्रात सापडल्या मानवी कवट्या

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** कागल तालुक्यातील दूधगंगा नदी पात्रात आज चार मानवी कवठ्या सापडल्या. सिद्धनेर्ली गावामध्ये सकाळी पोहण्यासाठी गेलेल्या लोकांना हा प्रकार दिसला. यामुळे खळबळ उडाली असून पोलीस या प्रकाराची चौकशी करत आहेत. कागल तालुक्यातील सिद्धनेर्ली या गावातून दूधगंगा नदी वाहते.

नदीमध्ये नदीपात्रात सकाळी वर्दळ असते. काही लोक हो पोहण्यासाठी येत असतात. काही कपडे, जनावरे धुण्यासाठी येत असतात. पोहण्यासाठी आलेल्या काही लोकांना नदीपात्रात कडेला चार कवट्या सापडल्या. नदी पाण्याची पातळी कमी झाल्याने हा प्रकार दिसून आला. ही माहिती समजल्यानंतर पोलीस पाटलांनी कागल पोलिसांना याची माहिती दिली. घटनास्थळी पोलीस आले असून त्यांनी चौकशी सुरू केली आहे.

एकाच वेळी चार मानवी कवट्या कशा सापडल्या, त्या येथे कोणी आणून टाकल्या, या भागात मंत्र तंत्रविद्या चालत असल्याने त्यांच्यापैकी कोणी हा प्रकार केला आहे का ? असे अनेक प्रश्न निर्माण होत चालले आहेत.या कवट्यांवरून गूढ वाढले आहे.



# अवैध दारू विक्रेत्याविरुद्ध पीआय शिंदे यांची कारवाई

## ११५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** बकरी ईदनिमित्त गुरुवारी ( ता.२९ ) नांदेड जिल्ह्यात ड्राय डे घोषित झालेला असतानाही काही दारू विक्रेते अवैधरित्या दारू विक्री सुरूच ठेवली होती.याची गुप्त माहिती धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांना मिळताच आपला खाकी इंगा दाखवत या विक्रेत्या विरुद्ध धडक कारवाई करत ११५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागाने बकरी ईद निमित्त नोटीस काढून परवानाधारक देशी दारु दुकान, बिअर बार दुकान बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित केले होते.मात्र धर्माबाद पोलीस स्टेशन हद्दीतील काही गावामध्ये चोरुन, लपुन - छपुन देशी दारु व विदेशी दारुची चोरटी विक्री होत असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांना मिळाली. या अवैध विक्रेत्यांना कायद्याचा इंगा दाखविण्यासाठी पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कत्ते, महाजन,

> नांदेडचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागाने बकरी ईद निमित्त परवानाधारक देशी दारु दुकान, बिअर बार दुकान बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित केले होते . काही गावामध्ये चोरुन देशी व विदेशी दारुची चोरटी विक्री होत असल्याची गुप्त माहिती मिळाली यावरून ११५१० रुपयांच्या किंमतीचे देशी व विदेशी दारुचे बॉटल जप्त करण्यात आले . **अभिषेक शिंदे, पोलीस निरीक्षक, धर्माबाद**

पो.ह.नागमवार, पोलीस कॉ.इंजेपवाड, घोसले , गंगुलवार, मपोना हनवते यांचे एक भरारी पथक तयार करून धडक कारवाई करत छापे टाकले. यामध्ये देशी दारु भिगंरी संत्राचे सिलबंद बॉटल, करखेली- ४८ (किंमत - ३३६० ), सालेगाव - ३५, ( किमंत - २४५० ), कारेगाव फाटा - ४६ (किमंत ३२२०/- ), आटाळा -२० ( किमंत - १४०० ) तसेच कारेगांव फाटा येथील कॅनल जवळ रॉयल स्टॅग चे १८० एमएलच्या ०६ विदेशी दारुचे सिलबंद बॉटल ( किमंत - १०८० रुपये ) असे एकुण ११५१० रु चा मुद्देमाल व देशी व विदेशी दारुचे बॉटल जप्त करण्यात आले.

बेकायदेशीर रित्या दारू विक्री करणाऱ्या पाच आरोपीना ताब्यात घेवुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस प्रशासनाद्वारे देण्यात आली.

# नगर परिषद व भूमी अभिलेख कार्यालयातून अभिन्यास नकाशाला बेकायदा मंजुरी

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी.रामपूरकर**

**जिंतुर :** येथील नगरपरिषद अंतर्गत सर्वे नंबर 94 मधील अभिन्यासाचा नकाशा नगर परिषद व भूमी अभिलेख कार्यालय जिंतूर यांच्याकडून बेकायदेशीर मंजुरी दिली व प्लॉटिंग विक्री करण्यात येत आहे यासंबंधी चौकशी करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे

भूखंड क्रमांक 94 मधील अभिन्यासाला मंजुरी देताना मोकळी जागा ओपन स्प्रेस अस्तित्वात किती व मंजूर नकाशावर किती यात मोठी तफावत आहे मंजूर लेआउट मध्ये एकूण दर्शविलेली जागा 610 चौरस मीटर आहे परंतु वास्तविक पाहता अस्तित्वात 340 चौरस मीटर जागा शिलक आहे ओपन स्पेस कमी करून संबंधित भूमाफिया सुरेंद्र गेंदमल भाटिया यांनी ओपन स्पेसच्या जागेत प्लॉटिंग बेकायदेशीर विक्री केली असून जागेची मोजणी करून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे

संबंधित अभिन्यासाला मंजुरी देताना अटी व शर्तीचे पूर्तता न करता संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी भूमाफीशी संगणमत करून नकाशा लेआउट बेकायदेशीर मंजूर केला नियमानुसार अभियान्यासा मध्ये रस्ते नाल्या सांडपाण्याची व्यवस्था अभिन्यासाला संरक्षण भिंत व नागरी सुविधा देणे बंधनकारक आहे या सर्व बाबीची पाहणी न करता संबंधित अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर मंजुरी दिली कशी ? तसेच तहसील कार्यालयाने महाराष्ट्र शासन राजपत्रीतील शासनदाराप्रमाणे अकर्षित कर भरणा न करता भरणा कमी करून शासनाचे महसूल बुडविले तसेच भूखंड धारक यांनी नावाला असलेले क्षेत्र हे नगरपरिषद जिंतूर हद्दीत येत नाही सर्वे नंबर 94 हे क्षेत्र खरेदीखतामध्ये स्पष्ट कोरडवाहू शेती असा उल्लेख आहे तसेच सदरील भूखंड मुख्य अधिकारी नगर परिषद यांनी हस्तांतरण पत्र दाखल केल्यानुसार नागरी सुविधा उपलब्ध नाही व मोकळी जागेचे क्षेत्र आज जुळून येत नाही या सर्व बाबीची चौकशी करून संबंधितावर कडक कारवाई करण्याची मागणी यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी नगरपरिषद, तहसीलदार, यांना दिलेल्या निवेदनाद्वारे सिराज सिद्दिकी सामाजिक कार्यकर्ता यांनी केली आहे



# ज्ञानकुंज महाविद्यालयात वसंतराव नाईक यांची जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** महाराष्ट्रातील कृषिक्रांतीचे अग्रदूत, दूरगामी धोरणांद्वारे राज्याच्या शेती आराखड्यात आमूलाग्र बदल करणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ज्ञानकुंज कला, वाणिज्य, व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल बाजार सावंगी येथे प्राचार्य योगेश झिंजुर्के यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील, राहुल गायकवाड, श्री भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, श्रीमती नलावडे, पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाल बाबा, यांची उपस्थिती होती.

# वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन केंद्र उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी दिल्ली येथे राष्ट्रीय सिकलसेल ऍनिमिया निर्मूलन अभियानाचा शुभारंभ आज १जुलै, रोजी केला, त्याच अनुषंगाने शनिवार( १ जुलै )रोजी वैजापूर येथे उपजिल्हा रुग्णालयात नगरपालिकेच्या मावळत्या नगराध्यक्षा शिल्पा दिनेशभाऊ परदेशी यांच्या हस्ते फित सोडून व हा आजार असलेल्या रुग्णांना जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते कार्ड वाटप करून अभियाचा शुभारंभ करण्यात आला शहरात या आजाराचे ४०रुग्ण आहेत,

त्यांनी वेळेवर औषधी घ्यावी व रक्त तपासणी करावी असे आवाहन करण्यात आले, कार्यक्रम अध्यक्षस्थानी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन टारपे होते. तर व्यासपीठावर भाजपा शहर अध्यक्ष दिनेश राजपूत, उपाध्यक्ष प्रेम राजपूत, शैलेश पोंदे, माजी नगरसेवक दशरथ बनकर, गणेश खैरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष पाटणी, डॉ.दीपमाला परदेशी, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. शीतल चव्हाण, सिकलसेल विभाग प्रमुख लक्ष्मीकांत दुबे, विजय पाटील, परिचारिका रुख्मिनी गवई, शशिकांत पाटील, आरोग्य कर्मचारी रवी गडकरी, राजेंद्र लाठे, श्याम उचित, प्रशांत गिरी, मनीषा मुळे यांनी सहभाग नोंदविला, सूत्र संचलन आरोग्य समिती सदस्य धोंडीराम ठाकूर यांनी केले आभार लक्ष्मीकांत दुबे यांनी मानले.











# विद्यार्थी प्रवेशाची लूट करणाऱ्याना अटक करा

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** विद्यार्थी व पालकांची प्रवेश फी च्या नावाने आर्थिक लूट करणाऱ्या रॅकेट शोधण्यासाठी सदरचे प्रकरण आर्थिक गुन्हा शाखेकडे वर्ग करा अशी मागणी युवासेना, धुळे जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांच्या तर्फे निवेदनाद्वारे करण्यात आले.

विद्यार्थी व पालक यांची ऍडमिशन च्या नावाने आर्थिक लोड करणाऱ्या साजिया सलामुद्दीन काझी या महिलेविरुद्ध धुळे शहर पोलीस स्टेशन ने फिर्याद घेण्यास नकार दिल्यानंतर, धुळे जिल्हा युवा सेनेने मा.पोलीस अधीक्षक, धुळे यांच्याकडे निवेदन दिले.

मागील अनेक दिवसांपासून विद्यार्थी व पालकांची आर्थिक लूट करण्याच्या हेतूने, ऍडमिशन च्या नावाने पैसे उकळणाऱ्या रॉकेटने धुमाकूळ घातला आहे असा आरोप युवा सेने तर्फे करण्यात आला सदर रॅकेट चालक हे अत्यंत चालख असून, ते शितापीने पालकांना त्यांच्या बोलण्यात फसवून वेगवेगळ्या मार्गाने आर्थिक लोक करीत असल्याचा आरोप हे करण्यात आला. याचाच एक प्रकार म्हणजे साक्री रोड येथील जितेंद्र किशोर खैरनार नामक पालकांना साजिया काजी या महिलेने रक्कम रुपये 35000 घेऊन, मुलाचे ॲडमिशन कनोसा शाळेत करून देते, असे सांगून आर्थिक लूट केली आहे. या पालकांना सजिया या महिलेने अत्यंत शितापीने फसवले असल्याकारणाने, सदरचा गुन्हा नोंदविणे स्थानिक पोलिसांना अवघड जात असल्याचे समजले. कारण सदरच्या गुन्हा नोंदवून, ऍडमिशन च्या नावाने फसवणूक करणाऱ्यांचे रॅकेट शोधून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करून घेण्यासाठी विशेष पथकाची गरज आहे असे यावेळी युवा सेनेने माननीय पोलीस अधीक्षक साहेब यांच्या समक्ष मागणी केली आहे. सदर रॅकेटमध्ये अनेक मोठ्या आसामी असण्याचीही शक्यता यावेळेस नागरिकांकडून व्यक्त केले जात असल्याचे युवा सेना पदाधिकाऱ्यांनी सांगितले आहे. परंतु स्थानिक पोलिसांकडून मात्र वेगवेगळी कारणे देऊन साजिया काजीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी नकार दिला जात आहे. साजिया काजी विरुद्ध गुन्हा दाखल होण्या आवश्यक आहे. त्याशिवाय सदर रॅकेटमध्ये कोण कोण सामील आहे याचा उलगडा होणार नाही. असे यावेळी युवा सेना पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. सदर निवेदन सादर करणे कामी हरीश माळी, युवा सेना जिल्हाप्रमुख, कुणाल कानकाटे उपजिल्हाप्रमुख, मनोज माळी, महानगरप्रमुख, सिद्धार्थ करनकाळ,विधानसभा प्रमुख योगेश मराठे,सिद्धेश नाशिकर,शहर संघटक जीत पाटील जयेश फुलपगारे,शुभम फुलपगारे,संदीप बडगुजर रोहित अमृतकर आदि युवा सैनिक उपस्थित होते.

# पत्रकारास महिला जमादाराची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** निवेदनावर आधारीत तक्रार अर्जा प्रमाणे विरोधात बातमी छापली म्हणून पत्रकार एम. एजाज यांना महीला जमादार लिला जोगदंड यांनी पुराव्याची मागणी करत उध्दटपणाची भाषा वापरून गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली अशी तक्रार पत्रकार एम. एजाज यांनी पोलीस निरक्षक कुंदनकुमार वाघमारे यांना दिली रिपब्लिकन सेनेचे परभणी जिल्हाध्यक्ष शरद चव्हाण यांनी परभणी जिल्हा पोलीस अधिक्षक यांना निवेदन दिले जिंतूर शहरात अवैध धंदे असून या अवैध धंदे वाल्यांना बीट जमादार लिला जोगदंड यांचे आशिर्वाद असल्याचे आरोप चव्हाण यांनी आपल्या निवेदनात करून लिला जोगदंड यांच्या विरूद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली या निवेदनाची प्रत प्रसिद्धीसाठी पत्रकारांना देण्यात आली होती या वर एम. एजाज यांनी आपल्या वर्तमान पत्रात प्रसिद्ध केली या वर लिला जोगदंड रागात आल्या एजाज हे पोलीस ठाण्यात काही माहिती घेण्यासाठी रविवारी गेले असता तुम्ही माझ्या विरोधात बातमी का छापली काय पुरावा आहे असे म्हणत गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. अद्याप पर्यंत पत्रकारांच्या तक्रार अर्जावर पोलीसां कडुन काय कार्यवाही करण्यात आली ते कळु शकले नाही.

# वसंतरावजी नाईक यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील महानायक हरितक्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांची जयंती साजरी आज दिनांक एक जुलै 2023 रोजी जय कालंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा व कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थाचालक भाऊराव लक्ष्मणराव कोलते हे होते सर्व संस्था चालक उपस्थित होते संस्थेच्या सचिव यांनी नाईक साहेबांना अभिवादन करून आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य कोलते एन आर सर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी मा नाईक साहेब यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला त्याच्या बद्धल बोलताना प्रा जीवन कोलते सामाजिक कार्यकर्ते यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी सर्व शिक्षक बंधू विजयसिंग राजपूत, सुदाम राठोड, संजय जोशी, विनोद जाधव, भास्कर खामठ, भास्कर ससाणे, भूषण देसले, ज्ञानेश्वर राठोड, पंजाबराव शेळके, विद्यार्थी उपस्थित होते .

# पड रं पाण्या, पड रं पाण्या...कर पाणी पाणी शेतकऱ्यांची आळवणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** दिवसभर सोसायट्याचा वारा... अन् नुसताच धुरळा... जून संपला तरी पावसाचा टिपूसही नाही. सर्वत्र पेरण्या खोळंबल्या असून, काळजीने व्याकूळ झालेला बळीराजाच्या तोंडी आता गायक तथा संपादक दशरथ सुरडकर यांचे पड रं पाण्या, पड रं पाण्या, कर पाणी पाणी! शेत माझं लंय तान्हीलं, चातकावणी...' या गीतातील ओवीप्रमाणे बळीराजासह सर्वसामान्य सोयगाव तालुक्यातील नागरिक पावसासाठी आळवणा करीत आहे.रोहिणी मृग नक्षत्र गेले कोरडे गेल्याने आद्रा तरी आधार देईल अशी अपेक्षा असताना सोयगाव तालुक्यात मंडळापैकी पाऊस पडला कुठे मुठे झाला असून सोयगाव तालुक्यात केवळ सोसाट्याचा वारा सुटल्याने धास्तावलेला बळीराजा मेघराजाच्या प्रतिक्षेत आहे. . उर्वरित सोयगाव तालुक्यात फारच कमी म्हणजे कुठे २-३ मी मी तर कुठे 5-10 मी मी पाऊस पडला आहे. या आठवड्यात दमदार पाऊस पडला तरच पेरणी होवू शकते अन्यथा खरीप हंगाम धोक्यात असल्याचे मत प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व शेतकऱ्यातून व्यक्त केले आहे.मृग नक्षेत्रामध्ये पेरणी झाली तर उत्पादनामध्ये वाढ होते. मात्र या नक्षत्रामध्ये पेरणी न झाल्यास उत्पादनात घट ही त्याच प्रमाणामध्ये येते. मृग नक्षत्रामध्ये जर पेरणी झाली तर उत्पादन शंभर टक्के मिळते, जर मृग नक्षत्र टाळून पुढे गेले तर उत्पादनामध्ये १५ ते २० टक्के घट येते. त्यामध्ये शेतक-यांच्या शेती उत्पादनावर परिणाम होतो, असे औरंगाबाद जिल्ह्यातील अनेक जानकार शेतकऱ्यांनी सांगितले.

एकूण २७ नक्षत्र. एकूण २७ नक्षत्र असून यामध्ये काही महत्त्वाची नक्षत्र आहेत. त्या नक्षत्रामुळे ऋतूवर व कालचक्रावर मोठा प्रमाणात त्याचा परिणाम होतो. अश्विन, भरणी, कृत्तिका, रोहिणी, मृगशिरा, आद्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा मया, पूर्वा फाल्गुनी, उत्तर फालगुनी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठ, मूला, पूर्वा वाढ, उत्तरावाद, श्रावण, धनिष्ठा, पूर्व भाद्र, उत्तरभाद्र, रेवती ही फेल गेला. नक्षत्र महत्त्वाची मानले जातात. पावसाचा अंदाज फेल.

जून महिन्यात औरंगाबाद जिल्ह्यात सरासरी ९९ मी.मी पाऊस पडणे यामध्ये सोयगाव तालुक्यात फारच कमी नोंद आहे.आद्रा नक्षत्राचा पहिला आठवडा कोरडा गेल्यानंतर २३ ते ३० जून दरम्यान पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. 30 जून पर्यंत सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात कमी प्रमाणात पाऊस पडला आहे तालुक्यात अद्याप पुरेसा व पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषि अधिकारी मदन सिसोदिया, आर जी गुंडिले मंडळ अधिकारी, संपत वाघ मंडळ अधिकारी यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**घोडेगाव :** सद्गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालय घोडेगाव, राजीव गांधी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय ,तसेच राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय येथे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनानिमित्त कृषी दिन साजरा करण्यात आला. आज महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनानिमित्त हरित सेना विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या तर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष साईनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम संपन्न झाले.

सकाळी परिपाठाच्या वेळी स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यातआले. मा. संजय कासार यांनी हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे कार्य याबाबत मार्गदर्शन केले. कुमारी वैष्णवी जाधव हिने कृषी दिनाचे महत्त्व सांगितले.



प्राचार्य ज्ञानदेव घुगे सर यांनी वसंतराव नाईक यांचे कृषी विषयक कार्य याबाबत अत्यंत सखोल व मार्मिक माहिती सांगितली. रॅलीमध्ये वृक्ष प्रदर्शन, बॅनर ,घोषवाक्य इत्यादीचे आयोजन करण्यात आले होते .कृषी दिनामध्ये ग्रामस्थांचा सहभाग वाढवावा म्हणून ग्रामस्थांना आजच्या दिवसाचे महत्व श्री किसन जिते सर यांनी सांगितले. रॅलीमध्ये वनपाल तागड साहेब व बोलकर मॅडम यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

श्री संजय गोमलाडू सर व श्री ज्ञानदेव घुगे सर यांचा वाढदिवस वृक्ष लागवड करून साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय ए. डी खैरनार सर यांनी आभार मानले. यावेळी राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी प्रा. संदीप जाधव सर, श्री सोपान वाकळे सर, प्रा. तुकाराम जाधव, प्राध्यापिका कांचन ठाकूर मॅडम, प्रा. अमोल जाधव सर, हरीत सेना विभागाचे प्रा.नलावडे सर, अशोक फुलारे सर, सखाहारी श्रीखंडे, सोनवणे सर, विद्यार्थी उपस्थित होते.



सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.
संपर्क : मो. 7588818406

# भाजपच्या वतीने भास्कर पेरे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** येथे आदर्श पाटोदा गावचे आदर्श मा. सरपंच भास्करराव जी पेरे यांची घेतली सदिच्छा भेट व भेट घेऊन त्यांचा आम्ही फुलंब्री शहर व फुलंब्री तालुक्याच्या वतीने त्यांचा सत्कार केला. खूप चर्चा झाल्या त्यांनी सांगितलं की नक्की या माझ्या गावी आणि तुम्ही पण माझ्या गावासारखे आपापल्या परीने इतर सरपंचांना मार्गदर्शन करा आणि मी नक्की फुलंब्रीला एक दिवस भेट देतो असे आश्वासन त्यांनी दिले. याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, शहराध्यक्ष योगेश मिसाळ, भाजपा युवा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, नवाब पटेल, सतीश ढंगारे व मित्र मंडळ उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# येणाऱ्या काळात बिआरएस बस्तान मांडेल

## तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर जनतेच्या मनात : तेलंगणा मॉडेल आकर्षण ठरणार

आधुनिक केसरी न्यूज

**राहल वासनिक**

**यवतमाळ :** राज्याच्या राजकारणात तेलंगणाचे मुख्मंत्री केसीआर यांच्या बिआरएस भारत राष्ट्र समितीने एन्ट्री केली आहे. तेलंगणात त्यानी केलेल्या कामाचे मॉडेल जनतेच्या मनात बसले आहे. या पक्षाच्या वतीने राज्यातील विधानसभा व लोकसभा निवडणूक लढणार असून, उमेदवार उभे ठेवणार आहे. येणा-या काळात बिआरएस राज्यात बस्तान मांडेल अशा आशावाद भारत राष्ट्र समितीचे नेते माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे पाटील यांनी व्यक्त केला. येथील विश्रामगृहात आयोजीत पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत राष्ट समिती चा प्रचाराचा पहिला टप्पा २२ मे ते २२ जून या कालावधीत होता. या कालावधीत पक्षाने प्रत्येक गावात जावून तेलंगणाचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांनी तेलंगणात



केलेल्या विकास कामाची माहिती देण्यात आली. केंद्रीय कार्यालयात आतापर्यंत ऑनलाईन पध्दतीने १५ लाख सदस्यांनी नोंदणी केली असून, २५ ते ३० लाख नोंदणी होईल असा विश्वास माजी आमदार शंकर अण्णा धोंगडे यांनी व्यक्त केला. तेलंगाना मध्ये कोणतीही नैसर्गिक साधन संपत्ती नसताना उकल व दरडोई उत्पन्न वाढविले आहे. राज्यातील जनता, शेतकरी, युवक व प्रत्येक जण अनेक अडचणीचा सामना करीत आहे. गेल्या ७५ वर्षात राज्यात आतापर्यंत सत्तेवर असलेल्या सरकार जनतेचे प्रश्न सोडविण्यात अपयशी का ठरले असा सवालही त्यांनी केला. त्यामुळे आता तेलंगणा सरकारचे मॉडेलचे आकर्षन वाढत आहे. यावेळी केसीआर याच्या कामामुळे जनतेच्या मना मनात जागा करीत असून, परिवर्तन घडवेल. येणा-या निवडणूकीत बस्तान मांडेल व सत्ताधा-यांना त्यांची जागा दाखवेल असेही माजी आमदार शंकर अण्णा धोंगडे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला नानाभाऊ गाडबैले , सुभाष राठोड व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

तेलंगणाचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांचा झंझावात महाराष्ट्रात सुरु आहे . अनेक राजकीय पक्षाच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांनी बिआरएस पक्ष हा भाजपची बि टिम असल्याचा आरोप करीत आहे . या संदर्भात माजी आ . शंकर अण्णा धोंगडे यांना विचारणा केली असता, आम्ही शेतकरी, कष्टकऱ्यांची टिम आहे . पंढरपुर येथे झालेल्या सभेतही चंद्रशेखर राव यांनी विरोधकांना प्रतिउत्तर देत आम्ही कोणाची ए . बि . टिम नसुन, ते जनता ठरवेल असे खडेबोल सुनावल्याचे शंकर अण्णा धोंगडे यांनी सांगितले .

# दिनू डॉन अखेर पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बनावट दारु निर्मिती आणि अवैध वाहतूक प्रकरणी गुन्हा दाखल झालेला संशयित दिनेश गायकवाड उर्फ दिनू डॉन यास अखेर धुळे पोलिसांनी गंगाखेड (जि. परभणी) येथे अटक केली. ४ डिसेंबर २०२२ रोजी पोलिसांनी केलेल्या कारवाईत बनावट दारुसह ९५ लाख ७७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. तेव्हापासून दिनू डॉन फरार होता. चार डिसेंबर २०२२ रोजीच्या कारवाईत धुळे तालुका पोलीस ठाण्यात १० जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यात दिनू डॉनचा समावेश होता. फरार दिनूला पकडण्यासाठी पोलिसांनी पथके नेमली होती. घटना घडल्यानंतर नेपाळ, गोवा, उत्तर प्रदेश आणि बिहार असा दिनूने आपला मुक्काम हलविला होता. दिनू गंगाखेड येथील जगदंबा हॉटेलजवळ थांबल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस पथक २९ जून रोजी तेथे पोहचले.

# लिपिक हणमंत कल्याणपाड सेवानिवृत्त

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** तालुका कृषी कार्यालयातील लिपिक हणमंत मारोतीराव कल्याणपाड हे नियत वयोमानानुसार ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने त्यांचा सत्कार करून भावी आयुष्याकरीता शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी हणमंत कल्याणपाड म्हणाले की आपण सेवा काळात कमावलेली माणसे हीच आपल्या सेवानिवृत्तीनंतर कामी पडतात. ज्या सहकार्यासोबत दीर्घकाळ काम केले त्यांना सोडून जाताना मनाचा हळवा कोपरा नक्कीच भाऊक होतो. कुठल्याही सेवेत काम करीत असताना प्रत्येकाला नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती लागते. परंतु सेवानिवृत्ती म्हणजे थांबणे नसून आयुष्याचे एक वळण आहे. या वळणावर जरा विसावून पुन्हा नवीन इनिंग सुरू करता येते असे ही ते म्हणाले. यावेळी शुभेच्छा



देत असताना उपस्थित तालुका कृषी अधिकारी विठ्ठलराव गीते, गोविंद बनसोडे, सुनिता पिंपळगावे कृषी सहाय्यक, वैजनाथ नावंदे, व्यंकटराव कल्याणपाड, श्रीराम पत्तेवाड आदिनी पुष्पहार घालून शुभेच्छा दिल्या.





# आरक्षण वर्गीकरणाचा प्रश्न पुढाऱ्यांच्या लालची प्रवृत्तीपणामुळे प्रलंबीत

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोकस्वराज्य आंदोलन आणि



समविचारी सामाजिक संघटनेच्या वतीने विभागीय स्तरीय कार्यकर्ता चिंतन व आढावा बैठकीचे आयोजन दिनांक२९जून २०२३रोजी हॉटेल गणराज पॅलेस येथे आयोजित करण्यातआले होती. ही बैठक दुपारी दीड वाजता प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली सुरुवात करण्यातआली होती. या बैठकीमध्ये समविचारी सामाजिक संघटना म्हणून डॉ. अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलन व एम.आर. पी.एसचे जिल्हा नेते यादवराव सूर्यवंशी तर क्रांती आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष सतीश कवडे,जेष्ठ नेते परमेश्वर बंडेवार यांचा सहभाग होता.बैठकीमध्ये वरील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विविध विषयावर आणि समाजाच्या प्रलंबित मागण्यावर तसेच महाराष्ट्रातील मातंग समाजावर होणाऱ्या सततअन्याय, अत्याचार, खुन, बलात्कार,हल्ले या घटना घडामोडीवर तीव्र आक्षेप घेऊन तीव्र शब्दात जाहीर निषेध मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडवणीस सत्ताधारी सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. त्यानंतर जिल्ह्यातील कार्यकर्त्याशी प्रदीर्घ संवाद साधून आगामी काळात समाजातील विविध समविचारी संघटनेतील कार्यकर्त्याशी बोलून त्यांची भूमिका काय ?असावी याविषयी विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले. तर शेवटी बैठकीच्याअध्यक्ष पदावरुन प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सरांनी आरक्षण वर्गीकरण, बार्टीच्यां धर्तीवर आर्टीची स्थापना, महामंडळाला भरघोस निधी विषयी प्रत्येक राजकीय पक्षातील नेते, पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी यांनी येथील सत्ताधारी असो की, विरोधक यांना आरक्षण वर्गीकरणाच्यां प्रलंबित मागण्या आर्टीची स्थापना, महामंडळांना देण्यात येणारा भरघोस निधीअशा प्रश्नावर सत्ताधाऱ्याशी संधान साधून, हे प्रश्न पुढे करून आपली राजकीय पोळी शिकुन घेण्याचे महापाप हे करीत आहेत. समाजातील केवळ राजकीय नेतृत्व व आजी-माजी लोकप्रतिनिधित्व करणारे समाजातील नेते, पदाधिकारी हेच या प्रलंबित मागण्याला जबाबदार आहेत. असे सुद्धा त्यांनी यावेळी आपल्या भाषणात सांगितले आहे. यावेळी या बैठकीस लोकस्वराज्यआंदोलन संस्थापक अध्यक्ष प्रा.रामचंद्र भरांडे सर, अण्णा भाऊ साठे क्रांति आंदोलनचे संस्थापक अध्यक्ष सतीश कावडे, लोकस्वराज्य आंदोलन प्रदेश उपाध्यक्ष व्हि.जी.डोईवाड, धर्माबादचे माजी नगराध्यक्ष बी.एम.गोणारकर, देविदास कांबळे, एमआरपी एसचे नेते यादव सुर्यवंशी, परमेश्वर बंडेवार, प्रा. ईरवंत सुर्यकार सर, ज्येष्ठ सामाजिक नेते पुरुषोत्तम दादा गायकवाड, बालाजी पाटोळे सर, संतोष तेलंग मराठवाडा अध्यक्ष विद्यार्थी आघाडी, माणिक कांबळे जिल्हाध्यक्ष उत्तर नांदेड, नागोराव कुडके जिल्हा प्रवक्ते, किशन गोरेकर, संजय खानजोडे हदगाव, शेवटी आभार अंकुशदादा गायकवाड युवक जिल्हाध्यक्ष नांदेड यांनी मानले आहे.





# टिपेश्वर अभयारण्यात वाघाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** टिपेश्वर अभयारण्यांतर्गत पाटणबोरी वन्यजीव परिक्षेत्रांतर्गत अर्ली वर्तुळातील, भवानखोरी बिट कक्ष क्र. १०५ मध्ये गुरुवारी सकाळी एक नर वाघ मृतावस्थेत आढळून आला. या घटनेमुळे वनवर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. वाघाचामृत्यू नेमका कशामुळे झाला, याचे गूढ अद्याप कायम आहे.

गुरुवारी सकाळी वनरक्षक राजू तुमराम हे हंगामी मजुरांसह अर्ली वन वर्तुळातील, भवानखोरी बिट कक्ष क्र. १०५ मध्ये गस्त करीत असताना त्यांना एका वाघाचे शव निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ याबाबत वरिष्ठांना माहिती दिली. या वाघाचा अंदाजे तीन ते चार दिवसांपूर्वी मृत्यू झाला असावा, असा अंदाज बांधण्यात येत आहे. मृत वाघाचे संपूर्ण अवयव शाबूत आहेत. पशुवैद्यकीय अधिकारी तसेच वन अधिकारी यांनी घटनास्थळी जाऊन मृत वाघाचे निरीक्षण केले. निरीक्षणामध्ये मृत वाघ हा नर असल्याचे स्पष्ट झाले. त्याच्या शरीरावर कोणत्याही प्रकारच्या जखमा आढळून आल्या नाहीत. तसेच वनअधिकारी यांनी आजूबाजूच्या परिसरात फिरती केली असता कुठेही मानवी पाऊलखुणा आढळून आल्या नाहीत. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकारी यांनी मृत वाघाचे सर्वासमक्ष शवविच्छेदन केले. वाघाचा मृत्यू कशामुळे झाला, हे स्पष्ट होऊ शकले नाही. या घटनेचा तपास



सहायक वनसंरक्षक (वन्यजीव) रवींद्र कोंडावार करीत आहेत.

